
शनिवार १५ मे १९७१
पन्नास पैसे

# माणूस

अस्ताव्यस्त, दिशाहीन व पोकळ जीवनाला शरण जाणारी माणसे सर्व पदांवर, सर्व क्षेत्रात आज भेटत आहेत. या जीवनाविरुद्ध संताप व्यक्त करणारे तरुण भेटत आहेत. अशा वेळी एका सार्थ जीवनाचा आदर्श आपल्या डोळ्यांपुढे ठेवणारे प्रा. गाडगीळ

आपल्यामध्ये काही वर्षे तरी हवे होते....



## सप्रेम नमस्कार....

◻ दि. १ मेच्या अंकातील अनिल बर्वे यांच्या 'प्लासी ते डाक्का' या लेखातील निष्कर्ष पटत नाहीत. श्री. रहमान यांना पूर्व बंगालमध्ये एवढ्या मोठ्या प्रमाणावर युद्ध पेटेल याची कल्पना नसावी. स्वायत्ततेची घोषणा होणार अशी बातमी असताना एकदम लष्करी कारवाई करण्यात आली व श्री. रहमान अदृश्य झाले. त्यांचे अनुयायी अद्याप पाकिस्तानी सैन्याशी झुंज देत आहेत ही बाब सामान्य नाही. जोपर्यंत अमेरिका 'शांत' आहे तोपर्यंत बांगला देशला मान्यता देण्याची कोणी घाई करणार नाही. अर्थात मान्यतेचा अर्थ बांगला देशला उघडपणे सर्व मदत देणे हा असेल तर...दरम्यान भारताने आपला वाटा उचललाच पाहिजे. नसता तेथील सर्व हिंदूंचे शिरकाण पुढील काही महिन्यात होईल. या महान प्रश्नाला धार्मिक स्वरूप देणे तेवढेसे बरोबर नाही. तथापी तेथील हिंदूंची जबाबदारी भारत टाळू शकत नाही आणि 'बांगला देश' म्हणजे पाकिस्तानला आर्थिक, राजकीय व लष्करी दृष्ट्या जबरदस्त टोला या जिद्दीने प्रयत्न झाले पाहिजेत.

या लेखातील ऐतिहासिक तुलना गैरलागू आहे. हिंदुस्थानच्या मोठ्या भागात इंग्रजांचे राज्य येण्याचे महत्त्वाचे कारण तेथील राज्यकर्त्यांना जनता कमीअधिक प्रमाणात विटली होती हे आहे.

इंग्रजांना खरा प्रतिकार मराठे, टिपू व शीखांशिवाय कोणीही केला नाही. लेखमालेचे शीर्षक 'इन्सान जाग उठा' हे असते तर बरे.

८ मे, १९७१ — के. श्री. औराद्कर, बीड (मराठवाडा)

---


किंमत पन्नास पैसे — शनिवार १५ मे १९७१

वार्षिक वर्गणी पंचवीस रुपये

परदेशची वर्गणी पंचेचाळीस रुपये

# माणूस

वर्ष : दहावे
अंक : एक्क्याऐंशीवा (८१)

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

# डॉ. धनंजयराव गाडगीळ :

# सार्थ जीवनाची दृढ साधना

दि. के. बेडेकर

सार्थपणे जगलेल्या व्यक्तीचे जीवन नेहमी अपुरे राहते; चाकोरीतल्या पराधीन जिण्याला पूर्णविराम मिळू शकतो. अखंड ज्ञानसाधनेचे व सार्वजनिक क्रिया-शीलतेचे दीर्घ जीवन डॉ. गाडगीळांना लाभले, पण त्यांचे अनेक महत्त्वाचे संकल्प त्यांना हाती घेता आले नाहीत. आता दिल्लीहून परत आल्यावर मनातील ते संकल्प पार पाडण्याचे त्यांनी योजले होते. पण त्यांचा साराच प्रवास अपुरा राहिला. शिष्टा-चाराचे काटेकोर पालन करणाऱ्या गाडगिळांना पुण्यापर्यंत पोचू न देण्यात देवाने सभ्यतेचा संकेत मोडला आहे, असे मनात आल्यावाचून राहात नाही. माणसे मर्यादित सत्तेच्या कैफात भावनाशून्य बनून अशी वागतात, पण करुणाघन परमे-श्वराने असे वागायला नको होते !

डॉ. गाडगिळांचा जन्म १० एप्रिल १९०१ रोजी झाला आणि १९१८ ते १९२३ पर्यंत केंब्रिज येथील अभ्यासक्रम पुरा करून त्यांनी एम्. लिट ही पदवी घेतली. पदवीसाठी ' भारताचा औद्योगिक विकास ' या विषयावर त्यांनी प्रबंध लिहिला होता. तो १९२४ मध्ये ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस या संस्थेने प्रसिद्ध केला आणि १९४२ मध्ये त्याची चौथी आवृत्ती निघाली. या ग्रंथाला वाढवून अद्यावत कर-ण्याची त्यांची कल्पना होती. तसेच भारतातील औद्योगिक भांडवली संस्थांचा उदय या विषयावरील त्यांचे संशोधन त्यांना प्रसिद्ध करावयाचे होते. १९२३ पासून १९७१ पर्यंत त्यांच्या अर्थशास्त्रीय चिंतनाची दिशा कोणती होती ते यावरून दिसते.

विशिष्ट अर्थशास्त्रीय घडामोडींचा इतिहास तपासणे हे त्यांचे लक्ष्य होते.

या ऐतिहासिक दृष्टीमुळे, इंग्रजपूर्व काळातील, विशेषतः पेशवाईच्या काळातील, महाराष्ट्राचे आर्थिक जीवन कसे होते, हे शोधण्याचाही त्यांनी प्रयत्न केला. इतिहास-संशोधनामध्ये आर्थिक जीवनाकडे दृष्टी वळविण्याची गरज आहे, हे त्यांनी संशोधकांना आवर्जून सांगितले. आर्थिक गतेतिहासाचा अभ्यास हा साक्षात वर्तमानात घडविल्या जाणाऱ्या आर्थिक जीवनाच्या अभ्यासाशी जोडून घेण्याची गरज आहे व तो प्रत्यक्षात पुरी कशी करावयाची हे त्यांनी स्वतःच्या उदाहरणाने दाखवून दिले. महाराष्ट्राच्या दैनंदिन आर्थिक जीवनातील क्षुल्लक वाटणाऱ्या व्यवहारापासून तो शेतीच्या, सहकाराच्या, बेकारीच्या, बँक-व्यवसायाच्या, वेतनश्रेणीच्या इत्यादी जटिल प्रश्नांपर्यंत जे काही घडत होते त्यात प्रत्यक्ष मार्गदर्शनाची जबाबदारी त्यांनी पत्करली. जे नवे घडत आहे त्याकडे निर्लेप निरीक्षकाच्या भूमिकेवरून पाहणे हा एक अभ्यासाचा प्रकार असू शकतो. पण या अभ्यासाची उपयुक्तता ओळखूनही त्याची मर्यादा गाडगिळांनी हेरली होती. काटेकोरपणे व निस्पृह शास्त्रज्ञाप्रमाणे ते निरीक्षण करीत, पण तितक्याच तत्परतेने प्रत्यक्ष घडामोडींमध्ये सहभागी होत, जबाबदारी अंगावर घेऊन ती निरलस श्रम करून पार पाडीत.

डॉ. गाडगिळांनी अनेक क्षेत्रांत तात्त्विक आणि व्यावहारिक कार्ये केली आहेत. त्या सर्व कार्यांची माहिती व मोजमाप करणे, हे फार मोठे, अवघड व वेगवेगळ्या क्षेत्रांतील तज्ज्ञ माणसांचे काम आहे. आज त्यांना ही श्रद्धांजली वाहताना मला एकच गोष्ट ठळकपणे जाणवते की सार्थ जीवनाची एक निश्चित कल्पना गाडगिळांना तरुणपणीच लाभली होती व ती प्रत्यक्षात मूर्त करण्यास लागणारे मनोधैर्य आणि दक्षता त्यांच्या ठिकाणी प्रकर्षाने होती. ही दक्षता आणि दृढ क्रियाशीलता स्थिरत्वाने त्यांच्या ठिकाणी होती.

' सार्थ जीवना 'ची कल्पना येथे थोडी विशद करणे योग्य होईल. प्रत्यक्ष उदाहरणांनी ती कल्पना स्पष्ट करणे सोयीचे होईल. १९२० पासून १९७० पर्यंतचे अर्धशतक घेतले तर महाराष्ट्राच्या जीवनात काही व्यक्तींचे जीवन ठळकपणे समोर उभे राहते. महर्षी कर्वे, नारायण मल्हार जोशी, वामन मल्हार जोशी, डॉ. श्री. व्यं. केतकर, डॉ. म्हसकर, डॉ. आंबेडकर, श्री. भाऊराव पाटील, विनोबा भावे, आचार्य जावडेकर अशी विविध क्षेत्रांत अविरत कार्य करीत राहिलेली थोर माणसे डोळ्यांसमोर येतात. राजकीय पक्ष, शिक्षणसंस्था इत्यादी अनेक क्षेत्रांत अशा माणसांची आणखी नावे घेता येतील. काही नावे माझ्या स्मरणात सहज आली, कारण यांच्यापैकी काहीजणांना ज्येष्ठ म्हणून आदराने थोडे जवळून पाहण्याची संधी मला मिळाली. १९२० च्या आधीच्या महाराष्ट्रातील जीवनाला वळण लावणाऱ्या फुले, रानडे, गोखले, टिळक, आगरकर प्रभृती थोर व्यक्तींच्या विचारांचा ठसा या सर्व व्यक्तींच्या मनावर व कार्यावर पडलेला आढळतो. गांधीजींचा प्रभाव

यापैकी काहीजणांवर पडलेला दिसतो, तर काहींनी गांधीजींना विरोध केलेला दिसतो.

या सर्व व्यक्तींच्या मतांकडे, कार्यांकडे व त्यांच्या यशापयशाकडे आपण पाहतो; हे पाहणे जरूरही असते. पण त्यांच्या मोठेपणाचे रहस्य आपण डोळ्या-आड करतो. ते रहस्य त्यांच्या निर्णयाच्या पद्धतीत आहे. ती पद्धती अशी की प्रत्येकाने आपले विशिष्ट कार्यक्षेत्र मोठ्या कसोशीने निवडले. कोणत्याही पूर्वीच्या चाकोरीतच अडकून राहून पावले न टाकता प्रत्येकाने स्वत: निर्णय घेऊन स्वत:ची वाट चोखाळली, आणि असे करताना मळलेल्या वाटांनी जाण्याचा मोह त्यांनी टाळला असेही दिसते. दुसरी गोष्ट अशी, की स्वत:ची नवी वाट चोखाळताना त्यांनी आपआपल्या निवडीच्या क्षेत्रातील खऱ्या समस्यांना धैर्याने व गंभीरपणे तोंड दिले असे आढळते.

सारांश, गेल्या अर्धशतकातील या थोर व्यक्तींनी आपल्या स्वत:च्या व्यक्तित्वाची ओळख आणि भोवतालच्या वास्तवाची ओळख यावरच भिस्त टाकली, आणि त्यामुळेच त्यांना स्वत:च्या जीवनाला सार्थता आणता आली. या कालखंडामध्ये, मराठी शहरी सुशिक्षित वर्ग आपले स्वत:चे जीवन आणि समाजाचे जीवन या दोन्ही बाबतीत एका क्षीण अवस्थेत होता. १८५० ते १९२० या प्रबोधनाच्या प्रथम उर्मीच्या काळातली थोर माणसे ज्या स्वतंत्र बाण्याने व जिद्दीने विचार व आचार करीत होती, तो बाणा व जिद्द १९२० नंतर ओसरलेली दिसतात. ही ओहटी वाढतच गेलेली आढळते आणि सुशिक्षित माणसे समाजाबद्दल उदासीन, रुष्ट व आपल्या 'बौद्धिकते'च्या कोषात गुरफटलेली दिसतात. अशा मरगळीच्या आणि अर्थहीन वादंगांच्या अवस्थेत काही माणसांनी मात्र आपली जीवनदृष्टी निकोप ठेवली. या माणसांनीच 'सार्थ जीवना'चे अवघड व्रत आपापल्या क्षेत्रात आचरले असे म्हणता येईल.

प्रा. गाडगीळ अशा थोर व्यक्तींपैकी एक प्रमुख विचारवंत होते. समाज-जीवनाच्या सर्व क्षेत्रांत रानडे, टिळक, आगरकर प्रभृतींनी आपले कार्य केले, त्याच-प्रमाणे गाडगीळदेखील सर्व क्षेत्रांमध्ये दक्षतेने काही कार्यभाग करताना आढळतात. गोखले अर्थशास्त्र संस्थेचे कार्य हे आपले मुख्य कार्य त्यांनी मानले, आणि १९३० पासून १९६६ पर्यंत या संस्थेला भव्य आणि उत्कृष्ट कार्यक्षमतेचे रूप आणून दिले. पण याच दीर्घ काळात त्यांनी महाराष्ट्र साहित्य परिषद, भारत इतिहास संशोधन मंडळ अशा इतर संस्थांकडेही लक्ष पुरविले. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात समतोल आणि व्यावहारिक मार्गदर्शन देण्यात त्यांनी फार वेळ आणि श्रम खर्ची घातले. श्री. भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्थेच्या वाढत्या कार्यात त्यांनी प्रथमपासून जिव्हाळ्याने साथ दिली. सहकारी चळवळ, आणि विशेषत: सहकारी साखर कारखान्यांची उभारणी, यांचे श्रेय गाडगीळ यांच्याचकडे द्यावे

लागेल. ग्रामीण विभागातील आर्थिक प्रश्नांकडे त्यांनी लक्ष दिले; आणि शहरांच्या वाढत्या हलाखीचा प्रश्न त्यांनी तेवढाच महत्त्वाचा मानला

वरील सारे प्रश्न 'महाराष्ट्रा'चे प्रश्न आहेत, तसेच एका अर्थी ते 'भारतीय' प्रश्न आहेत. वेगवेगळ्या भारतीय घटकराज्यांत साधारण याच स्वरूपाचे प्रश्न आहेत, आणि तरीही प्रत्येक ठिकाणी काही वेगळेपणही आहे. आणखी असे, की घटकराज्यांच्या प्रश्नांची सोडवणूक भारतीय संघराज्याच्या आर्थिक, राजकीय व सामाजिक एकवट संदर्भातच करणे प्राप्त आहे. या संदर्भाचे भान ठेवून गाडगिळांचे सर्व विचार आणि कार्य सतत चालू होते.

त्यांच्या कार्याचा व्याप मोठा होता, पण त्याकडून लक्ष काढून घेऊन पुन्हा एकदा त्यांच्या कार्यपद्धतीकडे वळू. येथे संस्कारांचा प्रश्न येतो. कार्यपद्धती, किंवा जास्त व्यापक दृष्टीने 'जीवनपद्धती', ठरविताना प्रत्येकच माणूस काही संस्कार घेतो; आणि ज्यांना आपण 'सार्थ जीवन' जगणारी माणसे म्हणू ती थोर माणसे पूर्वसंस्कारांतून एक स्वतःचे स्वतंत्र जीवनसूत्र बनवितात. गाडगीळांच्या मनावर सर्वांत दृढ संस्कार लोकमान्यांच्या जीवनपद्धतीचा आणि विचारांचा झाला होता. 'केसरी'च्या विश्वस्त मंडळात जाणे हे त्यांना एक कर्तव्यपालन आणि श्रद्धेचे काम वाटले, ते यामुळेच. पण, दुसरीकडे, न्यायमूर्ती रानडे यांच्याबद्दल त्यांना नितांत आदर होता. रावबहादूर काळे हे 'नेमस्त' पुढारी होते आणि त्यांनी स्थापन केलेला ट्रस्ट गोखले यांनी स्थापन केलेल्या सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटीकडे सुपूर्त केलेला होता. तो ट्रस्ट हाच गोखले अर्थशास्त्र संस्थेचा मूळ पाया होता. टिळकांच्या 'जहाल' विचारसरणीचा संस्कार स्वीकारणारे गाडगीळ नेमस्तांचे अग्रणी असलेल्या गोखले यांच्या नावाने स्थापन झालेल्या संस्थेची धुरा तरुण वयात पत्करतात व यशस्वीपणे ती संस्था नावारूपाला आणतात, हे कसे घडले ?

ह्या प्रश्नाचे तांत्रिक उत्तर देता येईल, किंवा त्यात फक्त योगायोग होता असे म्हणता येईल. पण १९२० नंतरच्या काळातल्या थोर व्यक्तींच्या घडणीकडे पाहता एक महत्त्वाची गोष्ट लक्षात घेणे जरूर आहे. ती गोष्ट अशी की आगरकर, गोखले व टिळक यांच्या काळातील तीव्र मतभेद आणि वाद यांना पचवून नव्या परिस्थितीचे स्वतंत्रपणे आकलन करण्याचा प्रयत्न या व्यक्तींनी केलेला आढळतो. 'नेमस्त' विरुद्ध 'जहाल' अशा मतभेदांनी गाजलेल्या वादातून कट्टर अनुयायी म्हणविणारी माणसे बाहेर पडू शकली नाहीत. पण स्वतंत्र वृत्तीच्या व्यक्तींनी दोन्ही पक्षांतील नेत्यांबद्दल आदरबुद्धी ठेवून त्यांच्या शिकवणीतील श्रेयस्कर तत्त्वांचा स्वीकार केला. गाडगीळांच्या एकंदर भूमिकेत रानडे, गोखले व टिळक यांच्या विचारांचे, कार्यपद्धतींचे व जीवननिष्ठांचे समन्वित रूप दिसते. शिवाय,

पृष्ठ ६२ वर

# हेही नसे थोडके !

कदाचित स्वतंत्र भारताच्या इतिहासात आमचे सरकार प्रथमच राजनैतिक पातळीवरील युद्ध इतक्या खंबीरपणे हाताळत असेल. पाक बरोबरचा आमचा बखेडा फाळणीबरोबरच सुरू झाला. नद्यांचें पाणी, निर्वासितांचे लोंढे वगैरे अनेक प्रश्नांवर आमचे सरकार सतत पडखाऊ धोरण स्वीकारीत आले. पण बंगला देशच्या जन्माबरोबरच कणखर धोरणाचा उदय झाला.

कलकत्त्यात हुसैन अली आणि त्यांच्या पूर्व बंगाली सहकाऱ्यांना पाकिस्तान डेप्युटी हायकमिशनच्या कचेरीचा ताबा घेण्यास परवानगी दिली, ते योग्य की अयोग्य हा वादाचा प्रश्न होऊ शकेल. पण डाक्का व इस्लामाबादमधील भारतीय अधिकाऱ्यांना मिळत असलेल्या वागणुकीला उत्तर म्हणून भारतातील पाक अधिकाऱ्यांच्या हालचालींवर कडक नियंत्रण ठेवून नवी दिल्लीने चोख उत्तर दिले यात वाद नाही.

हुसेन अली इतःपर पाकिस्तानचे प्रतिनिधी उरले नाहीत ही गोष्ट मसूद अलींची नेमणूक करून याह्याखान सरकारनेही मान्य केली. त्यामुळे कलकत्त्यातील कचेरी व तिचा अधिकारी वर्ग यांना संरक्षण देण्यात भारताची चूक झाली, असे म्हणता येत नाही.

फक्त प्रश्न उद्‌भवतो तो एवढाच की ठोशास प्रतिठोसा हे तत्त्व फक्त राजनैतिक मान्यता असलेल्या देशांच्या बाबतीतच लागू होते. कलकत्त्यात बंगला देशची वकिलात म्हणून पाकिस्तान हायकमिशनची कचेरी वापरू देण्यास अप्रत्यक्ष अनुमती देऊन भारत सरकार बंगला देशला अप्रत्यक्ष पण तरीही उघड मान्यता देत आहे यात काही निरीक्षकांना चूक होत आहे असे वाटते. कारण शेख मुजिबुर रहमान सरकारला अधिकृत मान्यता देण्यात भारताला ज्या अडचणी वाटतात त्या अजूनही कायम आहेत.

शेख मुजिबुर रहमानांनी स्वातंत्र्य पुकारल्यापासून पाकिस्तानी सैन्य तसे अनेक वेळा भारतीय सीमेपर्यंत आले, पण प्रत्यक्षात मोठा हालचाल २७ एप्रिल रोजी सुरू झाली. हा मजकूर लिहित असेपर्यंत भारताने लष्करी दृष्टचा या हालचालींना चोख उत्तर दिले नसले, तरी याह्याखानांना कडक शब्दात समज मात्र दिली. पण प्रत्यक्ष कृतीची वेळ आली तर आता भारत मागेपुढे पाहणार नाही असे दिसते.

या लढ्यात चीनचा पाठिंबा सोडला तर पाकिस्तानजवळ तशी विशेष ताकद

नाही हे लक्षात घेतले पाहिजे. (अर्थात अमेरिका, रशिया, फ्रान्स व ब्रिटन सारखी बडी राष्ट्रे मौन पत्करून याह्याखानांना पाठिंबाच देत आहे, हा भाग वेगळा.) बंगला देश चळवळ दडपण्यासाठी पाकिस्तान दिवशी एक कोटी रुपये खर्च करते आहे. हा आर्थिक ताण अनिश्चित काळपर्यंत सहन करणे अर्थात या लष्करी राजवटीला शक्य नाही पूर्व बंगालमधील तांदूळ ज्यूट, चहा व इतर परकी चलन मिळवून देणाऱ्या बाबींवर आता युद्धामुळे पाणी सोडणे पाकिस्तानला भाग पडले आहेच. पण प्रत्यक्ष पश्चिम पाकिस्तानातील अर्थव्यवस्थाही साफ मोडकळीला आली आहे.

त्यामुळेच याह्याखानाने भारताला चिथावणी देण्यात सुरुवात केली. चीनशी अधिक लगट करून पश्चिमी राष्ट्रांना सावध होण्यास भाग पाडले. कारण हे युद्ध थोड्या दिवसात आटोपू शकू असे खुद्द पश्चिम पाकिस्तानलासुद्धा वाटत नाही. बंगला देश म्हणजे दुसरे व्हिएटनाम होईल हे आता उघड झाले आहे. भारताबरोबरच्या स्पर्धेमुळे पाकिस्तानला हा प्रश्न प्रतिष्ठेचा करावा लागत आहे, त्यामुळेच चीनशी लगट.

भारताचे लक्ष बंगला देशावरून उडविण्यासाठी पश्चिम बंगाल व इतर भागात जातील दंगली सुरू करण्याचा प्रयत्न पश्चिम पाकिस्तानी करू पहात आहेत, असे निर्वासितांबरोबर आलेल्या पंजाबी मुस्लिम हस्तकांना अटक केल्यानंतर आढळले.

अर्थात यात अनपेक्षित असे काही नाही. हिंदूंचा द्वेष ही तर पाकिस्तानची मुख्य 'स्ट्रॅटेजी'. केवळ धर्माच्या पायावर राष्ट्राची विशेषत: पाकिस्तानची उभारणी यशस्वी होऊ शकत नाही हे ध्यानात आल्यानंतर चिडीपोटी पाकिस्तान यापेक्षा जास्त काही करूच शकत नाही.

त्यामुळेच पंजाबी सैन्य बंगला देशमध्ये शिरल्यानंतर त्यांनी बंगाली मुस्लिमांपेक्षा हिंदूंचे शिरकाण करण्यास सुरुवात केली. जे सापडले, त्यांची कत्तल झाली, उरलेले कसेबसे भारतात शिरले. डाक्क्यातील भारतीय डेप्युटी हाय कमिशनर सेन गुप्ता व अनेक परदेशी वार्ताहरांच्या अहवालात या शिरकाणाचा आवर्जून उल्लेख आहे.

कदाचित एक कोटी हिंदूंची कत्तल करून पूर्व बंगालची लोकसंख्या ६·५ कोटी करावी म्हणजे ६·७ कोटी लोकसंख्येच्या जोरावर आपल्याला बहुमत राखता येईल अशी पश्चिम पाकिस्तानयाची समजूत असावी !

हिंदूंच्या कत्तलीबाबत कोणत्याही मुस्लिम देशाने पाकचा उघड धिक्कार केला नाही, हे एक उघडे नागडे सत्य. भारतीय मुस्लिमांची प्रतिक्रियासुद्धा तितकीशी तीव्र नाही. छागलासारख्या बुद्धिवंतांचा अपवाद

एकंदरीत या घटनांचा अंदाज घेऊन भारत सरकारने विशेषत: सीमा भागात आपल्या गुप्तचर विभागाला सावध केले आहे ही एक समाधानाची बाब. □ □ □



# मला दिसलेले माझे सर

कुमुद पोरे

१९४९ साल. पुणे विद्यापीठाचे पदवी वर्ग त्याच वर्षी सुरू झाले. उच्च शिक्षणाचं केंद्रीकरण करावं – सर्व विद्यार्थ्यांनी एकत्र यावं आणि निरनिराळ्या महाविद्यालयातील नामवंत प्राध्यापकांनी शिकवावं ह्या अभिनव प्रयोगाला मोठ्या उमेदीनं सुरुवात झालेली. तेवढं एकच वर्ष 'सरांनी' बी. ए. च्या प्रथम वर्षाला अर्थशास्त्र शिकवल. मूल्य-सिद्धांत आणि विभाजनाचे सिद्धांत, अर्थशास्त्राचा गाभा. सरांचं वय पन्नासाहूनही कमी – परंतु २५ वर्षाहून अधिक कर्तृत्व होतं. गोखले अर्थशास्त्र संस्थेसारख्या जगन्मान्य संस्थेचे संचालक होते – आणि त्यांनीच आपल्या कर्तबगारीनं त्या संस्थेला जगन्मान्यता मिळवून दिलेली होती. सर आपल्याला शिकवायला येणार म्हणून आम्ही विद्यार्थी आनंदून गेलो होतो. तसंच मनावर खूप दडपणही आलेलं होतं. पहिल्या दिवशी सर वर्गात आले. पुरी उंच मूर्ती, पांढरे शुभ्र धोतर, काळा लांब कोट आणि टोपी – पायात पांढरे सोजे आणि काळे बूट. पांढराशुभ्र परीटघडीचा हातरूमाल कोटाच्या डाव्या खिशात ठेवण्याची लकब. सुटाबुटाच्या प्राध्यापकांच्या त्या काळात सरांची मूर्ती

'ऐतिहासिक' वाटली. त्या साधेपणात एकतऱ्हेची उग्रतेची छटा होती. पहिल्याच दिवशी त्यांनी सांगितलं की गेल्या १९ वर्षांत मी बी. ए. ला शिकविलेलं नाही. आणि आपल्या स्वच्छ लयबद्ध वाणीत आणि सुस्पष्ट तर्कशुद्ध शैलीत मार्गणचा सिद्धांत सांगायला सुरुवात केली. विषयावरील आणि भाषेवरील पकड एवढी घट्ट की हातात खडूही न घेता – बीजगणित, भूमिती याचा कशाचाही उपयोग न करता केवळ इंग्रजीत, युक्तीवादाच्या जोरावर सबंध विषय डोळ्यासमोर उभा राहिला. ते शिल्प कसं रचलं जातय हे कळायचं असेल तर एकदाही वर्गाच्या बाहेर लक्ष जाता कामा नये – नव्हे मनही भरकटता कामा नये – त्या शिल्पाचं कौतुक करण्याकरता सुद्धा – त्यांच्या व्याख्यानात जेवढी शिस्त तेवढाच विद्यार्थ्यांच्या ऐकण्यातसुद्धा पाहिजे. पुढे त्यांच्या विचारातील आणि विचार मांडणीतील ही शिस्त मी पुष्कळवेळा अनुभवली – लिखाणात, भाषणात, रोजच्या साध्या बोलण्यात! एखाद सुताचं रीळ उलगडल्यासारखा विषय उलगडत जायचा. कुठे मधे गाठ नाही अन् सुटा धागाही नाही. आपलं टोक घट्ट पकडून व्यवस्थित गुंडाळलं नाही तर सगळा गुंता व्हायचा – कधी सुटायचा नाही. व्याख्यानात एकही गैर – असबद्ध (irrelvant) वाक्य नाही आणि अकारण विनोदही नाही. घंटा झाली की वाक्य पुरे करून सर कॉमनरूममध्ये जायचे आणि आम्ही एक दीर्घ श्वास घ्यायचो. कॉमनरूममधून सर लगेच निघून जायचे. कुणाला काही अडचण असेल – आणि पुष्कळच असायच्या. विचारायला जायचं धाडसचं व्हायचं नाही. त्यांचं इतकं रेखीव वागणं पाहून मला आपलं वाटायचं की सर ब्रह्मचारी आहेत म्हणून. पुढं सुलभा ज्युनिअर बी. ए. ला आल्यानंतर उलगडा झाला आणि मला तो एक सुखद धक्का होता. सौंदर्य, श्रीमंती आणि प्रतिष्ठा तिन्ही गोष्टी अभावानंच असलेल्या मला ह्या तिन्ही गोष्टी पुरेपूर असलेल्या सुलभाशी मैत्री करणं जमलं नाही – आणि खरं सांगायचं तर करावीशी वाटलीही नाही त्या काळात! अशा व्यक्तींची आणि ह्या गोष्टींची अवास्तव किंमत असलेल्या ह्या जगाची धास्ती घेतली होती मी! पुढे कारणा कारणाने ओळख झाली आणि समजलं की ही माणसंच वेगळी आहेत. पुष्कळ गोष्टीत समान आस्था असल्याची जाणीव झाली. ती सौ. प्रमिलाबाईशीही (ताईशीही) चांगली ओळख झाली आणि पुष्कळसे संकोच नाहीसे झाले.

एकदा सहज सुलभाच्या घरी गेलं असता सरांची अंगणातच गाठ पडली १९५२–५३ ची गोष्ट असावी. बारा एक वर्षांच्या माधवशी सर बोलत होते. त्यांनी सांगितलं 'ते अमके गृहस्थ आले तर त्यांना मी अमुक वाजता परत येईन असं सांग' 'आणि ते गृहस्थ आलेच नाहीत तर?' माधवनं विचारलं. 'हे पहा उगीच irrelevant बोलू नकोस – आले तर निरोप सांग – एवढंच लक्षात ठेव' असंबद्धाची त्यांची चीड दैनदिन जीवनातही किती प्रखर होती याचा प्रत्यय आला. खरं म्हणजे

मी त्यांना पुष्कळ असं रागावलेलं कधीही पाहिलं नाही परंतु त्यांच्या व्यक्तिमत्वात दरारा हा स्थायीभाव असायचा. पण त्यांना सांगितलं की 'सर खरच लोक तुम्हाला फार घाबरतात' तर खळखळून हसून म्हणायचे 'छान! मला घाबरतात?'

१ ऑगस्ट १९६४ – कैरोजवळील जगप्रसिद्ध पिरॅमिडसवर असलेला Sound and Light कार्यक्रम बघायला आम्ही Danforth Foundation चे Fellows गेलो होतो. वाळवंटातील काळीशार रात्र होती संगीत सुरू झालं आणि त्या वाळवंटाच्या काळ्याभोर रंगमचावर एक पिरॅमिड उजळून निघाला. ह्या पिरॅमिडनं आपली जीवन कहाणी सांगितली – राज्ये आली आणि गेली – ऊन-पाऊस अंगावर झेलीत, इतिहासाची साक्ष ठेवून, वर्तमानाचं ओझं शिरावर घेऊन भविष्याकडं तो उजळ माथ्यान चालला होता. भोवतालचं जग त्याच्या मानाने सर्वार्थाने खुजं वाटत होतं. स्वतःचं भान ढळू न देता काळाबरोबर जाणारा अभंग, अजोड व्यक्तीमत्वाचा तो ऋषितुल्य ज्ञानयोगी मला ओळखीचा वाटला आणि सरकन अंगावर काटा आला. सरांची आठवण झाली. तो पिरॅमिड किंचित थरथरला, थोडसं हंसलासुद्धा आणि माझं मस्तक नकळत आशीर्वाद घेण्यासाठी नमलं – क्षणार्धात लख्ख उजेड झाला – संगीत थांबलं आणि एवढा वेळ पापणीच्या काठाशी थरथरणारे दोन थेंब खाली पडले. बाहेर पडताना इजिप्तच्या प्रसिद्ध अलाबास्टर स्टोनचा एक पिरॅमिड खरेदी केला – सरांना द्यायला – पण ठरवलं की ज्यावेळी हा अनुभव त्यांना कथन करण्याचं धैर्य माझ्या अंगी येईल तेव्हाच द्यायचा. तो योग १९६८ साली आला - आणि कथनही पत्रातूनच केलं.

माझ्या भाग्ययोगानं मी १९६६ मध्ये गोखले अर्थशास्त्र संस्थेत आले आणि मला १९६७-६८ हे वर्ष दिल्लीत काढायचं होतं. योगायोग असा की सरांची नियोजन मंडळाचे उपाध्यक्षपदी सप्टेंबर १९६७ मध्ये नियुक्ती झाली. दिल्लीत मी कुठ राहावं याचा विचार करू लागले. कुणीतरी म्हटलं–आता काय, तुझे सर जाताहेत ना तिकडे तेथेच पहिले काही दिवस रहा–मन उचंबळून आले–कसं विचारावं–आमची नेहमीची मध्यस्थ-सुलभा तर अमेरिकेत होती. धाडस करून विचारलं सौ. ताईंना आणि दिल्लीला गेले ते काम संपेपर्यंत त्यांचेकडेच राहिले. एवढंच नव्हे तर नंतरही जावं तेव्हा हक्काचं घर मानलं ते. सांगायची गोष्ट १ सप्टेंबरला सर नव्या नेमणुकीवर रुजू होणार होते. सौ. ताई अजून दिल्लीत आलेल्या नव्हत्या. मला तर अगदी मनापासून नव्या नेमणुकीवरील पहिल्या दिवशी शुभेच्छा देण्याची प्रबळ इच्छा होती. आता त्या मी कशा व्यक्त कराव्यात? कोणत्या शब्दात शुभचिंतन करावं? माझ्या वयाच्या, मानाच्या आणि संबंधाच्या मर्यादा लक्षात घेऊन मन अगदी भांबावून गेलं. अतीव आदर आणि अतीव प्रेम दोन्ही ठिकाणी शब्द मुके होतात. काही सुचेना. शेवटी एक युक्ती सुचली. म्हटलं आपण सरांना औक्षण करावं–त्यामध्ये, शुभचिंतन, सदिच्छा सर्व येईल. एक शब्दही

न बोलता ते सर्व कळेल त्यांना. पण मुख्य अडचण होतो हे विचारायचं कसं? प्रखर बुद्धिवादी माणसाला हे औक्षणाचं खूळ रुचेल का? काय म्हणतील?—असं म्हणतील? "हं हे काय"—किंवा अगदी कटवून म्हणतील का?—" छे तसलं काही नको" ते काय म्हणतील ते ऐकून घेण्याची मनाची तयारी केली. एक निरांजन पैदा केलं—औक्षणाची तयारी ठेवली आणि सकाळी न्याहरीचे वेळी हळूच भीतभीत विचारलं—" माझ्या असं अस मनात आहे. तुमची काही हरकत आहे का? करू ना मी औक्षण?" "हो—जरूर कर—अरे पण थांब. मग मी स्नान करून येतो—स्नान झालं—मग 'थांब टोपी पाहिजे नाही का आता? पूर्व कुणीकडे हं कर आता' जे शब्दानं व्यक्त करता आलं नसतं ते त्या लहानशा संस्कारानं केलं—मनात म्हटलं 'अंधकारातल्या त्या प्रकाशमयी पिरॅमिडसारखे आहात सर तुम्ही. या देशाला तिमिराकडून तेजाकडे न्या—आणि न्यालच ही माझी अढळ श्रद्धा आहे"

दिल्लीच्या वास्तव्यात ह्या पिरॅमिड भोवती मी थोडीफार जवळून फिरले. स्वतःच खुजेपण लक्षात असूनही ती सौ. ताईचं बोट धरून भोवती भोवती राहिले. थोडं निरखून पाहिलं—आणि त्यात कधी खळाळणाऱ्या हास्याचे झरे दिसले तर कधी रसिकतेची हरळी तर कधी मिस्किल किंचित उपरोधिक चेष्टेची काटेरी कोरांटी. त्यांच्याबद्दल लोकातील समजुती—गैरसमजूती मजेनं चर्चेला निघाल्या की ते अगदी ठराविक एका गूढ पद्धतीनं हसत—त्यावरून काही समजूचं नये कुणाला. आणि खरंच आहे—सागरासारखं त्यांचं व्यक्तीमत्त्व! इतकं खोल!! पिरॅमिडसारखं त्यांचं व्यक्तिमत्त्व! इतकं उत्तुंग आणि अनेक पदरी!! त्यांच्या सबंध जीवन तत्त्वज्ञानात कुठं सत्कार समारंभ बसत नव्हते त्यांनी पद्मश्री आणि पद्मविभूषण असले सरकारी मानसन्मान विनयपूर्वक परंतु निग्रहानं नाकारले होते. तेच सर त्यांच्या भाबड्या सहकाऱ्यांनी आणि भक्तांनी केलेल्या सत्काराला निमूटपणे मान तुकवीत होते—माझ्यासारख्या एका सामान्य मुलीच्या औक्षणाचा बसायचं म्हटल्यावर तत्परतेनं त्याची तंत्र पाळीत होते. लोकाराधना का ही? की स्वभावातील ऋजुता? की दुसऱ्याला न दुखवण्याची भावना? ह्यासाठी त्यांना मनाशी द्वंद्व करावं लागलं असेल का? लोकोत्तर व्यक्तिमत्त्वाच्या अनेक पैलूबद्दलचे असले प्रश्न अनुत्तरितच राहतात. ह्या पंचवीस—अधिक-उणे-वर्षांच्या काळात हळूहळू उलगडत गेलेलं सत्य—आणि दिल्लीच्या वास्तव्यात थोडंफार जवळून जाणवलेलं सत्य आहे ते हे की माझे सर एक 'पूर्ण पुरुष' होते. (त्यांच्या जीवन ज्योतीतील तेल संपलं तरी तेज संपणार नाही. कधीही संपणार नाही) ते ज्ञानयोगी होते परंतु व्यवहाराकडे पाठ—फिरवून ज्ञानाच्या मागे लागणारे नव्हते म्हणूनच ते कर्ते अर्थशास्त्रज्ञ होते. त्यांना रूढार्थाने 'समाजवादी' म्हणायचं की नाही कोण जाणे. परन्तु समाजाबद्दलची अतीव कणव, जाण आणि विश्वास असलेले खरेखुरे 'समाजवादी' होते. देवावर त्यांचा विश्वास होता की नाही हे मला माहीत नाही. परंतु

माणसातल्या देवत्वाचे ते पूजक होते आणि दुसऱ्या कुणी त्यांना भक्तीभावानं देवत्व बहाल केलं तर देवत्व भक्ताच्या भावनेत असतं ह्या जाणीवेनं ते त्याला विरोध नाही करायचे. सर आणि ताई-सर्वार्थानं सहचर बनले. त्यांच्या परस्पर भावनेतील कोवळीक पाहणाऱ्याला सुद्धा पुलकित करणारी होती.

जनतेनं, सहकाऱ्यांनी त्यांना अमाप प्रेम दिलं—कुठल्याही पंथाच्या, विचार-सरणीच्या आणि वयाच्या व्यक्तीला सरांविषयी नितांत आदरच वाटावा असंच त्यांचं व्यक्तिमत्त्व होतं ते प्रसिद्धीला सामोरे गेले नाहीत, परंतु तीच त्यांच्या मागे लागली. सत्कार त्यांच्या पाठीशी हार हातात घेऊन धावत राहिले आणि आयुष्यातील १०० व्या नेमणुकीची वस्त्रं त्यांनी खाली उतरवली—आणि आता निवांतपणानं—आयुष्यात प्रथमच—रहायचं असं ठरवलं पण काळानं त्यांच्यावर अचानक झडप घातली. उभ्या आयुष्यात ज्यांनी कधीही औचित्यभंग केला नाही, त्यांना नेणाऱ्या काळाला मात्र औचित्य सांभाळता आलं नाही!

तिऱ्हाईताच्या दृष्टीनं विचार केला तर मी त्यांच्या ना नात्याची ना गोत्याची! त्यांच्या चौफेर कार्यक्षेत्रात कोणत्याही एका कार्यक्षेत्रात त्यांच्या हाताखाली काम करण्याचं भाग्य न लाभलेली. त्यांच्या आयुष्याच्या बहुरंगी मैफलीत बसण्याचं आमंत्रण न मिळालेली—त्यांच्या असंख्य पूजकांपैकी मी एक नाचीज. त्यांच्या कृपेच्या अमृतकलशातील चार थेंब सौ ताईंच्या आणि सुलभाच्या हाताने माझ्या अंगावर पडून पावन झालेली, पुलकित झालेली मी एक वाटेवरची वाट-सरू. त्या चार थेंबात होतं संजीवनीचं सामर्थ्य आणि गंगेचं पावित्र्य. त्या चार थेंबात होतं माझं सबंध आयुष्य उजळून टाकणारं तेज आणि आयुष्यभर पुरेल एवढी ऊब.

माझ्या हृदयावर निखारे ठेवल्यासारखी ती वार्ता ऐकून माझं काळीज करपून गेलं. तर ज्यांनी त्यांच्या जीवनाच्या मैफलीत वात्सल्याचे कोमल, प्रीतीचे गहिरे आणि कर्तृत्वाचे झळाळणारे रंग भरले आणि त्या रंगात जे न्हाऊन निघाले त्यांना या वार्तेनं काय वाटलं असेल!!

□ □ □

# साहित्यिक कलकत्ता

शतपावली

रवींद्र पिंगे

शेजाऱ्याच्या अंगणात डोकावणं हा ग्रामस्थांचा धर्म. शेजारणीच्या चुलीवरल्या कालवणाचा वास घेणं हा गृहिणीचा धर्म. त्याचप्रमाणे शेजारच्या लेखकाच्या खिशात पडणाऱ्या मानधनाचा हिशोब ठेवणं हा साहित्यिकाचा धर्म आहे. माणसाने आपल्या धर्माला जागावं. ह्या इहलोकी ते बरं असतं. मुंबईत ऐकलं होतं की बंगाली भाषेतल्या आघाडीवरल्या डझनभर लेखकांच्या मोटरगाड्या आहेत आणि चरितार्थासाठी त्यांना आड-धंदे करावे लागत नाहीत. आपल्या घरी बसून ते कागद लिहितात. कागद प्रकाशकांकडे जातात. नोटा लेखकांकडे येतात. मी हुरळून गेलो. बंगाली लेखकांच्या ह्या जादूवर खूष झालो. कलकत्त्याच्या पळापळीच्या मुक्कामातला एक संपूर्ण दिवस लेखकांच्यात आत–बाहेर करीत घालवायचं नक्की केलं. एरवीतरी मी सरस्वतीच्या नावाने कुंकू लावतोच आहे. तेव्हा भले गाडीमाडीवाला बंगाली लेखक झाला, तरी त्याच्याशी समानतेच्या पातळीवरच बोलायचं ही खूणगाठ मनाशी मारून कलकत्त्याच्या उकडल्या हवेत झोपी गेलो. सकाळी उठून वर्तमानपत्र उघडतो, तर पहिल्या पानावर पुढील बातम्या जाड ठशात छापलेल्या आढळल्या :

जलपैगुडीच्या वीज कामगारांना पगाराच्या दिवशी पगार न वाटल्यामुळे प्रक्षुब्ध होऊन त्यांनी वीजेच्या मुख्य तारा कापल्या. पगार आपल्या हातावर पडेपर्यंत अर्धा बंगाल मिट्ट काळोखात चाचपडत राहील अशी त्यांनी चोख व्यवस्था केली आहे !

दामोदर धरणाला धोकादायक ठरलेलं फुगोटयाचं पाणी चोर दरवाज्यांनी सोडन दिल्यामुळे हौरा, हुगळी आणि मिदनावर हे तीन जिल्हे पाण्याखाली गेले आहेत. पाण्याच्या ह्या अनपेक्षीत लोंढयांमुळे ऐंशी हजार झोपडीवाले एका रात्रीत निर्वासीत झाले आहेत !

जादवपूर विद्यापीठात परीक्षा चालू असताना बाहेरचे विद्यार्थी आत घुसले आणि त्यांनी पेपरांसकट सर्व पुस्तकांची आणि सामानसुमानाची होळी केली !

चोवीस परगणे विभागात तुफान वृष्टी होऊन नद्यांना पूर आले आहेत. त्यामुळे साडे चार लक्ष खेडूत अडकून पडले आहेत. सरकार त्यांना विमानातून आटा वाटायचा विचार करीत आहे !

ह्युमॅनिटी असोसिएशन आणि कॅथॉलीक रिलीफ सर्विसेस ह्या जोड संस्थांनी दहा हजार पूरग्रस्त बालके देखभालीसाठी आपल्या ताब्यात घेतली आहेत !

स्कॉटिश चर्च कॉलेजवर विद्यार्थ्यांनी तुफान बाँबहल्ला चढवला !

कलकत्ता विद्यापीठाचे विद्यार्थी परीक्षेत कॉपी करण्याचे अखंड व्रत सोडत नाहीत म्हणून शिक्षकवर्गानेच परीक्षांवर बहिष्कार घातला !

जीवनकृष्ण मैती ह्या अतिजहाल नेत्याचा मुडदा पाडण्यात आला !

वृत्तपत्रं मिटलं. काय समजायचं ते समजलो. एक गोष्ट मात्र अजिबात समजेना की ह्या अशा उकळत्या, हताश वातावरणात ललित साहित्याची निर्मिती होते तरी कशी, दारिद्र्याने पिचलेल्या वाचकांकडून साहित्याला आश्रय मिळतो तरी कसा, नि पेटलेल्या घराच्या छपरावर बंगाली साहित्याचं निशाण फडफडतं तरी कसं ?

निर्मलदास म्हणाला, ' विकत घेऊन साहित्य वाचायचं ही आमच्या बंगाल्यांची गेल्या शंभर वर्षांची परंपरा आहे '

' पण बंगालमध्ये लोकांना नोकऱ्या नाहीत, पैसे नाहीत–'

' तरीसुद्धा जो काही रुपया, दीड रुपया असेल त्यातले चार आणे तो एखाद्या साप्ताहिकासाठी टाकेल. म्हणून तर बंगाली साप्ताहिकांचा खप साठ–सत्तर हजारांच्या घरात असतो. ' देश ' साप्ताहिकाच्या, मला वाटत, पासष्ट हजार प्रती काढतात. मात्र वाचकांची एक अट असते. त्यांना प्रत्येक अंकात क्रमशः प्रकाशीत होणाऱ्या कादंबऱ्यांची प्रकरणं असावीच लागतात. अगदी शरदबाबू, रवींद्रांपासून तहत आजच्या विमल मित्रांपर्यंत सर्व कादबरीकार आपल्या कादंबऱ्यांचो प्रकरणं साप्ताहिकातून आणि मासिकामधून क्रमशः प्रसिद्ध करतात.'

, बंगाली वाचकांना निव्वळ साहित्यिक मजकूर देणारी साप्ताहिक आवडतात की–'

'कालमानाप्रमाणे सध्या चित्रपट सृष्टीची खबर पुरविणारी साप्ताहिकं जोरात आहेत. 'सिनेमाजगत' आणि 'उल्टोरथ' ही दोन सिनेसाप्ताहिकं धमाल खपतात. त्यांचे खास अंक पाचशे पानांचे असतात. प्रत्येक खास अंकाची तीन ते पाच रुपयांपर्यंत किंमत असते आणि अशा महागड्या खास अंकांच्यासुद्धा तीन–चार आवृत्त्या निघतात.'

'कमाल आहे!'

'कमाल कसली? पैसे खर्च करून वाचायचं आमच्या वाचकांना शंभर वर्षं वळण लागलं आहे.'

'तुमच्या लेखकांची चांगलीच चलती असेल.'

'हो. आज कलकत्त्यावर केवळ लेखणीवर जगणारे असे वीस तरी लेखक आहेत. अर्थात, ते क्रमशः प्रकरण प्रसिद्ध करणारे कादंबरीकार आहेत. पुढे त्यांच्या कादंबऱ्यांवर नाटकं–सिनेमे निघतात. त्यातून त्यांना पैसा सुटत असणारच. पण त्या क्षेत्रातल्या कमाईचे खरे आकडे कोण कशाला सांगणार? आपण राष्ट्रीय ग्रंथालयात जाऊ या. तिथे बंगाली लेखक भेटतील.'

अलिपूर जेलच्या पिछाडीच्या एका बंगाला गर्द झाडी आहे. झाडीच्या मागे प्रचंड उद्यान आहे. उद्यानात एक प्रचंड प्रासाद आहे. हा प्रासाद म्हणजेच भारताचे राष्ट्रीय ग्रंथालय. भारतात प्रसिद्ध होणाऱ्या प्रत्येक प्रकाशनाची एक प्रत ह्या राष्ट्रीय ग्रंथालयाला कायद्यानेच द्यावी लागते. त्यामुळे लाखो नव्याजुन्या पुस्तकांचा संग्रह ह्या इमारतीत आस्थापूर्वक करण्यात आला आहे. कलकत्ता जेव्हा हिंदुस्थानाची राजधानी होती, तेव्हा हा प्रासाद म्हणजे व्हॉईसरॉयचे निवासस्थान होते. त्याच्या इतमामासाठी उद्यान तयार केलं. आता ते अनायासे ग्रंथालयाला मिळालं आहे. वॉरन हेस्टिंग्ज इथे राहून गेला. ग्रंथालयात भाषावार विभाग आहेत. मराठी ग्रंथविभागाचं दप्तर लेखक असलेले श्री. श्री. बा. जोशी पहातात. जोशी म्हणाले,

'अगोदर बाग बघू या. कारण सहसा अन्यत्र कुठेही न दिसणारा सुंदरी वृक्ष इथे आहे.'

'सुंदरी?' मी आश्चर्याने विचारलं.

'हो. गंगा नदी जिथे सागराला मिळते तिथे प्रचंड दलदल तयार झाली आहे. हिमालयापासून आलेला सगळा गाळ तिथे जमतो. त्या दलदलीत हे सुंदरी वृक्ष निर्माण झाले आहेत. तिथे चिखल माखला आहे. दुसरं काहीच होत नाही. फक्त सुंदरी वृक्षांचं घनदाट अरण्य. म्हणून आता त्या भागाला सुंदरबनच म्हणतात. ह्या सुंदरबनात विषारी डासांची आणि बंगाली वाघांची वस्ती आहे. त्यामुळे तिकडे सहसा कुणी फिरकत नाही. साहजिकच सुंदरी वृक्ष अन्यत्र कुठे दिसत नाही.'

सुंदरी वृक्ष पाहिला. इतर जंगली झाडांसारखेच ते एक आडमाप फोफावलेलं

गर्द पानांचं उंच वाढणारं झाड आहे. ताकाच्या रवीला दही घुसळायला जसे रवे किंवा पाकळया असतात, तशा फळयांसारख्या दिसणाऱ्या मूळांच्या जाडजूड पाकळया त्याच्या बुंध्याशी खोडाच्या सभोवार वाटोळया गतीने गेलेल्या असतात. सागराच्या लाटांच्या माऱ्यापासून आणि सरकणाऱ्या चिखलाच्या आक्रमणापासून वृक्षाचे संरक्षण करण्याकरीताच सृष्टीची ही किमयागारी दिसली. ह्या सागर-कन्येच्या अंगाला सागरपाण्याचा खारट वासही आहे.

राष्ट्रीय ग्रंथालयात ज्ञानाचं अग्निहोत्र सतत धुमसत असतं. निरद चौधरी, विमल मित्र वगैरे मंडळी ह्या ग्रंथालयातच ठिय्या देऊन असतात. कारण वाटेल त्या विषयावरची, वाटेल त्या भाषेतली, अमाप ग्रंथसंपत्ती इथे हाताशी असते. लाखावारी ग्रंथांची इथे कार्डं आहेत. लाखावारी लेखकांची सूची आहे. म्हटलं, पिंगे कुळात किती ग्रंथकार आहेत ते ह्या कार्डावरून पहावं. योग असा की, नेमकं माझ्याच नावाचं माझ्याच एका भाषांतरीत पुस्तकाचं कार्ड ह्या संशोधनात माझ्या हातात पडलं !

बाहेर उद्यानात शिडशिडीत अंगलटीची एक प्रौढ बाई येताना दिसली. जोशी म्हणाले, 'ही जुथिका बसु. ही मराठी कथांची बंगाली भाषांतरं करून ती इकडल्या मासिकातून प्रसिद्ध करते.'

'आपण काय करता ?' मी विचारलं.

'मी इथेच ग्रंथालयात काम बघते. फावल्या वेळात मराठी कथा भाषांतरीत करते.'

'तुम्हाला मराठी भाषा येते ?'

'हळूहळू शिकत आहे.'

'बरं, तुम्ही कोणते लेखक भाषांतरासाठी निवडले आहेत ?'

'कमला फडके, विजया काळे, शरश्चंद्र चिरमुले.'

'किती कथा प्रसिद्ध केल्यात ?'

'दोन-तीन.'

'किती मानधन मिळतं ?'

'पंचवीस रुपये.'

'भाषांतराकडे तुम्ही का वळलात ? मराठी कथा तुम्हाला वाङ्मयीन दृष्ट्या समृद्ध वाटते म्हणून ?'

'त्याहीपेक्षा, मला मीठमिरचीला दोन पैसे सुटतात हे कारण अधिक खरं आहे. तुमच्या कथाही सुटसुटीत नि संसारीक असतात. शिवाय, मी मराठी विभागात पुस्तकं लावण्याचं काम बघते. साहजिकच मराठी कथावाङ्मय माझ्या हाताशी असतं. अशी अनेक कारणं आहेत.'

पृष्ठ ५२ वर

सौ. पुष्पा भावे

# रंगायनच्या चार एकांकिका

यातनाघर
कैफियत
उषाशी खलाशी
गर्भार वर्तमान

मराठ रंगमंचावर एकांकिकांचे प्रयोग, स्पर्धा वा महाविद्यालयाची स्नेहसंमेलनें वजा करता सहसा केले जात नाहीत. तीन अंकी नाटक हा एकच नाटयप्रकार प्रेक्षकां ा सादर करण्यासारखा आहे, असे का कोण जाणे, मानले जाते. पाश्चात्य रंगमंचावर Double-bill या नावाने केले जाणारे एखादे दोन अंकी (वा काही प्रवेशांचे) नाटक आणि एक वा दोन एकांकिका, असे प्रयोग आपल्याकडे सादर केले जात नाहीत. मुंबईची 'रंगायन' ही प्रायोगिक नाटयसंस्था मात्र वरचेवर एकांकिकांचे प्रयोग निष्ठेने सादर करते. रंगायनच्या पूर्वीच्या काळातही सौ. विजया मेहता (तेव्हाच्या विजया जयवंत) यांनी 'भारतीय विद्याभवना'तील नव्या कलाकारांच्या साहाय्याने वा 'मुंबई मराठी साहित्य संघा'च्या वतीने श्री. विजय तेंडूलकर, श्री. पु. ल. देशपांडे यांच्या एकांकिका सादर केल्या होत्या. किंबहुना मुंबई शहरातील कलाकार व प्रेक्षक यांच्या मनातील नवरंगभूमीविषयीच्या अपेक्षा व जाणीवा वरील एकांकिकांच्या प्रयोगाच्या वेळीच प्रथमतः प्रगट झाल्या होत्या. 'रंगायन'सारख्या संस्थांनी एकांकिकांचे प्रयोग सातत्याने केले पाहिजेत, तरच तीन अंकी नाटकाच्या रूढ रचनेपेक्षा वेगळया रचनांचे प्रयोग, लेखन व स्वागत अधिक उत्साहाने होऊ शकेल.

गतवर्षी 'रंगायन'ने केलेल्या 'होळी' आणि 'सुलतान' या एकांकिकांच्या प्रयोगापासून त्यांनी छोटे सभागृह निवडण्याचा केलेला प्रयत्न, दर्शनी पडद्याची दूर केलेली अडचण इ. इ. स्वागतार्ह आहे. गेल्या दोन आठवडयात, 'रंगायन'ने एका वेळी दोन असे चार नव्या एकांकिकांचे प्रयोग सादर केले. श्री. महेश एलकुंचवार यांच्या 'यातनाघर' व 'कैफियत' या दोन एकांकिका, श्री. वृंदावन दंडवते यांची 'उषाशी खलाशी' व श्री. अशोक शहाणे यांची 'गर्भार वर्तमान' अशा या चार एकांकिका. 'यातनाघर' ही श्री. एलकुंचवारांची एकांकिका, एकाकी घरात जगणाऱ्या एका पंगू–विकृत मुलीभोवती गुंफलेली आहे. या एकांकिकेचे वाता-

करण भकास, भयानक असे आहे; ते सौ. मेहतांनी एकांकिकेच्या प्रत्यक्ष प्रयोगात नेमकेपणाने उभे केले आहे. स्वतःच्या सौंदर्याविषयीच्या भ्रामक कल्पनांमध्ये रमणारी पांगळी बेबी स्वतःच्या भावाच्या शरिराच्या आकर्षणाने हतबल झाली आहे; परंतु प्रत्यक्षात ती आणि कुरुप कमल यांच्यातील समलिंगी आकर्षण द्वेष आणि आसक्तीत हेलकावे खात आहे. ही एकांकिका पाहात असताना त्यातील काही लेखनदोष विशेष खटकले. एक प्रामुख्याने जाणवलेला दोष म्हणजे श्री. एलकुंचवारांची नाट्याविषयीची संकल्पना आणि त्यांचे संवादलेखन यामधील विपर्यस्त अंतर हा होय. गडकऱ्यांच्या ज्या अलंकृत भाषाशैलीला आपण आज नाटकाच्या दृष्टिकोनातून दोषास्पद मानतो, त्याचाच एक अधिक चतुर पण नाट्यप्रतिभेच्या दृष्टिकोनातून तितकाच भयावह अवतार आपल्याला श्री. एलकुंचवारांच्या भाषाशैलीतून जाणवतो. ज्या एकांकिकाराला मानवी मनाच्या लळिताचा धीट, रसरशीत दृश्य आविष्कार करण्याचे सामर्थ्य आहे त्याने शब्दांच्या स्पष्टीकरणात्मक मोहक रचने लागे का लागावे कळत नाही. त्याचप्रमाणे 'यातनाघर' एकांकिकेची रचनाही (घटनात्मक) नको तितकी सुबक आहे. अर्थात नाटललेखनाविषयी सविस्तर लिहिण्याचे हे स्थळ नव्हे. वरील एकांकिकेतील बेबीची, अतिशय अवघड भूमिका कु. मीना सुखटणकर या तरुण, मेहनती नटीने केली, तर कमलची भूमिका, 'रेखा' या एकेकाळी मराठी चित्रपटात गाजलेल्या नटीने केली. या दोघी बहिणींच्या अभिनयाने श्री. एलकुंचवारांच्या शब्दाला जें दृश्य सामर्थ्य प्राप्त झाले ते विलक्षण होते. मराठी रंगमंचाला अपरिचित असलेला समलिंगी आकर्षणाचा अनुभव रेखाने आपल्या अभिनयातून ज्या धिटाईने व्यक्त केला ते पाहताना ही गुणी नटी मराठी चित्रपटात आणि 'कौटुंबिक' नाटकात वाया जाते आहे ही अनेकांना पूर्वीच जाणवलेली खंत पुन्हा ताजी झाली. 'रंगायन'ने रेखाबाईंना आपल्या जाणत्या उत्साही संघात समाविष्ट केले तर ही खंत निश्चित नाहीशी होऊ शकेल. कु. मीना सुखटणकर या नटीच्या बोलण्यात व्यक्तिगत लकबी अगदी प्रारंभीच्या काळापासून जाणवत असत. अलीकडे या लकबींमुळे पात्र वैशिष्ट्याच्या आड त्या येणार की काय अशी ही शंका निर्माण होऊ लागली होती. परंतु विजयाबाईंच्या कुशल दिग्दर्शनामुळे व कु. सुखटणकरांच्या डोळस अभिनयाने या एकांकिकेत, बेबीच्या पात्र निर्मितीच्या आड कु. मीना सुखटणकर हे परिचित व्यक्तिमत्त्व आलेल दिसले नाही. या तरुण नटीकडे सहज लोकप्रियता मिळविण्यासारखे प्रसन्न व्यक्तिमत्व असूनही ज्या निष्ठेने ती 'रंगायन,' 'अमृत नाट्य भारती' अशा प्रायोगिक संस्थांशी संबंध ठेवीत आहे ती निष्ठा कौतुकास्पद आहे. 'कैफियत' या एलकुंचवारांच्या एकांकिकेचा नायकही 'यातनाघर'च्या नायिकेप्रमाणे काहीसा विकृत आहे. एका पाच वर्षांच्या मुलाचा खून केल्याच्या आरोपावरून त्याला न्यायालयात आणले जाते. प्रत्यक्ष साक्षी ऐकत असताना त्याला आपल्या गतकालातील व्यक्ती

भेटल्याचा भास होतो – त्यातून तो त्याची कैफियत सादर करण्याचा यत्न करतो. खटला व नायकाला होणारे भास अशा दोन पातळ्यांवर ही एकांकिका सादर केली जाते.

एखाद्या खटल्याच्या रूपाने स्वतःच स्वतःचा न्याय करण्याची कल्पना आधुनिक पाश्चात्य वाङमयातील एक मूलभूत संकल्पना आहे. श्री. एलकुंचवारांनी तीन स्त्रियांच्या स्मृतींच्या रूपाने नायकाची जी कैफियत सादर केली आहे. ती फार वरवरची वाटते, त्या चित्रकार नायकाच्या मूलभूत जाणीवेशी नाटककार पोचत नाही. या एकांकिकेचे दिग्दर्शन व त्यातील प्रमुख भूमिका श्रीं. अशोक साठे यांनी केली होती. दिग्दर्शन म्हणून प्रत्यक्ष खटला व आरोपीला होणारे भास या दोन पातळ्या त्यांनी फार चांगल्या सांभाळल्या होत्या. तसेच न्यायदानात प्रेक्षकांना सामील करुन घेण्याची कल्पनाही चांगली प्रस्थापित केली. परंतु त्यांचा अभिनय मात्र अजूनही भडकपणाकडे कलत असतो. त्या एकांकिकेपुरते बोलायचे तर एलकुंचवारांचे लेखनदेखील त्या भडकपणाला कारणीभूत आहे. (तीच गोष्ट 'गिधाडे' या नाटकातील त्यांच्या कवीच्या भूमिकेची) एक मेहनती, उत्साही नट म्हणून त्यांची ख्याती लक्षात घेता, त्यांनी या गोष्टीकडे अधिक लक्ष पुरवावयास हवे. आयत्यावेळी न्यायासनावर बसलेल्या न्यायाधिशाची भूमिका श्री. प्रदीप वेलणकर या नव्या नटाने समजन केली. यातील दोन स्त्री भूमिका सौ. विद्या आपटे ('द्रौपदी' फेम) व कु. निगुडकर यांनी केल्या होत्या. सौ. आपटे रंगमंचावर नव्या असूनही विलक्षण सहजतेने वावरतात. परतु नाटककाराच्या मनातही या पात्र रेखेविषयी स्पष्टता नसल्यामुळे त्यांची काहीशी कुंचबणा झाली होती. कु. निगुडकरांच्या अभिनयातील धिटाईदेखील त्यामुळेच वाया गेली.

## कमकुवत 'खलाशी'

श्री. वृंदावन दंडवते यांची 'उदाशी खलाशी' ही एकांकिका लेखनातच इतकी कमकुवत होती की श्री. सुरेश भागवत या तरुण दिग्दर्शकाची मेहनत स्वतः श्री. दंडवते, श्री. बाळ कर्वे, श्री. कुलकर्णी यांचा अभिनय ही एकांकिका सावरू शकले नाहीत. परंतु दंडवते एकांकिका लेखनाचे प्रयोग विविध दिशांनी करीत आहेत; त्यामुळे अशा अपयशांनाही एक मोल आहे. कधीतरी श्री. दंडवते यांच्याकडून लक्षणीय एकांकिका लिहिल्या जाणार अशी जवळजवळ खात्री असल्यामुळे 'रंगायन' चा प्रेक्षकवर्ग न कुरकुरता ही अपयशे पाहाणार आहे.

श्री. अशोक शहाणे यांची 'गर्भार वर्तमान' ही (रूपांतरित) एकांकिका, प्रारंभी छोट्या वर्तुळात स्वतुष्टतेने जगणाऱ्या सामान्यांचे विडंबन करणारी वाटली; परंतु नतर तिचा योग्य विकास होऊ शकला नाही. या एकांकिकेचे दिग्दर्शन व तिच्यातील अभिनय, तिचा नवेपणा समजून घेणारा होता. परंतु मूळ लेखनातच तंत्र

पृष्ठ ५१ वर



# पुसीतेडाक्का

आता झोप उडून जाते......

स्फोटामागून स्फोट कानावर आदळतात – ब्राह्मणबारीयात सेबरजेट विमान घालतात. चौकाचौकातून घोळके जमतात. हवेत वावड्या उडतात. सत्यापक्षा आलाप जास्त – हद्दीपलिकडे जावे वाटते जिवाची पण भीती वाटते – नाही नाही म्हणता लॉजची गच्ची लांब दूरच्या ज्वाला दाखवते. मग रोजचीच एक सकाळ होते. सकाळ कसली, ' शामेगम ! ' हॉटेलचा पोऱ्या ' न्युज ' देतो. मेलेल्यांची संख्या भूमिती श्रेणीने वाढवीत जातो. आपल्यासारखं चीज व्हावं म्हणून हद्दीपार जाऊ म्हणतो तोच तीन नंबरवाला बजावतो.—

Don't go there, there is no life security.'

तीन नंबरवाल्याचे नाव 'इफ्तीकार अहमद' आहे. सारे त्याला 'टीपू' म्हणतात. बिचारा निर्वासीत आहे पण रोज व्हिस्की पितो. अवामी लीगचा पाठीराखा पेपर 'द पीपल' आणि बंगाली दैनिक 'कनो बांगला' त्याच्या कुटुंबियांच्या मालकीचे. सुखवस्तु तरुण असतात तसाच तोही आहे – त्याच्याकडे ऐकण्यासारखे काही नाही –

पोस्ट ऑफीससमोर माडगुळकरांचा 'झेल्या' भेटतो. हल्ली सायकल रिक्षा ओढतो म्हणतो. हद्दीपार पोचवायचे तीन रुपये मागतो. कबूल करावेच लागतात. वाटेत कार्ड घ्यायला निर्वासितांनी एकच हुल्लड माजवली आहे – लहान पोरं केविलवाणी रडत आहेत —

ऑल दिज ब्लडी पॉलिटिशीयन्स – मिश्चिफ मॉंगरस् !

शेजारचा सरदार उगीचच कावतो – मी हसण्यावरी नेतो, बळेच !

समोर बी. एस्. एफ च्या लोकांचा चांगलाच पहारा आहे. हद्दीपलीकडे स्वतंत्रपणे जाणे पत्रकारांनासुद्धा शक्य नाही. आत जायचे झाल्यास बी. एस्. एफ, सरकारी गाड्या, अवामी लीगची सहाय्यता घ्यावी लागते – त्यांचेबरोबर आत गेल्यास 'राजकीय वार्तापत्रे' ऐकावयास मिळतात. जनतेचे मनोगत नाही.

---

## अनिल बर्वे
## लेखांक चार

---

मग, झेल्याबरोबर मी भाताच्या खाचरात उतरतो. एप्रिलचा महिना आणि हिरवीगार भाताची रोपं – मन उगाचच मोहरून जाते जशी चुलखंडावरल्या टोपातून आंबेमोहराची पेज सांडते.

आमार बांगला – सोनार बांगला – माणसंच तेवढी मातीची ! गुडघाभर चिखल त्याच मातीचे बनवते —

तिरंगा मागे पडतो आणि पाकिस्तानी हद्दीची जाण येते. भाताची रोपं मात्र इथून तिथून सारी सारखी भासतात – परदेशात असल्याचा विश्वास वाटत नाही. झेल्या परत फिरतो. मी रस्त्याला लागतो. पाकिस्तानी चेकपोस्टापासून फर्लांगभरावर पाक कस्टम अधिकाऱ्यांची पिवळी घरं आहेत. पाच पंचवीस घरांची ही टूमदार कॉलनी आता 'लीबरेट' झाली आहे. निर्वासीत तेथे बाडबिस्तारा पसरत आहेत. शेजारच्या दर्ग्यावरचं फाटकं निशाण अजून फडफडत आहे – दोन म्हातारे संशयाने बघतात – हळूहळू बघेही जमू लागतात – घोळका वाढू लागला तसा मी बावरलोच. कारण माझ्याबाबत दोन धोके होते – सर्व सामान्य बंगाली माझ्या हिंदीला उर्दू

समजून आणि मला ' बिहारी ' समजूत कदाचित मारावयाचा किंवा अवामी लीगवाले मला पंजाबी किंवा ' पिंडीज स्पाय ' समजायचे आणि झोडायचे. क्रांतिकारी असलेल्या किंवा स्वतःस क्रांतिकारी समजणाऱ्या चळवळींच्या ' विनीच्या 'झेंडेदारांकडून ' हा धोका फार मोठा असतो. माझ्या सहवासात असलेले अर्धा डझन कम्युनिस्ट मला निदान एक डझन ' प्रतिगामी ' संघटनाचा हस्तक समजतात.

वाढत्या घोळक्याला ' दमात ' ठेवायचा प्रयत्न करीत दोन ' पँटीतील पोरं ' पुढे आली. जमलेल्या निर्वासीत – खेडूत – ' स्पाय ' मुक्तीफौजेतील सैनिक अशा तत्सम जमावाचे ते ' स्वयंभू लीडर ' होते. दोघेही कोमील्ला व्हिक्टोरीया गव्हर्मेंट कॉलेजचे विद्यार्थी आणि स्टूडंटस् लीगचे उत्साही कार्यकर्ते –

माझं नाव एस्. एम. शहाजनअली B. Sc. आणि हा माझा सहाय्यक ' शहादून अली B. A (Hons). पदवी सहीत त्याने स्वतःची ओळख करून दिली. त्या दोघांचा स्वतःच्या ' विलायती भाषेवरचा ' विश्वास पाहून माझाही आत्मविश्वास दुणावला आणि बऱ्याच मनमोकळेपणाने आम्ही बोलावयास सुरुवात केली.

तुम्हाला आता आमच्या युद्धाची कल्पना आली असेलच ––

" खरंच, लांब दुरच्या झाडाझुडपांपलीकडून धुराचे लोट वर उठत होते. मिनिटा मिनिटाला मशीनगनच्या फेरींचा व शेलींगचा आवाज येत होता. मी उभा होतो तिथून सरळ रेषेत चार मैलांवर गंगासागर पुलाजवळ पाकिस्तानी आर्मी व मुक्ती फौज यांच्यात जोरदार चकमक चालू होती. सेकंड वॉरमधल्या मलेशियात आल्यासारखे वाटले. "

' लिहून घ्या – मुक्ती फौजेमध्ये शेकडो विद्यार्थी सामील होत असून त्यांना शिक्षण देण्याचे काम चालू आहे – लिहून घ्या. मी व माझे काही ' सहकारी ' मुक्तीवाहिनीस अन्नधान्य पुरवणे – संदेश पोचवणे, स्पायजवर लक्ष ठेवणे – टेहळणी करणे व ' नागरी शासनास ' मदत करणे इ. कामे करतो – लिहून घ्या – इंडियन गव्हर्मेंटने आम्हाला चांगल्या प्रकारे मदत केली याबद्दल आम्ही आभारी आहोत. पण लिहून घ्या – आम्हाला मोठ्या शस्त्रांची जरुरी आहे. लिहून घ्या. "

आता मात्र त्याची प्रत्येक गोष्ट लिहून घेणे माझ्या जिवावर आले होते. त्याला बोलता बोलता चालताही केले. सुमारे कोसावर एक गाव पसरले होते. बंगालमधील गावे वसलेली नसतात पसरलेली असतात –

" त्या गावाचे नाव ' धुलेश्वर ' – हजार वस्ती असेल – हद्दीपासून दोन मैल आत आहे. तिथे – लिहून घ्या – नाजीर हुसेन हे येथील अवामी लीगचे सेक्रेटरी आणि दवान खानखदीन हे विद्यार्थी नेते आपणास भेटतील '–

आसपासच्या शेतांमध्ये कोणत्याही प्रकारचे काम चालले नव्हते. आधीच वर्षिक सोळा लाख टनाची तूट असलेल्या प्रदेशात जर शेतीची कामे थांबली तर लोक खाणार काय ? पंजाबी सैनिकांनी साऱ्या ज्यूट गिरण्या नेस्तनाबूत केल्या आहेत

आता ज्यूटचे उत्पन्न बुडणार त्यात पाक चलनाची किंमत पार ढासळलेली. पुढले वर्ष पाक सैन्यापेक्षा बंगाली जनतेलाच कठीण जाणार. सडकेच्या कडेला ठिकठिकाणी निर्वासितांचे आणि खेडुतांचे घोळके बसले होते. त्यांच्या चेहऱ्यावर निश्चित कोणत्या भावना होत्या त्या समजल्या नाहीत पण मर्ढेकरांच्या 'उगिचता' शब्दाचा अर्थ मात्र समजला –

धुलेश्वर गावाच्या वेशीवर एक छोटी नाली वाहते – पाणी कमी पण धारेला ओढ फार, त्या नालीवरचा पूल पासष्टच्या युद्धात पाक सैनिकांनी उडवून लावला आहे. आणि डोंबारी दोर बांधतो त्या पद्धतीने दोन बांबूची जाडी असलेला १५०–२०० फुटाचा बांबूचा हलता पूल उभा केला आहे. अर्थात फक्त पायी चालणाऱ्याना आणि तेही वनवे ट्रॅफीक पद्धतीने हा 'पूल' ओलांडावा लागतो. पूल ओलांडताना जरा 'चित्तथरारक – रोमहर्षक' वाटले. पूलासमोरच चार पाच मुक्ती सैनिक चहा पित होते. त्यांच्याशी गप्पा सुरू केल्या –

आमची मान तुटेल पण वाकणार नाही – शेवटचा माणूस असेपर्यंत लढू – सैन्यवाहीनी देश जॉय करते पारे, किंतू मानुष कें नाय – सैन्य भूमी ताब्यात ठेवू शकते जनतेला नाही. अशा प्रकारची ऐतिहासिक वाक्ये ते घडाघडा सांगत होते. त्यांना बंगालच्या सामाजिक – राजकीय – सांस्कृतिक – आर्थिक जीवनाविषयी विचारणे म्हणजे त्यांना त्यांच्याच जीवनाशी प्रतारणा करण्यास सांगणे होय – "जिथे भावना उद्रेकाने सारा समाज ढवळून निघत असतो तिथे 'ऑब्जेक्टिव्ह रिपोर्ट'चा आव आणणे ही पलायनवादी बुद्धीवाद्यांच्या पठीडीतले हुकमी अस्त्रच." इतर काहीही असो पण त्या 'मक्ती वीराकडे' पाहून खात्री पटली की शत्रूशी लढताना देखील बेटे "दुष्ट चांडाळा घे देवाचे नाव नी हो मरणाला तयार" अशी सुरुवात करीत असावेत.

सिंगल कप चहाचे चाळीस पैसे आणि 'स्टार' या पाकिस्तानी सिगरेट पाकीटाचे, ज्याची मूळ किंमत तीस पैसे आहे तिथे सत्तर पैसे मोजावे लागले – "तरी इथे स्वस्ताई आहे कारण हद्द तरी जवळ आहे. आत चितगावमध्ये घासलेट चार रुपये लीटर – काडेपेटी चार आणे – सिगरेट पाकीट रुपयाला" – शहाजन अली कोमळलेले ग्रामोद्योग – पळणारे निर्वासीत – भडकते भाव आणि वाढता काळा बाजार चालू असताना 'लीबरेटेड एरीयात' अवामी लीगने कार्यक्षम 'नागरी प्रशासन' उभे केल्याचे खोटेच रकाने भारतीय वृत्तपत्रे कशाला भरवतात ? मला तरी कोठेही 'नागरी प्रशासन' अस्तित्वात दिसले नाही. आणि "नव्वद टक्के भाग हा सैन्य नसल्याने लीबरेटच" आहे. तिथे जर अशीच अवस्था काही काळ राहिली तर लोकांचा अवामी लीगवरचा विश्वास उडेल आणि अगतिक होऊन ते लष्कराशी समझोता करून नियमित जीवन सुरू करतील."

चहावाल्याने माझ्याकडून दहाची नोट घेऊन देताना सारी पाकिस्तानी नाणी

नि नोटा दिल्या. आतल्या विभागात भारतीय चलनाची फार तूट भासते–सध्या आवश्यक मालाची सर्व खरेदी त्रिपुरामध्येच होते आणि त्यामुळच ही तूट भासू लागली आहे. त्रिपुरातले दलाल पाकिस्तानी नोटा पडल्या भावात खरेदी करू लागले आहेत. ज्या पाकिस्तानी शंभर रुपयाच्या नोटेचे भारतीय १०५ रु. होतात तीच नोट ६०–७० रु. देऊन खरेदी केली जाते. नंतर आतल्या भागात पाकिस्तानी चलन देऊन तांदूळ–मासळी स्वस्तात खरेदी करून स्मगलींग करण्यात येते व त्रिपुरात काळाबाजार करण्यात येतो. प्रेताच्या टाळूवरचे लोणी खाण्यास सवकलेले आमचे व्यापारी वरचे बंगालात पाच रुपये मणाने ज्यूट खरेदी करताहेत–याच ज्यूटची कलकत्त्यातील किंमत पासष्ट रुपये मण आहे. निदान आता तरी बंगाल्यांना समजेल की–" मानवतेच्या प्रेमाने नव्हे तर स्वतःच्या आर्थिक व राजकीय फायद्यासाठी भारत सरकार बांगला देशाला मदत करीत आहे. बांगला देश स्वतंत्र झाल्यानंतर 'पिंडी 'ची जागा कलकत्त्याचे व्यापारी घेणार आहेत. कच्चा माल तयार करणाऱ्या बंगालचे शोषण करण्याची ताकद कलकत्त्याच्या औद्योगिक क्षेत्रात निश्चितच आहे."

'अखबरा' आता काही फार लांब राहिले नव्हते–जेमतेम दोन कोसावर– 'अखबरा' रेल्वे जंक्शन कब्जात आले तर ढाक्का ते चितगाव लोहमार्ग पुन्हा सुरू करता येईल व मुक्ती सैनिकांना चिरडणे सोपे जाईल या एकाच उद्देशाने पाक लष्कराने अखबराच्या दिशेने जोरदार मुसंडी मारली आहे. आधीच दलदलीचा प्रदेश त्यात दोन दिवस चांगलाच पाऊस झडला होता. चालताना अंतर कमी होण्याऐवजी वाढते आहे असाच भास होत होता–

समोरचा अपटूडेट माणूस माझ्याकडे पाहून हसला–कुठे पाहिले बरे याला? –अरे, हा तर बॉर्डर पोस्टवरचा सब् इन्स्पेक्टर पी. के. नाग–'काय इकडे कुठे?' मी विचारले–' सहज, फिरायला आलो होतो '–पी. के. नाग.

एक सबइन्स्पेक्टर आणि पाकिस्तानी हद्दीत इतक्या आत चिखल तुडवत 'सहज फिरायला येईल' याच्यावर शेंबड्या पोराचा तरी विश्वास बसेल काय?

"आम्हाला अशी बातमी मिळालीय की बॉर्डर सिक्युरीटी फोर्सच्या कित्येक तुकड्या अवामी लीगच्या मदतीसाठी आत घुसल्या आहेत?"–अखेर पुणेरी ब्राह्मण मी. पोटात शिरावयाच्या ऐवजी तोंडात लगावावयाचीच हौस जास्त. "छेः छेः तो त्यांचा अंतर्गत प्रश्न आपण कसा काय एंटरफेअर करायचा?" साळसूदपणे तो म्हणाला आणि जाताना एक झकास 'मामलेदार कचेरी हास्य' करून गेला. काय समजायचंय ते समजून पुन्हा वाट तुडवू लागलो.

'फकरिमुरा' नजरेच्या टप्प्यात आले तेव्हा युद्धक्षेत्रात आल्याची जाणीव होऊ लागली. 'फकरिमुरा' हे इस्ट पाकिस्तान रायफल्सचे हेडक्वार्टर, इस्ट पाक रायफल्सने बंड केले. हेडक्वार्टर्सही ओसाड पडले–परंतु पाटी मात्र शिल्लक आहे.

'फकरिमुरा' गावामध्ये हे युद्ध जनतेचे नाही. याची प्रथम मला जाणीव झाली गावकरी काहीशा उदास तटस्थतेने या युद्धाकडे पहात आहेत. पाकिस्तानी सैन्य पुढे सरकले तर भारतात पळण्यासाठी सर्वांनी किडूकमिडूक आवरून ठेवले आहे. याचा अर्थ अवामी लीगविषयी त्यांना सहानुभूती नाही असा मात्र नव्हे—सहानुभूती जरूर आहे परंतु स्वतः लढ्यात सहभागी व्हायची तयारी नाही—याचे कारण प्रा. सैफुद्दीन खलीद जे चितगाव सिटी कॉलेजमध्ये अर्थशास्त्राचे प्राध्यापक आहेत त्यांनी सांगितले—"वीस-बावीस तारखेपर्यंत 'स्वायत्त बांगला' एवढीच अवामी लीगची मागणी होती—पण नंतर एकदम स्वातंत्र्याची घोषणा करण्यात येऊन सशस्त्र लढाईस प्रारंभ झाला आणि यानेच लोकांच्या मनात गोंधळ निर्माण झाला. तुम्ही हे विसरू नका की अवामी लीग जरी सेक्युलर असली तरी जनता ही धार्मिक आहे—व पाकिस्तान नष्ट होताना ती काही झाली तरी 'सिनीक' होणारच."

प्रा. खलीद यांच्या बोलण्यात तथ्य जरूर आहे परंतु ते संपूर्ण सत्य नव्हे खरे सत्य हे आहे की जनतेची दिशाभूल करण्यात येत आहे. वस्तुतः पूर्व बंगालचे प्रश्न हे सर्व भारतातसुद्धा आहेत आणि "आर्थिक समस्या ह्या आर्थिक लढ्यातूनच सोडविल्या जाऊ शकतात." पूर्व बंगालच्या आर्थिक समस्या केवळ समाजवादानेच सुटू शकतात आणि पूर्व बंगालचा भांडवलदार वर्ग—ज्याच्याकडे आज बंगालचे नेतृत्व आहे. हा तर समाजवादाच्या संपूर्णतया विरुद्ध आहे. कारण अशाने त्याच्या 'वर्गीय स्वार्था'वर घाला पडेल. ज्याप्रमाणे ब्रिटिश भांडवलदारांना हाकलून त्याची जागा भारतीय भांडवलदारांनी घेतली आणि "स्वातंत्र्य चळवळीत गिरणीतला मजूर बाबू गेनू 'स्वदेशी'साठी मेला आणि स्वदेशीचा फायदा स्वातंत्र्यानंतर मिल मालकांच्या वाटेला गेला—बाबू गेनूची पोरंवाळं मात्र उपाशीच राहिली."

आता तोच 'राष्ट्रीय आंदोलना'चा खेळ पूर्व बंगाली भांडवलदारांनी सुरू केला आहे. ते पश्चिम पाकने चालवलेल्या शोषणाविरुद्ध जनतेला 'बंगाली संस्कृती'ची हाक देताहेत. पण स्वातंत्र्यानंतर पूर्व बंगाली भांडवलदार जनतेचे शोषण करणार नाही याची मात्र हमी घेत नाहीत. आगरताळा येथील एक नक्षलवादी नेता मला म्हणाला—

"साम्राज्यवाद्यांच्या मदतीने चालवलेली आणि म्हणूनच फसलेली अशी ही एक राष्ट्रीय चळवळ आहे" अर्थात त्याच्या बोलण्याचा सर्व रोख हा शेख मुजिबुर रेहमान आणि अवामी लीग यांच्या विरुद्ध होता हे स्पष्टच आहे. खैर.

जनतेला स्वातंत्र्य युद्धात सामील करून घेण्यासाठी 'पिपल्स आर्मी' उभारावी लागते—आणि पिपल्स आर्मी ही जनतेच्या लढाऊ वर्गीय संघटनांतून उभी राहू शकते. समाजाच्या तळापर्यंत जर पाय रोवले नाहीत तर केवळ सशस्त्र तुकड्यांच्या सहाय्याने स्वातंत्र्य मिळत नाही हा सुभाषचंद्रांच्या रूपाने इतिहासानेच दिलेला दाखला आहे. परंतु अवामी लीगने असे जनसंघटन कधीही केले नव्हते. आपले

पत्रकार अवामी लीगच्या निवडणूक विजयावरून अतिशय चुकीचे निष्कर्ष काढतात. निवडणुका आणि सशस्त्र लढा यांच्यामध्ये जमीन अस्मानाचा फरक आहे. निवडणुकीसाठी सर्वसाधारण जनमत जे प्रामुख्याने प्रतिक्रियेच्या स्वरूपात व्यक्त होते ते पुरते. परंतु सशस्त्र लढ्यास मात्र त्यागी आणि एकनिष्ठ विचारांच्या लोकांचे संघटन लागते. आज काँग्रेसने जरी दैदीप्यमान बहुमत मिळवले असले तरी त्यांच्याकडे जनसंघ किंवा कम्युनिस्ट यांच्यासारखे संघटन आहे का? आणि याच दोषामुळे अवामी लीगच्या हातातले नेतृत्व गेले आहे. लढाई सुरू होताच पुढारीपणाच्या हौसेने निवडणूक लढवलेले अवामी लीगचे नेते सैरावैरा पळत सुटले आणि भारताच्या हद्दीत येऊन–"पत्रकार परिषदा घेत व सरकारी पाहुणचार चोपत पुढारीपणाची हौस भागवू लागले." मी या आधीच स्पष्ट केले आहे की आज जे बंड झाले ते शिपायांचे आहे हे लवकरच शमेल आणि मग सुरू होईल 'जनतेची क्रांतिकारक चळवळ' जिचे नेतृत्व मौलाना भाषाणी आणि कॅप्टन मोहंमद तोहा यांचेकडे असेल. आज मात्र या लढ्याचे नेतृत्व इ. पी. आर., इ. पी. पी., अन्सार, मुजाहीद आणि ग्रामीण विभागातले स्थानिक नेतृत्व यांच्याकडे आहे.

ए. महंमद इसाक!

अखवराचा स्थानिक नेता. तरुण, सुशिक्षित, उत्साही. पुढारीपणाच्या हौसेपेक्षा जनतेविषयी आस्था जास्त. एम. एस्सी. झालेला. काल-परवापर्यंत ढाक्याला इस्ट पाकिस्तान स्मॉल स्केल इंडस्ट्री कॉर्पोरेशनमध्ये रिसर्च ऑफिसर म्हणून नोकरी करत होता. युद्ध सुरू झाले–गावी परतला–आणि राहवले नाही म्हणून 'मुक्ती फौजे'त सामील झाला. आज मुक्ती फौजेच्या आखबरा विभागाचा 'प्रेसिडेंट' आहे.

–"काल लालपूरला–लालपूर हद्दीपासून पंचवीस मैलांवर आहे. तीन लँचेसमधून पंजाबी सैनिक उतरले. त्यांना हवाई संरक्षण मिळाल्याने त्यांनी गंगासागरपर्यंत चाल केली. आता त्यांना तिथे थोपवून धरण्यात आम्हाला यश मिळाले आहे. काल रात्री ब्राह्मणबारीया कॉलेजवर आमचे ठाणे समजून पाक विमानांनी हल्ला चढवला आणि ते संपूर्ण नष्ट केले. अर्थात ते आमचे ठाणे नव्हते." इसाक सांगू लागला.

"किती लोक मेले?–हे पहा, भारतीय वृत्तपत्रातले आकडे उद्या वाचीनच. मला 'खरा' आकडा पाहिजे"–मी.

खळखळून हसून तो म्हणाला, "शाळेतले दोन शिपाई व पाच निर्वासित असे सातजण ठार झाले व बाँबच्या तुकड्यांनी वीसजण जखमी झाले. जखमा किरकोळ स्वरूपाच्या आहेत." मग चहा पिता पिता मला म्हणाला–"आम्हाला भारताकडून आणखी जास्त व ठाशीव मदत पाहिजे."

"पण मला वाटतं–आधीच बरीच मदत द्यायला सुरुवात केली आहे नाही का?"–मी.

"हो पण Doctor should arrive before the patient is dead. एवढं बोलून 'काही महत्त्वा'च्या कामासाठी तो भारतीय हद्दीकडे निघून गेला– मीही रस्ता तुडवायला सुरवात केली–जो अखबऱ्याला जात होता.

समोरून एक पोरगेलासा सायकल रिक्षावाला जोरजोरात धापा टाकीत रिक्षा खेचीत येत होता. खडबडीत रस्त्यामध्ये रिक्षा धडाधडा आपटत होती. रिक्षामध्ये साध्या कपड्यातला एक विशी बावीशीचा पोरगा आसन्न जखमी होऊन अर्धवट बेहोशीत पडला होता. मी रिक्षावाल्याला विचारले, 'एवढ्या जोरात कुठे चाललास ?' त्याने उत्तर दिले–, आगरताळ्याला, याला हॉस्पिटलात भरती करायचे आहे' मुक्तीफौजेतल्या त्या मुलाला–शिपायाला उचलून त्या छोट्याशा रिक्षात व्यवस्थित निजवले. त्याच्या उजव्या बरगडीखाली पोटामध्ये फार खोल जखम झाली होती. जखम बदुकीची वाटत नव्हती. कदाचित मॉर्टर शेलचा तुकडा शिरला असावा. त्याला मा नाव विचारले–मला कदाचित तो पंजाबी समजला असावा. एक अबोल आणि करुण भीतीने त्याने माझ्याकडे पाहिले. त्याच्या घशाला कोरड पडली होती– –बोलता येत नव्हते. खांद्यावरच्या वॉटर बॅगची लाज वाटली. त्याला पाणी पाजून आणि तोंडावर भिजलेला रूमाल टाकून रिक्षावाल्याला चालत जाण्यास बजावले. तो बिचारा हॉस्पिटलात लवकर पोचवावे या एकाच प्रामाणिक इच्छेने जोरात रिक्षा पळवत होता पण बसणारे हादरे मात्र त्या जखमी शिपायाला सहन होत नव्हते. रिक्षावाला निघून गेला–माझा शर्ट आणि दोन्ही हात मात्र रक्ताने माखून गेले होते.

युद्धस्य कथा रम्य– वाचणाऱ्यांना ! एकदम उदास आणि असहाय वाटू लागले–खर तर पाऊल उचलवत नव्हत पण चालू लागलो. माझ्या बरोबर कोणी नव्हते. आसपासची खाचरं देखील 'अनाथ' होती. समोरून कोणी गावडा सायकल-वर येत होता. कपाळाला भिंगाचा चष्मा होता–कदाचित तलाठी असावा. माझं नांव चित्तवर्धन–

अशी ओळख फक्त भावबंधनातल्या घनश्यामानेच करून दिली होती. "मी बंगाली फिल्म प्रोड्युसर आहे– जीवनयाके नवा, जोग बियोग, बडा भाय, हे तीन चित्रपट तयार केले आहेत. २४ तारखेला मी माझ्या 'दुती मोहन' या नव्या चित्रपटाच्या शूटींगसाठी चितगावला गेलो होतो. लढाई सुरू झाली म्हणून ढाक्याला परतलो माझं ऑफीस जाळून टाकलं होतं–कॅमेरा रस्त्यावर फुटून पडला होता–लाखाचे आसपास नुकसान झाले–घरी आलो तर बायको आणि दोन मुलं यांना ठार मारलेलं होत.

पन्नाशीचा बाप्पा माणूस तो रडायची देखील त्याला लाज वाटत होती. मान खाली घालून तो उभा होता. त्याच्या डोळ्यातून खळखळ पाणी वहात होते. "मी आता कलकत्त्याला चाललोय. तिथे माझे घर आहे. १९७१ सेलींगपुर रोड–माझी

मोठी मुलं तिथे राहातात. आत ढाक्का चितगाव येथे सर्वत्र पाक फौजांचेच वर्चस्व आहे. मुक्तीफौज जोरदार लढते पण त्यांना मदत पाहिजे–आतले बिहारी मुसलमान पाक फौजांना मदत करताहेत. लोक घाबरून गेले आहेत. बाहेरची मदत मिळाली नाही तर पराभव होईल–पराभव होईल"

खरं तर मला त्याच्याशी खूप बोलायचं होतं पण माझ्या निरोपाचीही वाट न पाहता त्याने सायकलवर टांग मारली. ओसाड रस्ता नी मी–अरे हो अखवरा मात्र नजरेच्या टप्प्यात आले होते. गावापासून फार तर फर्लांगभर असेल. लांबूनच गाव निर्मनुष्य आणि निर्जिव दिसत होते. चार पावलं पुढं जातो ना जातो तोच शेजारच्या खाचरातून हातात स्टेनगन घेतलेला इ. पी. आर चा सैनिक वर आला–

त्याला पाहाताच मी हात वर केले–माझ्या चेहऱ्याकडे पाहूनच माझ्या निरुपद्रवीपणा विषयी त्याची खात्री पटली. परंतु केवळ कर्तव्यबुद्धीने त्याने माझे खिसे बिसे चाचपले आणि प्रश्नांची सरबत्तीच सुरू केली–

'आमी बांगला बुकते पारी–बोलते पारी ना' मी केविलवाणे उत्तर दिले–मग मात्र अस्खलीत हिंदीत बोलू लागलो. त्यांचे नाव इनामुक हक. तो इ. पी. आर. मध्ये हवालदाराच्या हुद्द्यावर होते--

"हे पहा काही पाकिस्तानी स्क्वाडस् गावात शिरले आहेत–तुम्हाला पाहिल्या पाहिल्या शूट करतील आणि आमच्यात अडाण्यांचाच भरणा जास्त. तुम्ही तुमची ओळख दाखवायच्या आधी तुम्हाला मारतील. तुम्ही माझ्या बरोबर परत फिरा मीही बॉर्डरवरच चाललो आहे" आम्ही दोघे पंधरा मिनिटातच चांगले मित्र झालो. फकीर मुराळा एक सायकल रिक्षावाला भेटला–रिक्षामध्ये बसून पुन्हा हद्दीकडे परतु लागलो.

"गंगासागर पुलाच्या दक्षिणेला पाकिस्तानी सैन्य आहे आणि आम्ही उत्तरेलो आहोत तेथून त्यांच्या आमच्यात दोन फर्लांगाचे अंतर आहे. पाक सैन्य पाचशेच्या आसपास असेल पण त्यांचो फायरींग मोठी आहे. आता ते ३" मॉटर गन आणि ७·६२ एम. एम्. वापरत आहेत. त्याला तोंड देण्यासाठी आम्हाला सुद्धा हेवी वेपनस पाहिजेत आणि म्हणूनच मी हद्दीकडे चाललो आहे–थोडीफार मदत मिळल'

आधी भेटलेल्या वीर गड्यापेक्षा इनामल हक फारच समजुतदार आणि हुशार वाटला. खर तर हवालदारच्या हुद्द्यावर एवढी हुशार माणसे सहसा नसतात त्याच्यापुढं मी जेव्हा मुक्तीफौजांच्या चुकांचा पाढा वाचला तेव्हा त्याने सारे आरोप मान्य करून त्या चुकांचे एक महत्वाचं कारण दिले ते म्हणजे इ. पी. आर. ही सेमीमिलिट्री ऑर्गनायझेशन नव्हे हे होय!

आंतरराष्ट्रीय नियमानुसार देशाच्या सरहद्दच्या ५ कि. मीटर पर्यंत सैन्य ठेवता येत नाही. तेव्हा या कायद्यातून सुटण्यासाठी प्रत्येक देशाने निरनिराळ्या कल्पना लढवल्या आहेत–B. S. F. ही एक अशीच संघटना. भारतीय लष्करामध्ये व बॉर्डरसिक्युरीटी फोर्समध्ये नावा व्यतिरिक्त काहीही फरक नाही पण या उलट पाक

लष्कर व इ. पी. आरमध्ये चांगलाच फरक आहे. पूर्व बंगाल्यांना लष्करात स्थान नाही या आरडाओरडयामुळे इ. पी. आर. स्थापन करण्यात आली पण त्याच बरोबर बंगाल्यांविषयी वाटत असलेल्या भितीने इ. पी. आर ला लष्कराच्या तोडीचे शिक्षण कधीच दिले नाही. इ. पी. आर म्हणजे आपल्या कडील ए. आर. पी एफ. (स्टेट रिझर्व पोलिस फोर्स) म्हणावी लागेल. अर्थात अशा इ. पी. आर कडून युद्धक्षेत्रात चुका झाल्या नसल्या तरच नवल.

'पंजाबी आर्मी एक ऑर्गन म्हणून काम करते–एक फ्रंट लढवण्याच्या जिद्दीने लढते'–इनामुल हक सांगत होता. "त्यांच्यामध्ये सुसूत्रीकरण आहे. या उलट आमच्या तुकडयांनी सर्वत्र विखुरलेले छोटे छोटे उठाव केले. मंगल पांडेने जी चूक केली तीच आम्ही पुन्हा केली."

विलक्षण आश्चर्याने मी त्याला विचारले–"क्या आप मंगल पांडे को भी जानते है ?

"क्यो नही भाई–आखीर वो अपना हमारा इतिहास है नं ? हक याच्या त्या छोटयाश्या उत्तराने तेवीस वर्षाची सारी जलमट साफ झाली. "व्यक्तीशः आम्ही कोणीही असू पण इतिहास हा आम्हा साऱ्या माणसांचा एकच आहे नाही का ?"

भारतीय चेक पोस्टा जवळ उतरलो–चेक पोस्ट जवळच्या एका खोलीमध्ये 'सहज फिरायला आलेला'–पी. के. नाग मुक्तीफौजेचा स्थानिक नेता. महंमद इयाक 'काही महत्वाचे' कामासाठी बोलत होते. मंगल पांडेला आठवणारा इनामुक हक आत शिरला तेव्हा पांढऱ्या हापचड्डीतला खिशात अर्धवट रिव्हॉल्व्हर खुपसलेला बी. एस. एफ्. चा एक अधिकारी त्याच्याशी काही बोलू लागला. अधिक माहिती आणण्यासाठी' काही पोरं आत पिटाळण्यात आली. त्यांच्या वागण्यावरून ते एकमेकाला चांगले ओळखत असावेत असे वाटले. खरे खोटे कोणास ठाऊक पण पाकिस्तानचा मात्र आरोप आहे की–'भारतीय चेक पोस्ट ही मुक्ती-फौजांची प्रमुख मार्गदर्शन केंद्र झाली आहेत"

आकाशाचा शेंदरी मारुती आपलं अंग चांगलंच फुगवू लागला. चेक पोस्ट शेजारच्या केळीच्या बागेवघल्या विहिरीच्या पाण्याने दिवसाचा सारा शिण विरघळून गेला. मारण्यापेक्षाही उदासिनतेने मानेला मागे वळविले–या अल्ला इल-इलाह ऽ ऽ कोणी म्हातारा हजारो वर्षांची श्रद्धा पणाला लावून शांततेचे दीड हजार तुकडे जोडू पहात होता–पावलं मार्गी लागली विचार मात्र अडखळला–तो म्हातारा बांग देता होता की बंगल्याचे गाणं गात होता ? मला वाटतं तो गाणंच म्हणत असावा जें गाणे बंगाली माणूस भूतकाळापासून गात आहे–

आमार सोनार बगला .
आमी तोमार भाळो खाकी

माझ्या सोन्याच्या बंगाल देशा मी तुझ्यावर फारफार प्रेम करतो !

(क्रमशः)

# दिवास्वप्न

**सतीश बी. चौधरी**

ए चलायचं ना –!

हं ऽऽ

मी म्हणते चलायचं ना.

किती वाजले असतील ?

सात वाजून गेले असतील आता.

थांब ना थोडावेळ......

अरे ! पण किती वेळ झाला. आपण पाच पासून बसलो आहोत.

काही म्हण ! तुझ्या शब्दात परत जाणेसाठी लागणारा जोर नाही. तुला पण वाटते की खूप वेळ आपण इथे बसावं.

.........

बोल ना – वाटत ना तसं !

.........

काय बोलू ? बोलण्यासारखे खूप काही आहे आणि काही नाही. पण –! निदान वेळेवर बोलला असतोच तर, मनाशतरी ––

समाधान ना ! म्हणजे समाधान मानण्यावर आहे. हे पाहिजेच असे नव्हे असंच ना !

मग कशी तडजोड करावी माणसानं ? मला तर खरं म्हणजे आज तुझ्याशी ––

नुसत बोलायचंच होतं असच ना. म्हणजे खूप भावना-वेगाने तू बोलणार आहेस. पण आता आहे तरी कसं म्हणावं ? तू तर निघण्याच्या गोष्टी करते आहेस.

असं तिढचात का जातोस ? माझी काही चूक नसताना माझ्यावर का रागावतोस ?

मान्य आहे मला ! चूक माझी आहे. संबंध मीच वाढवावयास नको होते

पण आता तर आपले ठरले आहे. आपण उद्यापासून एकमेकांना भेटणार नाहीत.



पण आजतर आपण एकमेकांना प्रथमच दोघे एकांतात भेटत आहोत. नेहमी कोणी ना कोणी तुझ्याबरोबर असतेच. तरी पण काही म्हण नजर भिरभिरती राहिली !

म्हणजे आज आपण प्रथमच आणि शेवटचेच एकमेकाना भेटणार आहोत.

अर्थात !

खरंच कारे आपण एकमेकाना विसरू शकू ?

कसं बोलतेस ? एकमेकाला आपण आठवलं कधी म्हणून विसरावं ? आपण कधीच प्रियकर प्रेयसी झालो नाहीत.

पण पण —

बोल ना —! वकिली जरी शिकत असलो तरी ह्याचा अर्थ असा नव्हे की तुझा आजचा प्रत्येक शब्द तुझ्याविरुद्ध पुढे कधीतरी पुरावा म्हणून वापरेन.

तसं नव्हे रे. मी तुला कधी हिणविले का तू वकिली शिकतोस म्हणून ? पण

मला वाटे आणि तुझा फोटोंचा संग्रह पाहताना मी म्हणाले पण होते तू M. Sc. का केले नाहीस. ते.

खरं सांगू ! आपलं प्रेम तिथं अजिबात काम करीत नाही. शिवाय मनाचा बांध एका चाकोरीतून जात नाही. खूप कडू गोड आठवणी मनावर बिंबल्या आहेत. पण एक निश्चित वकिलीत खूप पैसा जमविल. तुला तर —

वाक्य पूर्ण का केलं नाहीसं ? ह्याच साठी ना ! की, अर्थाची वाक्य प्रत्यक्षात पूर्ण होतील. पण अर्धवट सोडलेले वाक्य कधीच पूर्ण होणार नाही म्हणून ?

हवं तर तसंच म्हण.

हवं तर म्हणजे काय ? अजूनही वाटतं का ?

तसं नव्हे. पण आशा फार वाईट ! अजूनही वाटते तुला आपलीशी करावी. पण काही म्हण प्रत्यक्षात मात्र माझ्या वाट्यास हेच येईन की —

हे म्हणजे –?

प्रेमभंगाचे दुःख !

प्रेमभंगाचे दुःख कुणाला असते ते ? ज्यांचे प्रेम जमले त्याना. आपण तर एकमेकावर प्रेम केले–करतो हे तू मला आणि मी तुला कधीच सांगितले नाही.

पण ते आपण ओळखले हेही तितकेच खरे. तुझी अपेक्षा होती का मी तुला प्रत्यक्षात सांगावे म्हणून– ?

अपेक्षा म्हणता येणार नाही. पण तू आपल्या प्रेमसंबंधाबद्दल काहीतरी बोलावसं निदान सुचक वाक्यानी मला ते कळवावसं असे वाटे. पण तू थोडासा जुळलास आणि पुष्कळसा अलिप्त राहिलास.

खरं सांगू ? मी नेहमी विचार करतो तो आपल्या संबंधाचा. कुठून श्रीची ओळख झाली आणि ह्या नवीन नाट्यमय घटनांना माझ्या जीवनात सुरुवात झाली. बँकेत नोकरीसाठी अर्ज देण्यासाठी निघालो होतो. त्याच वेळेस तुला पहिल्यांदा पाहिली. खूप आवडलीस ? तू कोण कुणाची काहीच माहित नव्हते. तेव्हापासून आतापर्यंत तू मला आवडलेलीच आहेस.

खरं–!

पण प्रत्यक्षात मात्र मी तुला संपूर्ण आपलीशी करू शकलो नाही. करता येणार पण नाही. असं निदान आज तरी वाटते. तू मला आवडलीस हे इथं पण खूप जणाना माहीत आहे. आणि बाहेर सुद्धा–!

पण मला एक गोष्ट अजूनही कळत नाही. आपण आपले संबंध म्हणजे जे असावेसे तुला वाटतात ते ठेवू शकत नाहीत किंवा ठेवू शकणार नाहीत तर मग आपण एकमेकाचे कोण राहणार.

खरं म्हणजे मी तुझ्यावर प्रेम केलं का तुझ्या शरीरावर हाच प्रश्न मला नेहमी सतावतो. तू आणि शरीरे ही एक का दोन ह्याचे उत्तर सापडले तर बरं होईल

म्हणजे आपण मनाचे मित्र व शरीराचे प्रेमी का शरीराचे मित्र व मनाचे प्रेमी ह्याचा सहज उलगडा तरी होईल !

पण तू मला सिनेमाची ऑफर करतोस. रस्त्यात भेटले तर नेहमी चहाबद्दल विचारत होतास माझ्या डोळ्यात खोल पाहून स्वतःला हरवून घेतोस. माझ्याबद्दल अपार आसक्ती आहे ते दाखवतोस खर तर मी तुझें चंचल मन त्याच रविवारी ओळखले ज्या रविवारी तू आम्हाला कॉलेज मध्ये कॉलेज नसताना पाठविलेस.

म्हणजे मी नाही समजलो.

अरे ! मी आणि माझी ती मैत्रीण. तेव्हाची—तुझ्यामुळें तिला केव्हाच सोडली आहे.

वा ! तुमची मैत्रीण म्हणजे दिव्य आहे ! खरं सांगू मी तिला प्रथमपासून सांगत होतो की जो भोग तू आज भोगते आहेस तो तूला मारक आहे. ठिणगी तिने आणि त्यानी पाडली. आज दोघेही अतृप्त आहेत. लोकांची मात्र तृष्णा वाढली आहे—! जाऊ दे आपल्याला त्याशी आता काहीही कर्तव्य नाही. हां ! तु काय सांगत होतीस त्या रविवारचे—!

तू म्हणालास—अर्थात तिला ! कारण त्यावेळेस तू मला आणि मी तुला ओळखत होतो पण प्रत्यक्षात संभाषण नव्हते. आणि तू तिला म्हणालास—काय कॉलेजला का ? मी मनाशीच हसले. मला माहीत होते की तुला माझ्याकडे क्षणभरच पाहून घ्यावयाचे आहे एरवी रविवारी कॉलेज म्हणजे—बहाणा ! तुला माझ्याबद्दल आकर्षण आहे हे मी ओळखले !

एक मात्र कुणालाही मान्य करावे लागेल स्त्रीच्या कुठल्याही सामर्थ्याला निष्प्रभ करता येईल पण तिच्या नजरेतील इतराना ओळखण्याचे सामर्थ्य नष्ट करता येणार नाही—!

हसतेस काय ? तुला खर सांगू का ? तुझ्याबद्दल कोणती भावना बाळगली ह्या मलाच नेहमी प्रश्न सतावतो. तू मला आवडलीस हें खरं पण तुझ्याबद्दल प्रेमाची भावना मनात निर्माण होऊ नये पण मी धडपडतो कारण तुझ्यावर प्रेम केले आणि तू माझी झाली नाहीस तर ती वेडी स्वप्न मी कधीच विसरू शकणार नाही.

हूं !

पण तू दिसली नाहीस तर काहीतरी चुकल्यासारखें वाटते. ह्या भावनेला प्रेम म्हणत असतील तर मग तुझ्या शरीराच्या अभिलाषेला काय म्हणावे !

'आसक्ति'

शक्य आहे ! प्रेम आणि आशक्ति दोन्हीही मला हवी असतील. पण मला ती बळजबरीने नको आहेत. स्वखूशीने मला तुझे प्रेम तर पाहिजेच पाहिजे पण मनाची स्थिती शांत ठेवण्यासाठी—तूला पणती माहित आहे ?

हो! तुळशी वृंदावनासमोर लावतात.

ह्या पणतीमध्ये दिव्याची ज्योत असते. आणि त्या दिव्याचा मंद प्रकाश आजुबाजुच्या वातावरणाला शांतपणे सहवास देत असतो. त्या ज्योतिसारखी तुझी सावली मला सतत हवीशी वाटेल...!

असही म्हणतोस आणि तसही म्हणतोस की माझ्या आईवडिलांना पण मी दुखवू शकत नाही. पण मला हे कळत नाही की आपल्या भावी संबंधाचा आणि तुझ्या आईवडिलांचा तू दुःखी करण्याशी संबंध येतो कुठे? मी त्यांना पसंत पडणार नाही असे तुला वाटते का?

पसंतीवरून एक घटना आठवली ती सांगतो तुला. माझ्या एका मित्राला मी एकदा विचारले इथे जर तुला विचारले की अशी कोणती मुलगी तुझ्या माहितीत आहे की जिच्यासारखी तरुणी तुला तुझ्या आयुष्यात पत्नी म्हणून चालेल?

मग तो काय म्हणाला?

एवढी उत्सुक होऊ नकोस. सांगतो. पण त्याआधी त्यानेच मला प्रश्न विचारला. तो असं म्हणाला, का हो, त्या मुलीसारखी मला पत्नी असावी असं म्हणता मग तीच मुलगीच जर पत्नी म्हणून मिळावी असे मला वाटले तर? मी त्यास म्हणालो नाही तसे नाही. ग्रहीत धरा तुम्हाला ती मुलगी सहचरणी म्हणून लाभली नाहीतर —तर मग? आणि त्याने मला सांगितले. तो म्हणाला, मला अवघ्या फक्त तीनच मुली माहित आहेत. पहिली, दुसरी आणि तिसरी आणि तिसरी तू—!

मी—!

---


# शिलंगणाचं सोनं

## आवृत्ती : तिसरी

ब. मो. पुरंदरे

किंमत : तीन रुपये

राजहंस प्रकाशन


---

हो तूं ! मला हे माहीत आहे की तो पण तुला पाहतो आहे. मी माझ्या मनाची त्याला अजिबात कल्पना होऊ दिली नाही. अजूनही नाही.

म्हणजे मी तुझ्या आई-वडिलांना पसंत पडेन. थोडक्यात असंच ना–!

अर्थात !

तरी पण तू म्हणतोस ते आपल्या भावी अबलावर नाराज राहतील. आणि म्हणूनच ही आपली पहिली आणि शेवटची भेट ! मला निदान कारण तरी सांग–!

प्लीज तेवढें निदान माझ्यासाठी तरी विचारू नकोस. एक फार बरं झालं जर गरीब, मध्यम, श्रीमंत हे भेद आणि मनुष्याचे आयुष्य संपल्यानंतर त्याच्या वागणूकीचा हशा, त्याच्याबद्दलची चीड, त्या व्यक्तिच्या घराबद्दलचा राग इतर जणांना कायमच विसरता आले असते तर म्हणजे इतराना तरी त्रास झाला नसता.

म्हणजे–! मला तुझं बोलणं कळलं नाही ?

हं ! ते कळण्यासारखं नाहीच आहे. फक्त एकच गोष्ट लक्षात ठेव मी काही क्षणापुरता का होईना तुझा होतो ही जाणीव असू दे. पूर्णत्वाने तर कोणीच कुणाचे होत नाही हेही तितकच खरं !

एकंदर माणसाची त्यातल्यात्यात पुरुषाची भूमिका करणे अवघडच ! चल जाऊ या......

ए ऽऽ–!

काय

च् च्......

असं का केलेस ?

आज पहिल्यांदाच असं वागलो आहे. आणि तेही शेवटचेच. तुझ्याबद्दलची प्रेमाची भावना. तुझ्या शरीराची आसक्ति मनातून आजतरी पुसून काढली आहे. तुझ्या मैत्रीचा ठसा तरी कायमचा ओठावर रहावा म्हणून असा वागलो !

हें काय ! रडतेस ?

ए ऽऽ चलायच् ना

चल–!



३३३ वर्षांपूर्वी बुडालेल्या स्वीडीश युद्ध नौकेचा सागरातून पुनर्शोध. एकाकी प्रयत्नातून उभारलेली विजयगाथा.

# रॉयल व्हासाचे पुनरुत्थान

**जिप्ती मधुकान्त**

१० ऑगस्ट १६२८! स्टॉक होम नगरात एकच धमाल उडाली होती. स्वीडनची बलशाली राजनौका 'व्हासा' जलावतरण करणार होती. सफरीवर निघणार होती.

किंग गुस्ताफ अॅडोल्फने स्वतः 'व्हासा'च्या बांधणीत लक्ष घालून बारीक-सारीक आराखडे आखून दिले होते. चाळीस एकरावरचे लाकूड तिच्या बांधकामासाठी खर्च झालेले. तिच्या तीन डेक्सवर चौसष्ठ लहान मोठ्या ब्रॉंझ तोफा होत्या. ३०० सशस्त्र आणि सुमारे १५० इतर सैनिकांचा काफिला नेण्याची सोय होती. १४०० टनाचा दारूगोळा आणि इतर युद्ध सामुग्री नेण्याची कुवत होती. वेगवेगळया प्रकारच्या जलदेवतांची, राक्षसांची चित्रे बाहेर रंगवलेली. लाल, सोनेरी, निळया रंगातली ती कलाकुसर म्हणजे एक तरता देखावाच होता.

### गमनाची सलामी

चर्चच्या घंटेने चाराचे टोल दिले. ती भव्य शाही नौका जलावतरणाला निघणार होती. मुहूर्त साधला आणि त्या क्षणी आसपासच्या अनेक नौकांनी तोफांची सलामी दिली. 'व्हासा'नेही रुबाबात बार करून उत्तर दिले. प्रवास सुरू झाला. अंतर काटले जाऊ लागले.

पण काय झाले कुणास ठाऊक!

वारा भन्नाट वाहत होता. लवकरच त्याने रौद्र रूप धारण केले. 'व्हासा'ची बंदराकडली बाजू कलली. दारूखान्यावरच्या मुख्य अधिकाऱ्याला एरिक ज्योसनला धोक्याची कल्पना येऊन, त्याने त्या बाजूच्या तोफा वर ओढायचा, हलवायचा हुकूम केला. पण उशीर होत होता...खालच्या डेकवरच्या तोफांची तोंडे पाण्यात बुडाली

होती. आत घुसणाऱ्या पाण्याने 'व्हासा'चे भवितव्यच मोहोरबंद केले होते! थोड्याच क्षणात कारभार आटोपला...

ज्या बंदरातून जलावतरण केले त्याच्याच आसपास सागराने 'व्हासा'चे थडगे बांधण्याचे ठरवले होते.

शाही नौकेची ती जबरदस्त शोकांतिका होती. जन्मतःच मृत्यूच्या कुशीत जायची तयारी म्हणूनच की काय तो जल्लोषाचा समारंभ?

## घंटेतले पाणबुडे

अकस्मात तुफानाने त्या गडगंज जहाजाचा घास घेतला. ती एक दंतकथाच बनून गेली. त्याचबरोबर, उथळ समुद्रात १०० फूट बुडालेल्या 'व्हासा'ला उद्धरण्याचे प्रयत्नही अनेक देशांनी केले. पण ते निष्फळ ठरले. १६६३ मध्ये आल्ब्रेक्त फॉ त्रेलीबेने मोठ्या साहसाने काही अवशेषांचा, तोफांचा पत्ता लावला. एका मोठ्या घंटेच्या सहाय्याने पाणबुडे आत उतरत. पुलीच्या सहाय्याने तराफ्यावरून घंटेचे दोरखंड ओढता येत. घंटा पाण्यात जाई, तेव्हा आतल्या गाभ्यात कोंडलेल्या हवेचा पाणबुड्याला उपयोग होई. अतिशय कसलेले लोकंच या साहसाला तयार होत. मग हूक वगैरे तोफांना, अवशेषांना अडकवून ते वर काढण्याचे प्रयत्न होत. या बिकट प्रयत्नातूनही जवळपास ५० तोफा वर काढण्यात आल्ब्रेक्तला यश लाभले. अखंड उन्हाळाभर काम चालू होते.

इतका दारूगोळा, तोफा वगैरेंचा लाभ झाल्यावर 'व्हासा'च्या शोकांतिकेतील दुःख कमी झाले. रस ओसरला. कालांतराने तिचा मागोवा घेण्याचे प्रयत्न थंडावले. 'व्हासा' इतिहासजमा झाली.

तीनशे वर्षानंतर तिचा पुनर्शोध घेण्याची अफलातून कल्पना एका पागल माणसाच्या डोक्यात आली! आन्द्रे फ्रांसेन त्याचे नाव. लहानपणापासूनच सागराच्या आणि नौकांच्या कथांवरच त्याचे पोषण झाले होते. त्याने आपल्या मोटर लाँच-मधून 'व्हासा' चे जलसमाधीचे ठिकाण हुडकण्याचा प्रयत्न चालवला. एक दिवस असा येईल, मी ती नौका सागरपृष्ठावर आणीन...त्याचे स्वप्न होते.

दुसरे महायुद्ध सुरू व्हायचे दिवस. आन्द्रे वीसेक वर्षांचा असेल. स्वीडनच्या पश्चिमेहून आलेल्या एका जहाजावरचे लाकूड एका विशिष्ट प्रकारच्या किड्यांनी पोखरलेले त्याला आढळले. प्राचीन काळापासून त्या किड्यांची माहिती जगाला होती. पण दक्षिणेकडे अथवा पूर्वेकडच्या सागरात त्या किड्यांनी असा पराक्रम केल्याचे ऐकिवात नव्हते. त्याने शोध घ्यायचे ठरवले. विशिष्ट घनतेच्या-क्षारयुक्त पाण्यातच त्या किड्यांची वसाहत आढळते, अभ्यासाने त्याला कळून आले. बाल्टिकच्या गोड्या पाण्यात ते नव्हते. या किड्यांपासून बचावलेली जहाजे त्याच परिसरात असतील असे त्याला वाटले.

युद्धकाळानंतर त्याने इंजिनिअरचा व्यवसाय पत्करला. आपला शोध त्याने चालूच ठेवला होता. वेळ मिळेल तशी जुनी हस्तलिखिते, नकाशे, तक्ते, जहाजांची

लॉगबुके तो हुडकत असे. नील्स अॅन्ड्लंड नावाच्या स्वीडिश इतिहासकाराची त्याने गाठ घेतली. १९२० साली, त्याने 'व्हासा'संबंधी काही निष्कर्ष मांडले होते. आन्द्रेला त्याने उत्तेजन दिले. नेमक्या जागेचा नकाशा पुरवला.

स्टॉकहोम बंदराजवळच्या शांत समुद्रात 'व्हासा'चा ठावठिकाणा निश्चित असावा असा आन्द्रेचा कयास होता. आता त्याने प्रत्यक्ष प्रयत्न सुरू केले. त्या ठिकाणचा सागरतळ, शेवाळ, प्रवाळ, वाळू इ. चे नमुने तो तपासू लागला. त्याचे हे 'सागर उपसणे' म्हणजे आसपासच्या बोटींवरच्या काफिल्याला मस्करीचा विषय बनून गेला. पण नाविक तरंगातला मुख्य पर एडविन फर्योल्सिग मात्र आन्द्रेला हसत नसे. फर्योल्सिगने दिलासा दिला की, 'व्हासा'ची नेमकी स्थाननिश्चिती झाली तर आधुनिक यंत्र सामुग्रीने ती वर काढणे शक्य आहे.

## सागरतळ विंचरला

चार वर्षेपर्यंत यश आन्द्रेला हुलकावणी देत होतें.

१९५६ मध्ये त्याने विलक्षण शोधाचे सूत्र नक्की केले. तत्पूर्वी त्याने बंदराचा एक कन्टूर मॅप मिळवला होता. त्याच्या अभ्यासाने, बेरवोलमस्देनच्या दक्षिणेला त्याला एक तीनशे फुटांचा बाक आढळला होता. नंतर त्याने पुराणवस्तू खात्यातून खूपच सामग्री तपासली. एक अस्सल पत्र त्याच्या अभ्यासात आले. 'व्हासा'च्या दुर्घटनेनंतर दोन दिवसांनी ते पाठवल्याचा पुरावा होता. त्यात लिहिले होते— 'तेग्लेव्हिकेनच्या उपसागरात ती आली तेव्हा तुफानाने तिची शीडे कोलमडू पहात होतीं. बेरवोलमस्देनच्या जवळ 'व्हासा' कलंडली...'

आन्द्रे आणि फर्योल्सिगने सागरतळ विंचरून काढायचे ठरवले. तीन महिन्यातल्या सगळ्या सुट्ट्या, आठवड्याचे सुट्टीचे दिवस त्यांनी या उद्योगात घालवले. ऑगस्टच्या एका स्वच्छ दिवशी आन्द्रेला आपल्या कोअर सॅम्प्लरच्या तारेला काही-तरी मोठा अडथळा आल्याचे जाणवले! हिसका देऊन त्याने हूक बाहेर ओढला—

काळपट ओक लाकडी तुकड्याच्या एका कडीला हूक अकडला होता! त्या पाण्यात ओकचे लाकूड कमीत कमी शंभर वर्षे तरी राहिल्यावर मग असे काळे पडते, हे अभ्यासाने त्याला कळले होते. १६ व्या किंवा १७ व्या शतकातल्या काही अत्यंत महत्वाच्या नौकांच्या बांधणीतच, हे लाकूड वापरीत. 'व्हासा'वरचा तो तुकडा असण्याचीही शक्यता होती!

त्या स्थळाचे नेमके बेअरिंग टिपून आन्द्रे किनाऱ्याकडे वळला. फर्योल्सिगची त्याने गाठ घेतली. उन्हाळ्यातला नौदलाचे डायव्हिंगचे ट्रेनिंग त्याच जागी का घेऊ नये?— त्यांनी नौदलाला आपली 'व्हासा'च्या शोधाची कल्पना रुजू केली ती मान्य करण्यात आली. त्याच्या हर्षाला नौदलाने साथ दिली.

त्या जलपृष्ठाखाली फर्योल्सिगने सूर मारला तेव्हा आन्द्रे जरा खिन्नपणेच त्याचा मागोवा घेत होता. इन्टर कॉमवरच्या त्याच्या रिपोर्टात आशादायक काही नव्हते. घट्ट चिखलाच्या ढिगाऱ्यावर फर्योल्सिग उभा होता. काही दिसत नाही, म्हणून

त्याने फोनवर सांगितले. पण नंतर ' जरा थांब ' म्हणून आनंदातिशयाने त्याची किंकाळी ऐकू आली–' काहीतरी घन पदार्थ माझ्या हाताला आलाय, लाकडाची भिंत वाटते, खरंच, एखादे प्रचंड जहाज असावे...ओहो ही पहा काही विवरे, तोफांची असावीत. ' त्याच्या एकेक शब्दाने आन्द्रेची निराशा कुठल्या कुठे पळून गेली. नवा जोम आला.

फर्पेलितग सागरतळातली नवी नवी माहिती सांगत होता. शोध घेण्याचे त्याचे काम चालू होते. नौकेचा नांगर, तोफांची आणखी एक बैठकीची ओळ त्याने पाहिली.

नक्कीच ती ' व्हासा '!

या शोधाची बातमी शहरात विजेसारखी पसरली. आन्द्रेकडे साऱ्यांच्या नजरा वळल्या. इतक्या प्राचीन नौकेचा मागोवा अद्याप कुणी घेतला नव्हता. जुन्यात जुनी १९०५ ची, नेल्सनच्या ' व्हिक्टरी 'ची कथा लोकांना माहित होती. ' व्हासा ' तर त्याहून प्राचीन...

' व्हासा 'ला वर कसे खेचता येईल ?–ती उभीच गाडली गेली होती. १६ फूटाचा चिखलाचा थर होता तीवर, तिला वर खेचले तरी सुकून तिचा सांगाडा तडकणार. मग ' व्हासा 'ला तिच्या ११० फूट खोलीतून वर ५० फुटापर्यंत तात्पुरते ओढायचे ठरले. तिच्यासाठी खास सान्द्रगृह – त्या दरम्यान बांधायचे.

## लोकांची उत्साही मदत

' व्हासा 'च्या तळाखालून अवाढव्य पोलादी दोरखंड टाकून बाजूच्या प्रचंड खांबावर तिला तोलून धरायचे ठरले. ही सारी यंत्रसामुग्री उभारण्यासाठी पैसा लागणार. शासनाने अनुदान दिले. खाजगी धनिकांनी आनंदाने देणग्या दिल्या. लोकांनीही फंड उभारला ! नेपच्यून सॉल्वेज कं. ने हे पुनरुत्थान विनामूल्य करून द्यायचे ठरवले...नौदलाने त्यासाठी सर्व पूर्वतयारी केली.

' व्हासा 'ला वर उचलण्यासाठी तिच्या खालच्या लांबलचक पट्टीला सहा विशाल छिद्रे पाडायचे ठरवले. फर्पेलितगच्या मार्गदर्शनाखाली नौदलातल्या पाणबुड्यांनी काम सुरू केले. यात दोन वर्षे गेली. हे काम मोठे धोक्याचे होते. आतला गाळ वर उपसून काढला. त्यातल्या जिनसा काळजीपूर्वक वेचून बाजूला केल्या. त्या बारीक-सारीक जिनसांना क्रमांक देऊन नोंद करण्यात आली.

२० ऑगस्ट १९५९. पाणी खेचण्याचे काम बाजूच्या बोटीवरून सुरू झाले. गाळाची पकड ढिली होऊ लागली. पहिल्या प्रयत्नात ' व्हासा ' १८ इंच वर खेचली गेली. कोसळण्याची भिती नव्हती. २७ दिवसांच्या १८ लिफ्ट्सच्या प्रयत्नांनंतर ते प्रचंड धूड ५० फुटावर आणण्यात यश आले. तेथे ते तात्पुरते तरंगत ठेवले. हिवाळा सरला या अवस्थेत.

नंतरच्या वसंत ऋतूत ' व्हासा 'च्या तळाखालील दुरुस्ती सुरू झाली. तोफांच्या माऱ्याची छिद्रे सील करण्यात आली. लोखंडी खिळे कुजले होते तेथे ओकच्या खुंट्या, पाचरी ठोकल्या. वरच्या बाजूला आधार देण्यासाठी फळ्यांची भिंत

उभारली. तळाखालून चार रबरी नौकांनी ' व्हासा 'ला ढुशी दिली आणि पोलादी केबल्स ओवण्यात आल्या. हैड्रॉलिक जॅक्स लावण्यात आले.

एप्रिल १९६१ च्या २४ तारखेला स्टॉकहोमच्या बंदर किनाऱ्यावर लोकांची ही गर्दी जमली !

' व्हासा 'चे आगमन पहायला सारे उत्सुक !

संकेत दिल्यानंतर जॅक्सनी काम सुरू केले. नऊ वाजून तीन मिनिटांनी सागर-पृष्ठावर प्राचीन ओक लाकडाचा एक काळा तुकडा डोकावला ! त्या पाठोपाठ छिन्न झालेला ' व्हासा 'चा वरचा भाग...

आसपासच्या जहाजांवरच्या, बेटावरच्या प्रेक्षकांनी हर्षोद्गार काढले ! परिसर निनादला.

३३३ वर्षांच्या अज्ञातवासानंतर ' व्हासा ' परतत होती ! तात्पुरत्या उभार-लेल्या स्कान्सेन पार्कजवळच्या म्युझियमध्ये तिची रवानगी झाली. दिनमरात्र तिच्यावर जंतुनाशक, क्षारयुक्त औषधींचा फवारा उडवण्यात आला. तडकण्यापासून वाचवायला ती तरतूद जारी करायला हवी होती. लाकडाच्या अंतर्भागातल्या सेल्समध्ये ही जंतुनाशके जाऊन ' व्हासा 'चे आयुष्य बाहेरच्या हवेत टिकणार होते. जेथे जेथे तिला मार लागून आकार बिघडला होता, तेथे जॅक लावून दुरुस्ती सुरू झाली. अनेक ठिकाणी नवीन भाग जोडावे लागले गॅलरीचे उंची नक्षीकामाचे तुकडे जुळवले. मुळच्या गाळाच्या जागी पाणबुड्यांनी शोध चालूच ठेवला. प्रत्येक चौरस यार्ड जागा तपासून सापडतील ते अवशेष गोळा केले.

हे सारेच अवाढव्य काम होते.

इतर सुट्या वस्तू, प्राण्यांची हाडे, काच, कपडे, साऱ्यांची प्रतवारी लावून कॅटलॉग नोंदले गेले. अशा जवळपास पंचवीस हजार वस्तूंची पद्धतशीर नोंद कर-ण्याचे काम पुरे करण्यात आले.

## राष्ट्रीय स्मारक

दरवर्षी ३ लक्षांहून अधिक प्रवासी ' व्हावा ' म्युझियमला भेट देतात. खास उभारलेल्या गॅलरीतून ' व्हासा ' वर फेरफटका मारत तिच्या बांधणीचे कौतुक करतात. वैभवाची चित्रे मनात जुळवतात. जवळच एक फिल्म अखंड दाखवणे चालू असते. ' व्हासा 'चे पुनरुत्थान कसे झाले, याचा तो रोमांचकारक चित्रपट. प्रदर्शनगृहात आराखडे मांडलेले आहेत. त्रेलेबेनच्या पाणबुड्यांच्या घंटांची प्रति-कृतीही आहे. १७ व्या शतकातील खलाशांचे जीवन दर्शवणाऱ्या अनेक वस्तूही आहेत. नौकांवरच्या असंख्य वस्तू – धातूच्या पेट्या दारूची शिंगे, बटने, हातमोजे, पायमोजे, एक जशीच्या तशी मिळालेली फेल्ट हॅट, मातीच्या डिशेस, सुतारकामाची हत्यारे इ. इ. गाईड – ते सारे अगत्याने दाखवतात.

अखेर आन्द्रेचे स्वप्न असे साकार झाले ! ' व्हासा ' हे स्वीडनचे राष्ट्रीय स्मारकच नव्हे तर एक जागतिक नवलाईची प्रेक्षणीय चीज बनली आहे. □ □ □

पुस्तके

सुहास भालचंद्र बापट

संसारोत्सुक स्त्रीचे
सूडाच्या भावनेन फुललेले
वेदनाविव्हल शोकनाटच

# सांगत्ये ऐका

'सांगत्ये ऐका' हे हंसाबाई वाडकरांचे आत्मचरित्र प्रसिद्ध होऊन आता वर्ष लोटले आहे. यावर्षीचा सरकारी पुरस्कार त्याला मिळाल्याने त्याला आता राजमान्यताही मिळाली आहे. आणि राजमान्यतेनंतरच लोकमान्यतेने जागे व्हावे असा आपल्या लोकाभिरुचीचा शिरस्ता असल्याने लोकही मनात आदर-मिश्रित कौतुक आणि कुतूहल ठेऊन या पुस्तकाकडे वळतील यात शंका नाही. प्रस्तुत आत्मकथनाला 'माणूस'नेच आपल्या दिवाळी अंकात प्रथम प्रसिद्धी दिली आणि त्यानंतरच्या अंकांतून त्याची पूर्ती केली होती. एखाद्या कलाकृतीला प्रकाशात आणताना, प्रकाशात आणणाऱ्याची भूमिका ही साहजिकच चिकित्सकाची नसते. त्या कलाकृतीतील असाधारणता त्याला जाणवते म्हणूनच तो तिला लोकांसमोर आणण्याचे प्रयत्न करतो हे खरे पण त्यावेळी त्याची भूमिका ही विलक्षणला पुढे आणण्याची असते. त्यामुळे विमर्शाला मर्यादा पडतात: म्हणून हा परीक्षणाचा प्रपंच. प्रस्तुत परीक्षण हे 'सांगत्ये ऐका' या आत्मकथनातील व्यक्तित्वशोधनाचा नम्र प्रयत्न आहे.

'सांगत्ये ऐका' ही एका कलावती-ची आत्मकहाणी आहे. 'कलावंत हा देखील अखेर माणूसच असतो' हे वाक्य आपण अनेकवेळा वाचलेले असते. आणि त्यातील माणूसपणाच्या 'अखेरी' अस्तित्वाबद्दल आपल्याला एक सात्विक समाधान लाभत असते; पण वस्तुस्थिती वेगळी असते. कलावंत हा इतर कोणत्याही क्षेत्रा-तील व्यक्तीप्रमाणे आधी माणूस असतो

ाणि मग इतर सर्व काही असतो. या आत्मकहाणीत हा माणूसपणा सर्वत्र भरून राहिला आहे.

चित्रपटकलेच्या क्षेत्रातच अख्खे आयुष्य गेल्यामुळे त्या कलाक्षेत्रातील व्यक्तींचे दर्शन या आत्मकहाणीत घडणे अपरिहार्य होते; शोभना समर्थ, देविकाराणी, व्ही. शांताराम, विश्राम बेडेकर, राजा परांजपे, दुर्गाबाई खोटे, भालजी पेंढारकर या सुप्रसिद्ध व्यक्ती या कहाणीत व्यवसायाच्या नात्याने येऊन जातात. त्यांच्या कलागुणांचे आणि त्याहीपेक्षा त्यांच्यातील माणूसपणाचे हंसाबाईंना जाणवलेले रूप व्यक्त होते. आणि चित्रसृष्टीच्या मायावी नगरीत राहूनसुद्धा, फसवणूक होऊनसुद्धा हंसाबाई या व्यक्तींवर सुष्टदुष्टतेचे रबरी शिक्के मारत नाहीत हे विशेष होय.

पुस्तकाच्या अखेरी अखेरीस आजच्या मराठी चित्रसृष्टीविषयी लेखिकेने मते व्यक्त केली आहेत. एकंदर सूर, त्यातील कलेच्या अभावी, निराशेचा आहे. एकंदर पुस्तकात तुरळक तुरळक अशी कलावंताच्या नीतीविषयी वाक्ये आहेत. ‘ खऱ्या कलावंताची कलेची आस कधीच सुटत नाही ’ असे एखादे वाक्य येऊन जाते. ‘आर्टिस्टने मर्यादा बाळगली पाहिजे, निदान सेटवर तरी व्यवस्थित असलेच पाहिजे’ असेही हंसाबाईंनी म्हटले आहे.

पण चित्रपटसृष्टीतील काही व्यक्तींचे ओझरते दर्शन येथे घडत असले, अथवा वर उल्लेखिलेली कलाविषयक मते वाचली, अथवा पुस्तकातून दिसत असलेला हंसाबाईंचा कलावंत या नात्याने जीवन प्रवास पाहिला तरी ‘ सांगत्ये ऐका ’मध्ये त्यांच्या कलेची कहाणी पुरेशी आलेली नाही असे वाटते. उदाहरणार्थ, ज्या ज्या थोर व्यक्तींचा उल्लेख त्यांनी केला आहे, त्यांच्या (व्ही. शांताराम सोडून) कलाविषयक कामगिरीचा धन-ऋण कोणत्याच प्रकारचा उल्लेख त्या करत नाहीत मग त्याचे विवेचन दूरच राहिले. त्यांनी काम करावयास लागल्यापासून तो आजपर्यंतच्या हिंदी अगर मराठी चित्रसृष्टीच्या कलामूल्यांविषयी, त्यातील प्रवाहांविषयी त्या बोलत नाहीत. जे काही त्यांनी लिहिले आहे ते फारच अपुरे आहे. लोकांच्या अभिरूचीतही काही बदल झाले आहेत काय याविषयीही त्यांनी काहीच मांडले नाही.

एका कलावतीच्या आत्मकथेत असे का बरे व्हावे ? वस्तुतः कलावंताच्या दैनंदिनीतून कलाप्रवाहाचे तपशील अधिक सजीव व्हावेत. ज्या कलेच्या व्यसनाच्या आणि कलेच्या सेवेचा हंसाबाईंनी उल्लेख केला आहे ती कला त्यांच्या आयुष्याची खरीखुरी प्रेरणा होती का ? की तो केवळ अपघात होता ? आणि तो अपघात असल्यानेच त्यांना आयुष्यभर स्वतःशी आणि इतरांशी झगडा करावा लागला असे तर झाले नाही ?

असा विचार करता करता आपण या जीवनकहाणीकडे पाहू लागतो.

प्रत्येक व्यक्तीला जसं बाळपण रम्य वाटते, तसे रम्य बाळपण येथे आहे.

वडिलांची लाडकी अशी ही उमलत जाणारी कळी. अबोधतेच्या कोषात असतानाच तिने भावी पतीला लग्नाचे वचन दिले. पण ते त्यांच्या प्रश्नांच्या तगाद्यातून सुटण्यासाठी. लहानपणचे वर वर निरुपद्रवी वाटणारे संस्कार व्यक्तित्व पिंडाला आकार देऊ लागले. बाहेर पडलो हे घरी न सांगण्यासाठी पैसे मिळाले. घरी मार मिळाला. हंसाबाई म्हणतात, 'दुःख सोसलं पण पैसे मिळाले हे जणू इथपासून ठरलं'

प्रथम वडील आणि नंतर आईही दारूत बुडाली. दुःख विसरण्याचा हा मातापित्यांनीच दाखविलेला मार्ग. तो पुढच्या आयुष्यात आचरणात आल्याशिवाय कसा राहील ? भावाच्या शिक्षणाचे पैसे उभे करण्यासाठी या चित्रपटधंद्यात मला पाऊल टाकावं लागलं. कृतीप्रमाणेच वागण्याची सत्यनिष्ठा अंतःकरणात रोमारोमात भिनलेली. म्हणून चांगली वागत असतानासुद्धा संशय घेतला तर संशयाप्रमाणेच वागावयाचे म्हणून लग्न केले. जगावर सूड घ्यावयाच्या प्रेरणेतून केलेले हे लग्न. सुखी संसाराची सुंदर स्वप्ने पहाणाऱ्या या कोवळ्या बालिकेला संसाराच्या निर्वाह-साठी चित्रपटाच्या वेदीवर चढवून जगाने तिच्यांवर तिचा अपराध नसताना अत्याचार केला होता. ही परस्परसूडांची मालिका पुढे आयुष्यभर सुरूच राहिली.

लग्न आणि संसार ही तिची बालपणापासूनची स्वप्ने. पण बालपण संपले. लग्न झाले. पण साधा शांत संसार नशिबाला आला नाही. काहीही अपवित्र केलेले नसताना देवासमोर शपथ घेण्याचा आग्रह केला गेला. आणि सुखासाठी तळतळणारे मन बंड करून उठले. पुनः जगाचा सूड घेण्यासाठी स्वतःला व्यसनात बुडवले गेले. आणि मग काही क्षणी आत्मप्रतारणेचे भान आले तरी ते दुबळेच राहिले. वर्तनाला स्वैरपणा आला. पोटच्या मुलांविषयीही संशय व्यक्त केला गेल्यावर संसार दुभंगू लागला. मग जगाचीही बंधने झुगारून या साऱ्या विखारी नित्या-पासून तीन वर्षे दूर दूर एका खेड्यात गेली. जगाविषयीचे मनात भिनलेले विष जरा कुठे निचरू लागले होते तो म्हाताऱ्या मॅजिस्ट्रेटने केलेल्या बलात्कारातून कडूजहर विषाचा अख्खा प्याला पुनः घशात ओतला गेला. संसार जोडण्यासाठी पुनः पुनः स्थिर मनाने प्रयत्न करावेत तो नियतीनेच असे फासे टाकावेत की डाव उलटा पडावा. आणि उलट्या डावाला काटशह द्यावा तो आपल्या प्रयत्नांनाच पायदळी तुडविण्याचे अपयश पदरी यावे.

आणि मग अखेर संसार फुटला तो फुटलाच. आता विसावा लाभतो आहे एका आपल्या मानलेल्या दुसऱ्याच्या घरात. अखेर नाती ही सापेक्षच असतात. नात्यांवर परंपरा भावनांचा आरोप करते. पण आरोप हो वस्तुस्थिती नसते. अखेर अंतःकरण ज्याला आपला म्हणते तोच खरा नात्याचा ठरतो. दुसऱ्याच्या संसारात राहून, जुने भावबंध तोडून, आपला जुना संसार दुरून कधीतरी दर्शन देतो आहे. एखाद्या चित्रपटातच शोभेल असे हे अंतःकरणाला पीळ पाडणारे दर्शन आणि चित्रपटातच

काम केलेल्या व्यक्तीच्या वाट्याला प्रत्यक्ष म्हणून आलेले आहे. हा केवळ चित्रपटीय दैवदुर्विलास !

अशा रीतीने ही आत्मकहाणी एका सुखी संसारासाठी आसुसलेल्या निर्मळ बंडखोर मनाच्या स्त्रीची कहाणी आहे. ती नुसती कहाणी नाही तर अथपासून इतिपर्यंत ते सूडाच्या भावनेने फुललेले पण वेदनाविव्हल असे शोकनाट्य आहे. क्रौर्याच्या क्रूर आनंदापेक्षा त्यात पराजितेचे उष्ण श्वास अधिक आहेत आणि प्रत्येक सूड हे आत्मवंचनेचे पुढचे पाऊल होते, ही मन कडुकडु करणारी जाणीव आहे. ही स्त्री कलावंत नव्हती. कला तिच्यावर लादली गेली आणि कलाजगताने तिला कलाविलासापेक्षा कलेच्या क्रूर पंजांनीच अधिक ओरबाडले. त्यामुळे बाह्यतः ती कलावती म्हणून ओळखली गेली. पण वस्तुतः ती पूर्णपणे दडपली गेलेली एक सार्वसुधी संसारी स्त्री होती. तिच्या कहाणीत कलेला स्थान कमी का, या प्रश्नाचे माझ्या मते हे उत्तर आहे. कलेच्या व्यसनाचा हंसाबाईंनी उल्लेख केला आहे पण त्यांची कलेची आस हा मला विशुद्ध कलाशोध वाटत नाही. त्यांचा तो हरवलेल्या स्वतःला कलारूपात शोधण्याचा एक प्रयत्न आहे असे मला वाटते. ' कलेची सेवा केल्याचे समाधान लाभते पण दुःखाची टोचणी फार ' असे उद्गार त्यांनी काढले आहेत. कारण त्यांची कला ही सुरुवातीला उपजीविकेसाठी म्हणून राबविली गेली. पुढे कदाचित काही कलानंदाचे क्षण मिळाले असतील. पण पुढे पुढे कलाक्षेत्र हा त्यांचा आत्मविरंगुळा बनला पण दुःख इतके अथांग होते की कलेच्या समाधानाने ही टोचणी थांबणे अवघड होते.

पण दुःखांच्या झळांनी कोळून करपून जाऊनमुद्धा हंसाबाईंनी एक फार मोठी गोष्ट आत्मसात केली ती म्हणजे आयुष्याची समज. त्यांनी माणसांना आयुष्यात नायक खलनायक बनविले नाही. पती दुरावला जाऊनसुद्धा त्या अखेर निर्मळ मनाने म्हणू शकतात–' माझा त्यांच्यावर विश्वास आहे. नाही पटलं माणसाचं संसारात म्हणून तो वाईट आहे असे नाही. आमचे धागे जुळू शकले नाहीत एवढंच. ते मला समजू शकले नाहीत. कदाचित मी त्यांना समजू शकले नसेन.'

या समजेनेच, या अलिप्त जाणिवेनेच त्यांच्या या आत्मकहाणीतील अनुभव अन् अनुभव तोलला गेला आहे. संसारोत्सुक स्त्रीच्या नियतिनियत शोकात्मतेला अलिप्ततेचे गहिरे रूप लाभले आहे.

सांगत्ये ऐका : हंसा वाडकर : राजहंस प्रकाशन, पुणे ३०. : मूल्य आठ रुपये

एप्रिलमध्ये आंतरभारती या संस्थेने
एक शिबीर आयोजित केले होते...

# दंडकारण्यातील दुर्गम यात्रा

**प्रमोद शिराळकर**

इंद्रावती, बांदिया, पलिकोटा, पामीगौतमी, गोदावरी ! दंडकारण्यातून वाहणाऱ्या या नद्यांच्या तीरावर, दहाहजार वर्षांची परंपरा सांगणारे मानवी समूह आदि संस्कृतीचा वारसा जपत जगत आहेत. महाराष्ट्र, आंध्र आणि मध्यप्रदेश यांच्या सीमावर, पर्वतांच्या कुशीत असलेल्या दाट अरण्यात हे समूह अजूनही उपेक्षितच राहिले आहेत. नागरी संस्कृतीत वाढलेल्या तरुणांनी या उपेक्षितांच्या अंतरंगाचा शोध घ्यावा याकरिता आंतर भारतीने दि. ४ एप्रिल ते १३ एप्रिल एक फिरते शिबीर आयोजित केले होते. सोमनाथ येथील प्रकल्पाचे अध्वर्यु श्री. बाबा आमटे व त्यांच्या पत्नी सौ. साधनाताई आमटे यांनी शिबीराचे नेतृत्व केले.

दिनांक ४ एप्रिलला दुपारी दोन वाजता महाराष्ट्रातील युवक चंद्रपूरच्या एस्. टी. स्टँडवर जमले. श्री राजा मंगळवेढेकर, श्री. शिरूभाऊ लिमये, श्री. यदुनाथजी थत्ते ही मंडळी आधीच येऊन थांबली होती. राजस्थानातून जुगलकिशोर व सत्येन हे दोन युवक सहभागी झाले. बसने रात्री दहा वाजता आलापल्ली येथ आम्ही पोहोचलो. आलापल्लीला ट्रक्टर आला होता. आलापल्लीपासून पुढे जंगलातून प्रवास सुरू झाला. ट्रक्टरने रात्री दोन वाजता बांदिया (का बि ीगा !) नदीच्या विस्तीर्ण पात्रात आम्ही आलो. श्री. आमटे व आनंदवन वरोराचे काही तरुण आधीच तेथे आले होते.

पाच एप्रिलला सकाळी, दोन मोड (खेडेगाव) आम्ही पाहिले. पाहिल्या माडयाचे नाव होते कुडकिल. कुडकिल गावात शिरण्यापूर्वी स्मशान लागले. त्यानंतर सर्व ठिकाणी हेच दृश्य दिसे. गावाबाहेर स्मशान असे. स्मशान दिसेल की गाव आले हे

ओळखायचे. इथे मृत माणसास पुरतात. जाळत नाहीत. आर्यांच्यापेक्षा इथे राहणाऱ्यांची संस्कृती कशी भिन्न आहे हे हळूहळू उमजत होते. माणसाला पुरल्यावर नदीत सापडणाऱ्या दगडगोटयांचा चौकोनी थर त्यावर करतात. ही पद्धत सामान्य माणसासाठी झाली. पण एखादा प्रधान वा शूर शिकारी मृत झाल्यास त्याला पुरतात आणि त्या जागी खडकाचा एक उंच दगड कापून आणून रोवून ठेवतात. याला उरस्कल म्हणतात. उरस्कल (Menhir) वर किंवा शेजारी मोरांचे, पक्षांचे लाकडी आकार ठेवतात. मृत माणूस शिकारी असेल तर धनुष्यबाण ठेवलेले दिसतात. कधी कधी असे उरस्कल घराच्या कुंपणामध्ये आतसुद्धा दिसतात.

कुडकिल गावात आम्ही प्रवेशलो तेव्हा पहिल्यांदा कोणती गोष्ट जर जाणवली असेल तर ती ही की गाव अतिशय स्वच्छ होते. बांबू, माती आणि गवत यांनी बांधलेल्या झोपडया रेखीव होत्या. आम्ही आणि गावातली माणसे एकमेकाकडे कुतूहलाने पाहात होतो. उन्हाळयात देखिल वस्त्राच्या आत शरीरे झाकून त्रास करून घेणारे शहरी मुखवटे आणि निसर्गाने दिलेल्या सुंदर शरीराला वस्त्राने लपेटून न घेता निःसंकोचपणे वावरणारे हसरे चेहरे यांच्यातला मूक संवाद बराच वेळ चालला होता. परंतु थोडयाच वेळात दोघींना ' माणूस ' हा समान धागा सापडला. कुडकिलमधल्या तरुण मुलांनी व मुलींनी फेर धरून नाचत नाचत गायला सुरुवात केली. हरणाच्या कातडयाचे ढोल घुमू लागले. पायांच्या विशिष्ठ हालचालीतून लय रंगत गेली. नृत्य आणि ध्वनी यातून दहाहजार वर्षांची संस्कृती उलगडू लागली. कमरे भोवती गुंडाळलेल्या फडक्या खेरीज इतर आभरणांना इथे स्थान नाही. नाच, गाणी, निसर्ग यातच सुख-समाधान मानणारा इथला माणूस लज्जेपासून मुक्त आहे. चक्राकार फिरत फिरत नाचणाऱ्या इथल्या माणसाला आनंद गवसतो तो फक्त बेभान होऊन गीते गाण्यात.

कुडकिल गाव हे आलापल्ली–भामरागड या रस्त्यापासून जवळ आहे. तिथे एक शाळाही आहे. शाळेबाहेर झोपाळा आहे. केवढी ही सुधारणा ! पण रस्त्यापासून जवळ असल्याचा हा परिणाम होता. रस्त्यापासून दूर असणारे माडे शाळेशिवायच आहेत.

दुसरा माडा पाहिला–बुर्गी नावाचा. दुपारीच आम्ही गावात घुसलो. गावातले सगळे लोक शिकारीसाठी बाहेर गेलेले. पाचसहा स्त्रिया आणि पोरे दिसली. आम्हाला पाहताच पळून गेली. मोठ्या प्रयासाने दोघापोराना बोलावून खेळणी दाखवली. एका म्हातारीने हे पाहिले आणि ती भडकली. जोरजोरात माडी भाषेत बोलू लागली. आम्ही आल्याने ती संतापली आहे इतकेच तिच्या बोलण्यावरून कळत होते. शेवटी आम्ही जायला निघाल्यावर ती शांत झाली. पण सुदैवाने मराठी जाणणारा माणूस भेटला. त्याने बरीच माहिती दिली. गावात विहीर होती. दोराला बादली बांधून बायका पाणी काढत होत्या. आम्ही पिण्यासाठी पाणी काढू

लागलो. विहीरीच्या बाहेर पाणी सांडून चिखल झाला होता. चूकून दोराचे टोक त्या चिखलात पडले. शेजारी उभ्या असलेल्या बाईने ते लगेच पाण्याने धुतले व विहीरीच्या कठड्यावर ठेवून माडी भाषेत दोर चिखलात बुडवू नका असे काहीसे ती बोलली. स्वच्छतेची इतकी समज पाहून आम्ही थक्क झालो. माड्यात राहणारे हे माडिया लोक झाडाच्या काडीने दात घासतात. दोन वेळा स्नान करतात. दुधी भोपळ्यात पाणी साठवून ते पितात. शिकारीसाठी भाले, धनुष्य-बाण वापरतात. प्रधान, माड्या, गोंड, तेली, मुरिया, झाऱ्या, गोवारी ही इथल्या जमातींची नावे आहेत. कोणतीही जमात गावातल्या कुठल्याही विहीरीवर पाणी भरू शकत. माडिया गोमांस भक्षक आहेत. पण गायीला मारणे पाप समजतात. गायीला जगलात नेऊन वाघाकडून तिला मारवतात. मग तिचे मांस खातात.

बुर्गी गावात संध्याकाळी एक शिकारी शिकारीहून परतताना भेटला. चेहऱ्यावरचे उदास भाव शिकार न मिळाल्याचे सांगत होते. जवळ जाऊन आता काय खाणार, असे विचारताच खिन्न उत्तर आले–कोसरी कोसरी ! बाजरीपेक्षा लहान असणारे कोसरी हे माडियांचे अन्न आहे. काही कास्तकरी धान (तांदूळ) पिकवतात. पिकवतात म्हणजे काय–तांदूळ वा कोसरी हाताने जमीनीवर फेकतात आणि पावसाचे पाणी पडून ते उगवल्यावर काढून घेतात. ही यांची शेतीची पद्धत आहे.

सात नद्यांच्या काठावर वसलेले हे माडे विपूल पाण्याच्या प्रवाहात आपले प्रतिबिंब पाहतात. पण त्या पाण्याचा स्पर्श अजून इथल्या भूमीला झालेला नाही. नांगराच्या फाळाने इथली जमीन कधी उचकटलेली नाही. माडिया मागासलेलाच (?) आहे. याची संस्कृती संपन्न आहे पण संस्कृतीने पोट भरत नसते. इथल्या संस्कृतीचे विशेष कितीदा तरी पाहिले.

बांदिया नदीतून मुक्काम उठवून आम्ही भामरागडला आलो. शहरी वारे या गावाला झोंबत असल्याचे लगेच जाणवले. कुरेशीचे हॉटेल आणि ' शेर छाप बीडी पिजीये ' ही अक्षरे याची साक्ष देत होती. भामरागड नद्यांनी वेढलेले आहे. इथे पामी, गौतमी व पर्लकोटा इंद्रावतीला मिळतात. संगमावरचा परिसर निसर्गरम्य आहे. वेद कुठे कुणाला स्फुरले असावेत याचा अंदाज या संगमावर येऊन घ्यावा. मोहाच्या झाडांनी जखडून ठेवलेले पर्वत नदीत आपले प्रतिबिंब न्याहाळण्यास आतुरलेले भासतात. उन्हाळ्यात चाळीस फूट पाणी असलेले नद्यांचे प्रवाह खडकाना बिलगून जाताना जो खळखळाट करतात तो ऐकतच राहावा वाटते. संगमावरच्या बगल्यात, अनार्यांना ख्रिस्ताचा संदेश देण्यासाठी आलेली केरळची सिस्टर जस्टिना हा खळखळाट ऐकते. भारतातल्या दुसऱ्या एखाद्या तरुणीला हा मोह न पडावा हे आश्चर्य आहे !

भामरागड हे हेडक्वार्टर करून आम्ही लाहेरीला गेलो. गावाबाहेर झाडाखाली उतरलो. गावातल्या स्त्रिया, पोरे जमली. पुण्याच्या कलासंपन्न समुद्र पाटील यांनी

लाहेरीतील लोकांना रिझवलें. इथे काही माडियांची गाणी आम्ही टेप केली. यानंतर याचा फार उपयोग झाला. कारण टेप केलेली माडियांच्या भाषेतली गाणी वाजवून दाखवून आम्ही त्यांच्याशी सहज कम्युनिकेशन साधू शकलो. लाहेरीनंतर बंगाडी येथे रात्री मुक्काम केला.

दुसरे दिवशी पहाटे आमच्या खऱ्या दुर्गम यात्रेला प्रारंभ झाला. बंगाडीच्यापुढे कुठेतरी कुवाकोडी नावाचे डोंगरावर एक गाव आहे इतकेच आम्हाला माहित होते. मिस्टर एल्व्हीन कुवाकोडीला जाऊ शकला नव्हता. त्याची खंत त्याने आपल्या पुस्तकात नोंदवून ठेवली आहे. कुवाकोडीची माणसे नरभक्षक आहेत असेही ऐकले होते. त्याचीच शहानिशा करण्यासाठी आम्ही सिद्ध झालो. बंगाडी सकाळी ५॥ वा. सोडले. पाऊल वाटेशिवाय दुसरा मार्ग नव्हता. पाऊलवाटेचा शोध घ्यावा लागत असे. आम्ही तीस तरुण मोठ्या उमेदीने वाट तुडवीत चाललो. बांबू आणि कुऱ्हाडी बरोबर घेतल्या. पिण्याचे पाणी पुढे कुठे मिळेल याची शाश्वती नव्हती. एकवेळ पुरेल इतके जेवण बरोबर घेतले. कुवाकोडीचे लोक कोणच्या तरी उंच झाडाची दारू पिऊन तहान भागवतात असे ऐकलेले. त्यामुळे वॉटरबॅगमधले पाणी कोणीच पीत नव्हता. पिकून गळून पडलेल्या पानावर पडणाऱ्या पावलांचा आवाज तेवढा होत होता. जंगलातले अनोळखी पक्षी शीळा घालीत होते. काही जण थकले ते मागे पडले. दयेने कुणालाही वागवायचे नाही हे आधीच ठरले होते. त्यामुळे चार-चार जणांच्या टोळ्या करून मार्ग कापणे सुरू झाले. दाट जंगलातून पुसटपणे गेलेली पायवाट किती डोंगर चढत होती आणि उतरत होती याचे भानच नव्हते. कुवाकोडीला जाणे या एकाच ध्यासाने प्रत्येक पाऊल पुढे पडत होते. कुठले जनावर अचानक अंगावर येईल याचाही नेम नव्हता. काही ठिकाणी दोन तीन पाऊल वाटा दिसत. डोंगरावरून वाहून जाणाऱ्या पावसाच्या पाण्यामुळे पडलेल्या पळी चकवत होत्या. दिशा दाखवणारा कोणीच नव्हता. आपणच दिशा ठरवायची होती. अनोख्या पाऊलवाटेवरचा अनोखा प्रवास साहसाला आव्हान देत होता. सतत चालत चालत आम्ही साडेदहा वाजता एका टेकडीवर पोहोचलो. चढ चढून वर येताच अचानक काही झोपड्या दिसल्या. सगळ्यात आधी आम्ही चौघे आलो होतो. आवाज न करता आम्ही गावात शिरलो. सगळ्या झोपड्यांची दारे बंद. गावात एकही माणस नव्हता. गावाच्या प्रत्येक झोपडीचा कानोसा घेतला. सारे कसे शांत शांत होते गावाच्या दुसऱ्या बाजूने बाहेर पडलो. पाऊलवाट उतरत जात होती. तिने पुढे सरकलो. उरस्कल दिसले, दगडगोट्यांच्या चौथऱ्यावर चादरीसारख्या वस्त्रात झाकून ठेवलेले काहीतरी पाहिले. मने चरकून गेली. पण धीराने तसेच कोणीतरी भेटेल या आशेने पुढे गेलो. एक दोन मैल पुढे गेल्यावर नुसते जंगलच जंगल होते. पाऊलवाटेचा पत्ता नव्हता. इतक्यात एक भिल्ल भेटला. बस्तरला (मध्यप्रदेशात) जाण्यास निघाला होता. त्याने आम्ही ज्या टेकडीवर आधी गेलो होतो तीच

कुवाकोडो असल्याचे सांगितले. पुनः परतलो. सहप्रवासी आले होते. येताना आम्ही झाडावर, पाऊलवाटेवर 'आम्ही या मार्गाने गेलो' अशा अर्थाच्या खुणा केल्या होत्या. त्यांचा त्यांना खूप उपयोग झाला होता. कुवाकोडोचा एक म्हातारा माणूस काही वेळानंतर आला. तो नरभक्षक नव्हता. गावातली सारी माणसे शेतावर गेल्याचे त्याने सांगितले. कुवाकोडीच्याही पलिकडे पेरिमलभट्टी नावाचे एक गाव असल्याचे ऐकले होते. त्या माणसाच्या साहाय्याने तिकडे निघालो. जाताना तो माडिया झरा दिसला की पाणी प्यायचा. म्हणायचा 'बाबा, रोटी हलके, पानी पीता' त्याचे हे शब्द मन चिरत जात असत. अंतःकरण छेदणारे त्याचे शब्द माडियाची भूक काय आहे हे सांगून गेले.

पेरिमलभट्टीत प्रवेश केला. तिथल्या दोन स्त्रियांनी बांबूची चाजली टाकून आमचे स्वागत केले. खाली वाकून नमस्कार केला. आम्ही त्यांचे अनुकरण केले. त्यांना अतिशय आनंद झाला. चेहऱ्यावरचे हसू आणि डोळ्यातले आपुलाव-शब्द शब्दांचे काम करतात. हे पटले. आम्ही बसलो होतो ते 'गोटूल'चे होते. गोटूल! माडियांच्या संस्कृतीचा कळस! त्यांच्या परंपरेचा उन्नत अविष्कार! शृंगार आणि मुक्त प्रणयाचा पवित्र स्थंडील!!

हजारो वर्षांपासून माडिया गोटूलचे जतन करीत आहे. गोटूल म्हणजे माड्यातील एक मध्यवर्ती झोपडी. थोडीशी विस्तीर्ण. तिच्यासमोर मोकळी जागा. गावातील तरुण पोरे आणि पोरी इथे—पावसाळा व इतर काही दिवस सोडून—रोज रात्री एकत्र जमतात. एकमेकांच्या खांद्यावर—कमरेभोवती हातांनी कवटाळून नाचतात, गातात. शजारी लाल निखारे फुलत असतात. नाचताना पाय स्पर्शून जातात. डोळे बोलतात. मने जडतात. जोडी पटते. अशी पटलेली जोडी केव्हातरी गावातून गुल होते. दुसऱ्या गावात जाऊन राहते. पोरीचा बाप पोरीला शोधत येतो. मुलाकडून खूप धान मागतो. पोराने धान दिल्यास ती पोरगी त्याची बायको होते. न दिल्यास मागितलेले धान देईपर्यंत पोरगा सासऱ्याच्या घरी राबतो. नुसते राबायचे ह. पोरीला हात लावायाचा. धान फिटल्यावर लग्न करायचे. ही झाली एक पद्धत. पण गोटूलमध्ये अशाही जोड्या जमतात की ज्या पळून वगैरे न जाता वृद्धांच्या साहाय्याने लग्न करतात. कधी कधी मुलाचा बाप मुलीच्या बापला गाण्यातून विनवतो की, 'तुमच्या मळ्यात सुंदर फूल फुलले आहे ते माझ्या मुलाच्या केसात माळावे'

लग्नात कसलाही धार्मिक विधी नसतो. नाचणे गाणे आणि गावातल्या लोकांना धान वाटणे म्हणजेच लग्न होणे. गोटूलमध्ये तरुण मुले-मुली एकत्र निजतात. दुसऱ्या गावामधून आलेल्या पाहुण्यास उतरण्याची व्यवस्था गोटूल मध्ये होऊ शकते. गोटूलचे असे अनेक उपयोग आहेत. वराला चेलका म्हणतात तर वधूला म्हणतात मोतीहारी! पेरिमलभट्टी एक Born Commune आहे. गावातले सगळे लोक एकत्र पिकवतात व येईल ते सारखे वाटून घेतात.

पेरिमलभट्टीहून परत येतानाचा प्रवास अतिशय नवीन होता. दुपारी अडीच वाजता आम्ही निघालो. मध्यावर आल्यावर अंधार पडायला लागला. बांबूच्या झाडातून सूं-सूं करीत जोराचे वारे वाहू लागले. आकाश एकाएकी काळवंडले. विजा चमकून पाऊस कोसळू लागला. दिवसभर थकलेले पाय आपोआप पुढे पडत होते. सगळा रस्ता खडकाळ होता. सरळ म्हणून टाकलेले प्रत्येक पाऊल वाकडे पडत होते. टॉर्चच्या प्रकाशात वाट शोधताना डोळे मिटत होते. पायाला लागणारा चप्पल कितीतरी जणांनी भिरकावून दिली. वाटेत आता पाणी नव्हते. वाळलेल्या पाचोळ्या वरून कशाचाही आवाज झाला तरी मन शहारत होते. चिंब भिजलेल्या अवस्थेत सुद्धा घामाच्या धारा लागल्या होत्या. चांदण्याचे दिवस असून चंद्राचा प्रकाश नव्हता. कसेतरी मुक्कामावर आलो.

ही यात्रा खरोखरच दुर्गम होती. हा अनुभव विलक्षण होता. पण याहीपेक्षा विलक्षण अनुभूती प्रत्येकाने घेतली होती.

निसर्ग, सौंदर्य, संस्कृती, परंपरा, मुक्तप्रणय आणि शृंगार या विशेषांच्या खाली खोलवर कुठेतरी माडिया तळमळतो आहे. शिकार मिळाली नाही तर तो विषण्ण होतो आहे. आपल्याला कधीच न उमजणाऱ्या अशा भूकेने विव्हल होऊन ती भूक विसरण्यासाठी मोहाची, ताडीची नाहीतर माडीची दारू पीत आहे. माडीया स्त्री आपल्या पोराला खायला काय घालायचे या चिंतेत आहे.

अजंठा-वेरूळला असणारे पाषाणी सौंदर्य इथे जीवंतपणे ओसंडत असते. परंतु यौवनाच्या सौंदर्य चकाखाली असणाऱ्या पोटात भूकेचा डोंब उसळलेला असतो. परिस्थितीची ही हालाखी, शरीर थकवून टाकणारी ही दमछाक, मन विषण्ण करणारी ही विवंचना कुठेतरी त्वेषात, संतप्ततेत, असंतोषात नाहीतर आत्मघातात मिटत असते. थकवा इतका येतो की शिकारीची प्रतीक्षा अखेर तीरांना रोखून


# व्होल्गा जेव्हा लाल होते

## ले. : वि. स. वाळिंबे

**मूल्य : अठरा रुपये**

**राजहंस प्रकाशन**

घरते. माडिया राहात असलेल्या विपुल-जल-सरितांच्या तीरावरची भूमी अजून वांझोटीच राहिली आहे. इथल्या भूमिची कूस अजून उजवलेलीच नाही. इंद्रावतीचा प्रवाह खडक फोडतो. तिची धारा तृष्णा शमवते. पण तिच्या काठचा माणूस अजून कोसरीच खातो. तो मोह वेचतो. मोह रितो, मोहून टाकणारे गीत गातो. त्याचे पदन्यास देखील मोहवतात. पण अन्नसेवनाची तृप्ती याला माहीत नाही. तो अजून बभूक्षूच आहे.

एक आख्यायिका अशी आहे की दंडकारण्यातील लोकांचे पाण्याच्या दुर्भिक्षामुळे हाल होत असत. भीमाने आपल्या खांद्यावरची कावड तिथे ठेवली. ही कावड म्हणजे इथे असणारे दोन डोंगर. आणि त्यातून बांदिया वाहू लागली.

आज माडिया भूकेने तडफडत आहे. प्रेमाला आसुसलेला आहे. सोमनाथ प्रकल्पाची धुरा वाहणारा भीम करूणेच्या कावडी माडियांच्या देशात वाहून नेण्याचा संकल्प करून आहे. माडियाला साध्या मीठासाठी चाळीस-चाळीस मैल जंगल तुडवत यावे लागते. भारतातल्या तरुणाला याची जाणीव व्हावी हा हेतू या शिबीरामागे होता. माडीयांचे दुःख पाहून ती व्यथा या तरुणाला सतत सलत राहवी हा उद्देश या मागे होता. तरुणांनी इथे Communes उभारावीत. माडियांच्या मोठाची गरज भागवण्यासाठी तरुणांनी यावे. आधुनिक विज्ञानाने इथली भूमी सुफलाम् करावी. उसाचे तुरे इथे डोलावेत. माडियाला पोटभरून जेवायला मिळावे अशी स्वप्ने आमटे पहातात. भारतातले तरुण हे आव्हान स्वीकारणार आहेत काय? माडियांच्या नृत्यातली विजली आणि त्यांच्या गीतामधील सूरांची गती जोपासायची असेल तर हे आव्हान स्वीकारण्याशिवाय गत्यंतर नाही.

□ □ □

---

## चार एकांकिका

वपृष्ठ १९ रून

कार्यरत न होता केवळ युवतीसारखे राहिल्याने एकांकिका परिणाम करू शकली नाही.

वरील चार एकांकिकांचे प्रयोग चांगले झाले. जे दोष जाणवले ते बहुतांशी लेखनाचे होते; त्यांची जबाबदारी 'रंगायन'च्या नटवर्गावर, दिग्दर्शकांवर, नेपथ्यकारांवर नव्हती. गेल्या वर्षभरात सौ. विजया मेहतांनी आपल्या संस्थेतील नटनटींना नाट्यप्रयोगाच्या इतर अंगांचेही जे शिक्षण दिले आहे त्याचा प्रत्यय या प्रयोगातून आला. एक नेटका, कार्यक्षम, डौलस नाटचसंघ मुंबईत तयार झाला आहे, त्याला सामोरा जायला प्रेक्षकवर्ग उत्सुक आहे—फक्त उणीव आहे योग्य नाट्यदृष्टी असणाऱ्या समर्थ लेखकांची. असे लेखन भविष्यात श्री. एलकुंचवार, श्री. दडवते, श्री. देशपांडे (चंद्रकांत) यांच्याकडून होईल अशी आशा आहे.

□ □ □

ग्रंथालयाच्या प्रशस्त दालनामधून हिंडत असताना जोशी म्हणाले,

'मागे विनोबाजी आसामकडे भूदानासाठी गेले होते. परतताना त्यांची पदयात्रा पूर्व बंगालमधून कलकत्त्यात आली होती.'

'पूर्व बंगालमधून?' त्यांना पाकिस्तानने परवानगी दिली होती?'

'विनोबा परवानगीची वगैरे वाट पहाणारा माणूस नाही! पण दिली होती म्हणतात. विनोबांना पूर्व बंगाल्यात माणूसकीचे फार उदात्त अनुभव आले. त्याचं सविस्तर वर्णन त्यांच्या "प्रेममय बांगला" ह्या अलीकडच्या पुस्तकात आलेलं आहे. एवंतेवी हा पुस्तकप्रेमी ज्ञानी माणूस कलकत्त्यात आलेलाच आहे, तर त्याला हे ग्रंथालय दाखवावं असं मला सारखं वाटू लागलं. पण धीर होईना. पण शेवटी भीड चेपून त्यांना विचारलं. आश्चर्य म्हणजे विनोबा यायला तयार झाले! म्हणाले, "फक्त माझी एक अट आहे. मी भल्या पहाटे येईन. नंतर मला वेळ नाही." मग आम्ही त्यांच्या मूळ पुस्तकाचं आणि भारतीय भाषांमधल्या त्यांच्या भाषांतरित पुस्तकाचं एक प्रदर्शन तयार केलं आणि ग्रंथालयात रात्रीच वस्तीला आलो. ठरल्या-प्रमाणे विनोबाजी पहाटेपूर्वीच्या काळोखात येऊन दाखल झाले! आम्हाला वाटलं पांच दहा मिनिटात काम आटपणार. पण विनोबाजींना पुस्तकांचा विलक्षण लळा. पुस्तकात त्यांची तंद्री लागली. हे वाच, ते वाच करीत ते सकाळची उन्हं पडेपर्यंत थांबले. सगळं विभाग फिरले. रेंगाळले. मग म्हणाले, "आता न्याहारीची वेळ झालीय." आणि पुन्हा परवानगीची वगैरे गोष्ट न काढता इथेच व्हरांड्यात बसले आणि दह्याची न्याहारी केली! न्याहारी संपल्यावर पुन्हा ग्रंथ चाळले. एकूण बेहद्द खूष झाले. पण जाताना म्हणाले, 'कशासाठी हा प्रचंड ग्रंथसंग्रह केलात? सध्याचा काळ कसला आहे? शत्रूराष्ट्राने एक बाँब टाकला तरी ही सगळी पुस्तकं जळून खाक होतील नि तुमचे श्रम क्षणात फुकट जातील! एक गीता असली की पुरे! तिच्यात आवश्यक ते सर्व काही आहे.'

ग्रंथालयात सुभाष समझदार नावाचे तरुण बंगाली कादंबरीकार कामाला आहेत. पूर्वी ते अबकारी खात्यात सब इन्स्पेक्टर होते. मी विचारलं,

'अशी पैसे मिळवून देणारी नोकरी का सोडलीत?'

'कारण मी लेखक आहे. त्या छापा घालण्याच्या कामाचा मला उबग आला.'

'तिथे तुम्हाला चोरट्या व्यापारातले लोकविलक्षण अनुभव मिळाले असते.'

'मिळाले, आणि त्याच्यात भांडवलावर मी "अबकारी दरोगा डायरी' हे माझं स्वानुभव कथन करणारं पुस्तक लिहीलं. त्यामुळेच माझं नाव झालं. मी सहा कादंबऱ्या लिहिल्या आहेत."

'कादंबऱ्या कशा खपतात ?'

'तो हिशोब ठरलेला आहे. सव्वाशे पानं, दोन हजारांची आवृत्ती नि पांच रुपये किंमत. चार पांच वर्षांत आवृत्ती उडते. पंधरा टक्के मानधन.'

'शरदबाबूंच्या म्हणे तीस-तीस आवृत्त्या निघाल्या !'

'तो न वाचा महिमा !'

'तुम्हा तरुण साहित्यिकांचं मंडळ वगैरे आहे ?'

आहे नं. आम्ही बारा तेरा नवे लेखक आठवड्यातून एकदा कॉफी प्यायला जमतो. बंगालमध्ये लेखकांच्या अड्ड्यांना फार महत्त्व आहे. अड्डे चालविण्याची आमची परंपराच आहे. शंभर वर्षांपूर्वी बंकीमचंद्राची 'दुर्गेश नंदिनी' ही पहिली कादंबरी प्रसिद्ध झाली. तेव्हापासून बंगालमध्ये साहित्यिक अड्डे सुरू झाले. टागोरांच्या घडवीवरही अड्डा असायचा. टागोरांची वहिनी कादंबरीदेवी त्या अड्ड्याचं नेतृत्व करीत होती.'

'तुमचा अड्डा सुखात चालला आहे ?'

'तसंच म्हणायचं, नुकतंच कृष्णचंद्रांनी आमचं एक बौद्धिक घेतलं.'

'म्हणजे तुम्ही डाव्या पक्षांशी बांधलेले लेखक आहात की काय ?

'सबंध बंगालमध्ये आता उजव्या पक्षाविषयी सहानुभूती असणारा एकही कलमबहाद्दर दिसणार नाही. कुठल्या भयानक परिस्थितीत हा आमचा सोनेरी बंगाल आला आहे बघा ! आगीत तेल म्हणून रोज हजारो निर्वासीत येताहेत. कोण ह्यांना खाणंपिणं देणार नि कोण ह्यांची देखभाल करणार ? सिआल्दा स्टेशनमध्ये मुंगी शिरायला जागा उरलेली नाही. पहाव तिथे पूर्व बंगालचे निर्वासीत ! बर, त्यांना दूरही ढकलता येत नाही, कारण ते आमचेच भाऊबंद आहेत. तुम्हांला माहीत आहे, ह्या एका कलकत्त्यात सरकारी आकड्याप्रमाणे दहा लक्ष फेरीवाले आहेत ! प्रत्यक्षात अधिकच असतील. ह्यातल्या प्रत्येकाचं उत्पन्न दिवसाकाठी रुपया-दोन रुपयांपेक्षा कधीच जास्त नसतं. कसे ते संसार करीत असतील ? आणि असे दहा लाखांपेक्षा अधिक बंगाल ! अनेक शहरांची लोकसंख्याही दहा लाख नसते, तर आमच्या कलकत्त्यात एक कोटी रहिवासी नि त्यांच्यातले दहा-बारा लाख असते फेरीवाले ! ह्याला काय अर्थ आहे ? उजव्या लोकांनी बंगालची राखरांगोळी करुन टाकली. आता ह्यापुढे ह्या भूमीचा प्रश्न डाव्या-उजव्यांचा नाही, भूकेचा नि उपासमारीचा आहे. हेच सत्य आता आम्ही नवे बंगाली लेखक आपापल्या परीने सांगत असतो.'

परतताना पुन्हा अलीपूर जेलच्या भिंताडाच्या बाजूनेच आलो. झाडांवर इटुकल्या खारी इकडून तिकडे नाचत होत्या. रस्त्यावर हत्यारबंद पोलीस गस्त घालीत होते. भींताडाआड कैदी काळोख कालवीत बसलेले असणार. मन जड झालं. नाक्यावर एक फेरीवाला समुद्रातले प्रचंड जीव घेऊन बसला होता. ते मासेही नव्हे,

कासवंही नव्हती. खेकडेही नव्हते. कापलेल्या सुरणाच्या कांग्रासारखे ते दिसत होते. मी निरखू लागलो तेव्हा त्या फेरीवाल्याला वाटलं गिऱ्हाईक आलं. म्हणून त्याने बलदीतल्या पाण्याचा एक हबका त्या खडकाळ जीवावर मारला. ताबडतोब निश्चेष्ट पडलेले ते जीव वळवळू लागले. मला पहावेना. अंगावर शहारे आले. निसटलो. निर्मळ म्हणाला,

'गरीब कामगार तो सागरी प्राणी उकडून खातात. आम्ही नाही खात.'

भूकेपुढे शहाणपण नाही हेच खरं. आदल्या संध्याकाळी मी एका खेड्यात गेलो होतो. तिथे बाजारात कमळाच्या फुलांची रास विक्रीला ठेवलेली होती. मी विचारलं,

'आज इकडे देवाची जत्रा वगैरे आहे काय ? फूलं एवढ्या प्रमाणावर विकायला आली आहेत म्हणून विचारतो.'

'छे, छे ! कमळ हे कंगाल बंगाल्याचं अन्न आहे. कमळाची भाजी उकडून खातात. कमळाच्या पाकळ्यांची भजी फार चवदार लागतात ! तेव्हा ही कमळं स्वस्तातली भाजी म्हणून ठेवलेली आहेत.'

सौंदर्य भूकेपुढे हार खातं हेच खरं !

'माणूस'च्या लेखिका सौ. तारा पंडित आणि श्री. पंडित 'कलम-ओ-तुली' नावाच्या साहित्यिक अड्ड्यात रस घेतात. हा अड्डा चित्रकार आणि लेखकांचा आहे. श्री. पंडित स्वतः उत्तम चित्रकार आहेत. त्यांच्या कालीघाट मार्गावरल्या घराच्या चित्रांनी भरलेल्या भिंती म्हणजे नेत्रसुखाची एक पर्वणीच वाटली. पहावं तिकडे वहाते रंग ! ते बाबासाहेब आमटयांच्या माणूसकीच्या कामातही रस घेतात. सौ. पंडित यजमानांच्या सर्व कामात रस घेतात. लिहितातही.

चित्तरंजन बंदोपाध्याय ह्या निबंधकारांना त्यांच्या कचेरीत भेटलो. ते वरीष्ठ सरकारी अंमलदार आहेत. वेष मात्र धोतर आणि झब्बा. इकडे महाराष्ट्रात असं चित्रं कालत्रयी दिसणार नाही. ते म्हणाले,

'उत्तम साहित्याची निर्मिती करणाऱ्या बंगाली लेखकांना अनेक पारितोषिकं इकडे ठेवलेली आहेत. रवींद्र स्मृती पुरस्कार, शरद स्मृती पुरस्कार, वगैरे पारितोषिकं चांगली घसघशीत असतात. हे फार मोठं उत्तेजन इकडल्या लेखकांना आहे.'

'सध्या सर्वश्रेष्ठ बंगाली लेखक कोण आहे ?'

'तो मान सत्तरी ओलांडलेल्या ताराशंकर बॅनर्जीकडे जातो. भारतात साहित्यिकाला मिळायचे, ते सर्व मान त्यांना मिळाले आहेत. एक लाख रुपयाचं भारतीय ज्ञानपीठ पारितोषिक त्यांच्याच 'गणदेवता' ह्या कादंबरीला मिळालं. साहित्य अकादमीचा पाच सहस्त्र रुपयांचा पुरस्कार मिळाला. रवींद्र आणि शरद पुरस्कारही मिळाले. बंगाली मातीशी इमान राखून ताराशंकर लिहितात. ते ग्रामीण लेखक

आहेत. ते स्वातंत्र्य संग्रामात तुरुंगातही जाऊन आलेले आहेत. लेखनातलं सातत्य हे त्यांचं वैशिष्ठ्य. शंभराहून अधिक पुस्तकं त्यांच्या नावावर आहेत.'

'सध्या सर्वांत वयोवृद्ध साहित्यिक कोण आहेत ?'

'नरेंद्र देव आणि सौ. राधाराणी देव हे कविदांपत्य सर्वांत वयस्कर आहे. त्यांनी ऐंशी वर्षं ओलांडली आहेत. मन्मथ रॉय नावाचे सर्वात जुने आणि जुनाट पद्धतीने लिहिणारे एक नाटककारही असेच पुराणपुरुष आहेत.'

'इथे जुन्या नाटकांची सद्दी आहे ?'

'जुन्या नाटककारांचे आणि नाटकाचे दिवस कलकत्त्यात संपलेच म्हणायचे. आता बिजोन भट्टाचार्य, तपससेन, शंभु मित्र, उत्पल दत्त, बादल सरकार, ह्या नव्या मंडळींचं युग सुरू झालं आहे. मला वाटतं बंगालमध्ये नाटकांचे सध्या चार-पाचशे तरी संघ असतील. शंभु आणि तृप्ती मित्रांची 'बहुरूपी' ही सर्वात प्रमुख नवनाट्य संस्था आहे. ती मंडळी टागोरांचं 'चार अध्याय' हे नाटक गेली वीस वर्षं करीत आहेत. 'सेतु' ह्या नाटकाचे ओळीने सव्वाहजार प्रयोग एकाच कंपनीने केले.

'सत्यजीत रे रंगभूमीवर गाजले ?'

'ते सिनेमात अधिक गाजले. पण रंगभूमीवरही त्यांनी भरीव कामगिरी केली आहे. शंभु मित्र, सत्यजीत रे, गंगापद बसू, वगैरे मंडळींना बाँगला रंगमंच प्रतिष्ठान समिती सुरू करून नवनाट्याचा सतत पुरस्कार केला. आमच्याकडे फक्त ब्रेख्टचीच नाटकं करणारी ब्रेख्ट सोसायटी आहे. 'एपिक थिएटर' नावाचं नाट्यविषयक षण्मासिकही निघतं. त्यात प्रत्येक अंकात पाच नवी नाटकं संपूर्ण छापतात. नाट्य-विषयक आणखी ही नियतकालीकं आहेत. बहुरूपी, अभिनयदर्पण, वगैरे.'

'आधुनिक बंगाली रंगभूमीवर सर्वांत लोकप्रिय काय आहे ?'

'बालरंगभूमी ! समर चटर्जी हे बालरंगभूमीचे म्होरके. त्यांनी साठ-सत्तर बाल कलाकार घेऊन सर्व जगाचा प्रवास केला ! सर्व जगभर लहान मुलांची नाटकं दाखवली. इथे लहान मुलांच्या नाटकासाठी स्वतंत्र नाट्यगृह आहे. त्याचं नाव अबनमहल.'

जोशी म्हणाले, 'आणि बंगाली रंगभूमीचं दुसरं वैशिष्ठ्य म्हणजे इकडे कादं-बऱ्यांचं नाट्यीकरण करण्याची साथ फार जोरावर आहे. देवनारायण गुप्त असं नाट्यीकरणं करतात. त्यांच्या 'श्यामोली' नाटकाने लोकप्रियतेच्या बाबतीत बंगाली रंगमंचावर कहर करून दाखवला.'

दुसऱ्या दिवशी सकाळी चेतला मार्गावरल्या विमल मित्र ह्या अत्यंत लोकप्रिय कादंबरीकाराकडे गेलो. विश्रब्ध गप्पालाप करताना त्यांनी सांगितलं,

'शरदबाबू बंगाली साहित्याला लाभले ही नियतीची कृपा. कारण शरदबाबू नोकरीसाठी ब्रह्मदेशात रंगूनला होते. तिथे लेखक म्हणून ते फुलणं अशक्य होतं. ते ए. जी. च्या ऑफिसात होते. महिना सत्याण्णव रुपयांवर. त्यांच्या इथल्या मित्रांनी त्यांच्यासाठी शंभर रुपयांची नोकरी तयार केली आणि तीन रुपयांच्या फायद्याकडे

बघून शरदबाबू कलकत्त्याला परतले. मग जन्मभर इथेच होते.'

'शरदबाबू मुळचे कुठले ?'

'हौरा जिल्ह्यात बॅण्डेल जंक्शन नावाचं रेल्वे स्टेशन आहे. तिथून रिक्शाने देवानंदपूरला जाता येतं. शरदबाबू त्या देवानंदपूरचे. ते स्वभावाने भटके होते. त्यांना मूलबाळ नव्हतं. एकसष्टाव्या वर्षी ते वारले. त्यांची इस्टेट त्यांच्या पुतण्याला आयतीच मिळाली आहे. त्याला आता कैफ चढला आहे.'

'देवानंदपूरला मी जाऊ ? काय आहे तिकडे ?'

'न जाणं बरं कारण तिथे फक्त शरदबाबूंचं जुनं गावठी घर आहे. पूर्वी दरवर्षी पुण्यतिथीला इकडली साहित्यिक मंडळी तिथे टोळीने जायची. पण सध्या दिवस फिरले आहेत, कोण कशाला जीव धोक्यात घालणार ? तशात नक्षलवादी सगळीकडे पुतळे फोडीत सुटले आहेत. त्यांना कळलं की तुम्ही शरदबाबूंना मानवंदना देण्यासाठी आला आहात, तर क्षणात ते तुमचं टाळकं फोडतील ! तेव्हा देवानंदपूरची फेरी रद्द करा.'

'नक्षलवादी असली अघोर कृत्यं का करीत आहेत ?'

'कारण त्यांना परंपरेची पाळंमुळं खणून काढायची आहेत. राजा राममोहन रॉय, विवेकानंद, ईश्वरचंद्र विद्यासागर, अशुतोष मुखर्जी ह्या सर्वांचे पुतळे धुळीला मिळले, कारण तत्कालीन भांडवलदारांनी त्यांना Show Pieces म्हणून वापरले आणि तसं वापरलं जाण्याला त्यांनीही नकार दिला नाही. म्हणून ते भांडवलदारांचे साथीदार. तेव्हा त्यांची नावंच इतिहासातून पुसून टाकण्याचा नक्षलवाद्यांचा प्रयत्न आहे. पुन्हा हिंसेचं त्यांना सुतराम वावडं नाही. मनुष्यमात्र ही त्यांच्या हिशोबी क्षःपदार्थ गोष्ट आहे'

'अशा अश्रद्धेच्या वातावरणात लेखन कसं काय स्फुरतं ?'

'तो सवयीचाच भाग आहे. पण मनातून सगळे लेखक खचलेलेच आहेत.'

'बंगालमध्ये वाचकवर्ग वाढतो आहे ?'

'हो. शिवाय आमची पुस्तकं पूर्व बंगालमध्ये फार मोठ्या प्रमाणावर चोरून नेली जातात. ह्या स्मगलींगमुळे आमचं मानधन बुडतं.'

'मग पूर्व बंगालच्या वाचकांचा तुम्हाला राग येतो ?'

'नाही. अखेर आम्ही एकच भाषा बोलतो ना !'

'पण पूर्व बंगालमधले बहुतेक वाचक मुसलमान आहेत.'

'इतरत्र मुसलमानांवर हिंदूंचा जसा दात असतो, तसा प्रकार बंगालमध्ये नाही. कारण बंगालमध्ये पूर्वीपासूनच मुसलमान बहुसंख्य होते. इथे पूर्वी मुसलमान नबाबांचंच राज्य होतं. मंत्रिमंडळंही नेहेमीच लीगची असायची. तेव्हा बंगाली हिंदू हा जात्याच मनातून मुसलमानांना मानत असतो. शिवाय भाषा ही एकच. तेव्हा. इथे तसं शत्रुत्व नाही. इथल्या सामान्य जनतेचं शत्रुत्व पाकिस्तानशी आणि भारत सरकारशी आहे. भारताच्या चरणीच सर्वांच्या निष्ठा असल्या पाहिजेत हे निर्विवाद

आहे. मातृभूमीपेक्षा श्रेष्ठ काही नाही. पण बंगाली तरुणांना हे पटत नाही. ते मास्कोकडे आशेने पहात आहेत.'

'तुमचा पेशा कुठला होता ?'

'मी रेल्वेत कारकून होतो. मग युद्धकाळात तात्पुरता पोलिसात गेलो. तिथे माझ्या एका मित्राचा खून झाला. तेव्हा मी घाबरलो नि कलकत्त्याला आलो. आता खुद्द ह्या कलकत्त्यातच रोज मुडदे पडताहेत !'

'अशा वेळी लेखकाचं कर्तव्य काय आहे ?'

'लेखकाने कुठल्याही काळात प्रामाणिक असलं पाहिजे. त्याच्याकडे इमान पाहिजे आणि सत्याला तो बांधलेला असला पाहिजे.'

'लेखनावर तुमचा चरितार्थ कसा काय चालतो ?'

'उत्तम.'

बोलूनचालून मी लेखकांचे खिसे चांचपायला निघालेला मनुष्य. लेखणीवर जगणाऱ्या चार लोकांचं बरं चाललं आहे हे पाहून संतोष वाटला. बंकीमबाबू, रविंद्रनाथ, शरदबाबू, 'पथेर पांचाली' कार विभुतीभूषण बंदोपाध्याय आणि माणिक बॅनर्जी हे आधुनिक वंग साहित्याचे पंचप्राण होत. ताराशंकर बंदोपाध्याय हा नवा तारा आता वंग साहित्याच्या क्षितिजावर चांगला हातभर वर आला आहे. पण गंगेपलीकडचं नभोवितानच जर लालभडक व्हायला लागलं, तर ह्या आणि इतर ताऱ्यांचं अस्तित्व तरी जाणवेल की नाही ह्याची शंकाच आहे. रविंद्रांना आपण गुरुदेव म्हणतो. महामानव म्हणतो. त्यांना ह्या स्थानावरून चार पायऱ्या खाली उतरावं लागेल असं सनसनाटी बऱ्याच बंगाली लेखकांच्या बोलण्यात आलं. पण कुणाजवळच शाबित होऊ शकेल असा रोकडा पुरावा नव्हता. एक गोष्ट मात्र आता कागदोपत्री सिद्ध झालेली आहे. ती म्हणजे पूर्वाश्रमीच्या कु. अन्नपूर्णा आत्माराम तर्खडकर आणि नंतर मिसेस ॲना लिटलडेल झालेल्या घटस्फोटीतेबरोबर रविंद्रांचे ऐन तारुण्यात नाजूक भावबंध जुळले होते. डॉ. आत्मारामपंत हे मुंबईतले ब्राह्मो समाजिस्ट. त्यांनी आपली द्वितीय कन्या अन्नपूर्णा हिला विलायतेला पाठवलं. बहुधा विलायतेला जाणारी ती पहिली मराठी स्त्री असावी. तिचा बडोद्याच्या महाविद्यालयाचे उपप्राचार्य मि. हॅरॉल्ड लिटलडेल यांच्याशी विवाह, ती मुंबईला परतल्यानंतर झाला. पुढे न पटल्यामुळे ती विभक्त झाली. नंतर तिची चौपाटीवरच्या विल्सन कॉलेजच्या पिछाडीच्या बंगल्यात रविंद्रनाथांशी गाठ पडली. रविंद्रांपेक्षा सहा वर्षांनी वडील होती. त्या त्यांच्या नात्याचा नीट उलगडा होत नसला तरी ते रेशमी बंध होते इतका पुरावा आता संशोधकांनी उपलब्ध केला आहे. पुढे रविंद्रनाथ आपल्या मार्गाने गेले. ॲना, म्हणजेच अन्नपूर्णा, एडिंबरोला गेली. तिथेच ती वारली. एडिंबरोला तिची कबर आहे ! तात्पर्य : गुरुदेव झाला, तरी कुठे तरी तो तुमच्या आमच्या सारखाच आयुष्य भोगणारा माणूस असतो. हे सत्य जसं आनंददायक, तसंच दिलासादायकही आहे ! □ □ □

# अंदाज

पंडित वि. म. जोशी
ज्योतिष विशारद

१५ ते २१ मे १९७१

**मेष** : शरीर प्रकृती साधारण नरमच राहील. धनस्थिती चांगलीच सुधारेल. पत्नीकडून अगर भागिदाराकडून भरपूर पैसा मिळेल. पराक्रम हातून घडेल भावंडाकडून सर्व बाबतीत मदत होईल. घरात धार्मिक समारंभ होईल. हा योग सोमवार मंगळवारी येईल. सरकारी कामात थोडी माघार घ्यावी लागेल.

विद्याभ्यासात संपूर्ण प्रगती कारक दिवस आहेत संततीचा उत्कर्ष होईल. सरकारी नोकरीत असलेल्या मुलाला प्रमोशन मिळेल. हा योग बुधवारी येण्याचा जास्त योग आहे. मशिनरीच्या एजंट लोकांना भरपूर पैसा मिळण्याचा योग. उद्योग व्यवसाय चांगला चालेल. चुकभूल होऊन नुकसान होण्याचा योग आहे. शुभ तारखा १५।१८।१९.

**वृषभ** : शरीर प्रकृती नरमच राहील. मूत्रविकाराचा त्रास होईल. मेद वाढेल. धनस्थानाची स्थिती बिघडेल. संततीकरता खर्च करावा लागेल. प्रवासाचा योग आहे तो टाळावा. प्रवासात वस्तू गहाळ होण्याचा योग आहे. घरासंबंधी प्रश्न चांगल्यारीतीने सुटतील. कोर्टात गेलेली कामे मनासारखी होतील. मंगळवार बुधवार चांगले जातील.

विद्याभ्यासात माघार घ्यावी लागेल. बौधिक व्यवसाय करणारांना अपयश येईल. शेतकी करणारे, कन्त्राटदार, लोखंडी सामानाचे व्यापारी या लोकांना भरपूर काम मिळेल. सरकारी कामे मिळतील. संततीकडून त्रास होईल. मुलांकडून मुलींना मागणी घातली जाईल. हा योग पुढल्या आठवड्यात येईल. सप्तमातील गुरू सर्व अडचणी दूर करील. शुभ तारखा १८।१९।२०।२१.

**मिथुन** : शरीर प्रकृती चांगलीच राहील. धार्मिक कामाकरता खर्च होईल. भावंडाकडून मदत होणार नाही प्रवास टाळावा. प्रवासात अपघात होण्याचा संभव आहे. घरात झगडे होतील. रविवारी जास्त जपावे. रवि-शनि-गुरु दृष्टीयोग चांगला आहे पण त्याला स्थानबल नाही. भागिदार जरा व्यवहारात विरोध करतील. त्यामुळे रविवार सोमवार मनस्ताप होईल सरकार कामात अपयश येईल.

विद्याभ्यासात संपूर्ण यशप्राप्ती होईल. तत्वज्ञान, वैद्यकशास्त्र, नाटयकला, चित्रकला वगैरे शिकणाराना अत्यंत प्रगतीकारक दिवस आहेत. कन्या संततीचा उत्कर्ष होईल. विवाह जमण्याचा योग येईल. उद्योगधंद्यात थोडा पैसा जास्त गुंतल्यामुळे अडचणी निर्माण होतात. पण गुरु धनस्थान व दशमस्थानावर ९।५ दृष्टिने पाहात

असल्यामुळे मान व धनस्थिती सावरली जाईल. शुभ तारखा १८।१९।२०।२१.

**कर्क :** शरीर प्रकृती साधारण राहील. रविवार सोमवारी घरात मतभेद होतील. प्रवास योग येईल. त्यात फायदा होईल. स्थावरासंबंधी प्रकरणे यशस्वी होतील. पैशाला कमी पडणार नाही. मागील बाकी वसूल होईल. घरात शुभ समारंभ होईल. सर्व नातलग माणसे विशेषत: भाऊ बहिणी एकत्र येऊन सप्ताह आनंदात जाईल.

विद्याभ्यासात थोडया कष्टानतर यश मिळेल. रविवार सोमवारी संततीकडून त्रासदायक वागणूक होईल. २८ ते ३२ वयातील मुलाकडून मनाविरुद्ध वागणूक होईल. विवाह जमण्याला दिवस चांगले आहेत. ज्यांचे जन्म रवि वृषभ अगर वृश्चिक राशीत असतील त्याना हा योग जास्त आहे. धंदा व्यवसाय साधारण मंदीतच राहिल. सार्वजनिक कामात यश. शुभ तारखा १८।१९।२०।२१.

**सिंह :** शरीर प्रकृती राहील. धनस्थानची स्थिती चांगलीच राहील. एकादशेश व धनेश बुध भाग्यात आहे तो चांगलाच आहे. प्रवास योग येईल. त्यात फायदा होईल. घरात काहीतरी शुभ समारंभ होईल. सरकारी कामात संपूर्ण यश प्राप्त होईल. धार्मिक वृत्ती वाढेल. शत्रुचा नाश होईल. षष्ठातील मंगळ राहू प्रतिपक्षाला चीत करतील. एकादशेष व बुध-शुक्र भाग्यात आहेत ते फारच चांगले आहेत. ३२ पुढील व्यक्तींना अचानक प्रगती घडवणारे दिवस आहेत.

विद्याभ्यासात यशप्राप्ती होईल. विद्येच्या जोरावर उद्योग धंदा सुधारेल. संततीकडून सर्व बाबतीत कामात मदत होईल. चित्र कलाकार, सुगंधी तेलाचे व्यापारी फॅन्सी मालाचे व्यापारी याना व्यापारात अमाप फायदा होईल. करील लोकाना सरकारी कामात यश मिळेल. घेतलेल्या प्रत्येक कामात प्रगती होईल.

**कन्या :** शरीरप्रकृती बिघडेल. ३२ ते ४२ वयातील व्यक्तींना हा अनुभव जास्त येईल. धनस्थानची स्थिती बरी राहील. प्रवासाचा योग येईल त्यात त्रास होईल. घरात भावंडे व मित्र येऊन आठवडा आनंदात जाईल. पाहुण्यांकरता खर्च करावा लागेल. फौजदारी वकिलांना धन योग चांगला आहे. भागिदारांकडून मदत होईल.

संततीकरता बराच त्रास सोसावा लागेल. विद्येत अपयश येईल. साहित्यिक प्रकाशक, शिक्षक इत्यादी बौद्धिक व्यवसाय करणारांना दिवस नुकसानकारक आहेत तिसरा गुरु संकटातून आयत्या वेळेला मदत मिळवून देऊन सोडवील. मित्रांकडून फसवणूक होण्याचा संभव आहे. शुभ तारखा १५।१८।१९।२०।२१.

**तूळ :** शरीरप्रकृती उत्तम राहील. धनस्थानची स्थिती बरी राहील. भावंडांकडून व संततीकडून धन प्राप्ती होईल. हातून पराक्रम घडेल. प्रवास योग येईल. हा योग शनिवारी येईल. त्यात मानमान्यता मिळेल. सरकारी कामे पुढे ढकलावी घरात मतभेद होतील. रविवार-सोमवार हा योग आहे.

विद्याभ्यासात यशप्राप्ती होण्याला अनेक अडचणी येतील. तत्वज्ञान घेऊन वरिष्ठ पदवीकरता अभ्यास करणारांना संपूर्ण यश मिळेल. अचानक धनलाभ होण्याचा योग आहे. सरकारी कामात अपयश येईल. एजन्सीचा धंदा करणारांना

धंद्यात नुकसान येईल. मोत्याचा व जडजवाहिराचा धंदा करणारांना फायदा होईल. शुभ तारखा १८।१९।२०।२१.

**वृश्चिक :** शरीरप्रकृतीला त्रास होईल. उष्ण विकाराने आजारी पडण्याचा योग आहे. प्रवास योग येईल तो टाळावा. शत्रूंकडून कामात सारखे अडथळे आणले जातील. घरात पाहुणे येतील व आठवडा आनंदात जाईल. सरकारी कामात मुख्य भाग घ्यावा लागेल. गुरुवार शुक्रवारी हा योग येईल.

विद्याभ्यासात संपूर्ण यश प्राप्त होईल. संततीचा उत्कर्ष होईल. स्थावरासंबंधी चालू असलेली प्रकरणे नाटाणे मनासारखी होतील. पत्नीशी थोडासा मतभेद होण्याचा योग आहे. सरकारी नोकरांना कामाचा ताण जास्त पडेल. दगलीचे प्रकार जास्त होतील. बंगालच्या घडामोडीत इंडिकेटच्या म्हणजेच याह्याखानाचा जोर वाढेल. १४ ते २१ तारखापर्यंत हा त्रास जास्त होईल. शुभ तारखा १८।१९।२०।२१.


अपूर्व गर्दीत सुरू आहे....

पत्रकार गुप्तहेर बनल्यानंतर देशद्रोह्यांची काय त्रेधा उडते,

एफ्. सी. मेहराकृत चित्तथरारक चित्र

एफ.सी.मेहरा कृत

# एलान

ईस्टमनकलर

| छाया दिग्दर्शन | संगीत | पटकथा संवाद |
|---|---|---|
| के. रमणलाल | शंकर जयकिशन | व्रजेंद्र गौड |

भू :– विनोद मेहरा, रेखा, विनोद खन्ना, हेलन, मदनपुरी व राजेंद्रनाथ

**एरॉस** रोज १२–३०, ३–३०, ६–३०, ९–३०

**मोती** १२–३०, ३–३०, ६–३०, ९–३०

**जयहिंद** रोज ५ खेळ

**रूपम** ३–३०, ६–३०, ९–३०

**पॅराडाईज** १२–३०, ३–३०, ६–३०, ९–३०

**दिपक** (डिलाईल रोड) १२–३०, ३–३०, ६–३०, ९–३०

**नेपच्यून** (वांद्रा)

अंबर–संगम (अंधेरी), न्यू इरा (मालाड), अनुपम (गोरेगाव), लीडो (जुहू), सहकार (चेंबूर), अजंठा (बोरीवली), उदय (घाटकोपर), आकाश (कुर्ला), अशोक (ठाणे), गणेश (मुलुंड), कृष्ण (कल्याण), अमन (उल्हासनगर), व्यंकटेश (पार्ले), प्रभात (वसई)

–बॉम्बे पिक्चर्स सर्कीट प्रकाशन–

धन : शरीरप्रकृती जरा अपचनाच्या विकाराने बिघडेल. धनस्थानाची परिस्थिती चांगलीच राहील. मामा अगर सासऱ्याकडून जरूर ती पैशाची मदत होईल. घरात एकादा शुभ समारंभ घडेल. विवाहाची बोलणी होण्याचा योग आहे. हा योग गुरुवार-शुक्रवारी येईल. शत्रुनाश होईल. सरकारी कामात अपयश येईल.

विद्याभ्यासात यश येईल. शास्त्रीय व साहित्य दोन्ही क्षेत्रात प्रगती होईल. २७ ते ३२ वयातील व्यक्तींना हा अनुभव जास्त येईल. संततीची प्रगती होईल. मुलांकडून पैशाची मदत चांगलीच होईल. रवीवारी-सोमवारी हा योग येईल. दिवस प्रगती पथावर नेणारे आहेत. शुभ तारखा १५।१८।१९।२०।२१.

मकर : शरीरप्रकृतीत उष्ण वाताचा विकार होण्याचा योग आहे. स्वभावात हट्टीपणा वाढेल. तो आवरावा. पैसे आपोआप मिळतील. लेखकांना, कवींना दिवस फार चांगले आहेत. प्रवास योग येईल. हातून पराक्रम घडेल. मित्र व भावंडे सर्वप्रकारे मदतीला धावून येतील. घरात शुभ समारंभ बुधवार अगर शुक्रवारी होईल. दिवस आनंदात जातील.

विद्याभ्यासात यश मिळेल. शेतकी किंवा यांत्रिक शिक्षण घेणाराना सरकारी मदत मिळेल अनपेक्षित सरकारी पैशांची मदत मिळेल. कलाकार, फॅन्सी मालाचे व्यापारी यांचा उद्योग धंदा चांगलाच चालेल. अचानक धनलाभ होईल. गुरुवार शुक्रवारी हा योग येईल. शुभतारखा १५।१८।१९।२०।२१

कुंभ : शरीरप्रकृती चांगली सुधारेल. लग्नेश शनि चतुर्थात व समोर गुरु हा योग सुखसमाधान, मानमरातब मिळवून देईल. मगळवार बुधवारी हा योग येईल. प्रवास योग येईल. हातून पराक्रमाच्या घटना घडतील. भावंडांशी मतभेद होईल. धनस्थिती चांगलीच सुधारेल. व्ययातील मंगळ पोझिशनला थोडा कर्मपणा आणील. ४२ च्या पुढील व्यक्तींना हा अनुभव येईल.

विद्येत प्रगति निश्चित होईल. संशोधन करण्याला दिवस चांगले आहेत. घरासंबंधी प्रश्न मनासारखे सटतील. भागिदार व पत्नी सर्व बाजूनी मदत करतील. शास्त्रीय काम हातून घडेल. मंगळवार बुधवारी हा योग आहेत. हातात घेतलेले प्रत्येक काम यशस्वी होईल. धंदा व्यवसाय बेताने चालेल. शुभतारखा १५।१८ १९।२०।२१

मीन : शरीर प्रकृती चांगलीच राहील. धनस्थितीत सुधारण होईल. धनातील बुध शुक्र अचानक धन लाभ देतील. बद्धी व शास्त्र यांच्या सयोगाने पैसा मिळेल प्रवास योग येईल. प्रवासात मोठ्या माणसांच्या गाठी पडून त्या पासून कायम स्वरूप चे अर्थलाभ होतील. घरात पत्नीच्या माहेरची माणसे पाव्हणे येतील.

आध्यात्मिक विद्येत प्रगती होईल भाग्यातील गुरू फारच चांगला आहे. मानमरातब व पैसा दोन्ही प्राप्त करून देईल. व्यापार धंदा चांगलाच चालेल प्रकाशकांना दिवस फार चांगले आहेत. वडील भावंडाशी मतभेद होईल. मित्रांकडून सर्व प्रकारे मदत होईल. शुभ तारखा सर्व सप्ताह शुभफलदाय आहे.

ज्योतिबा फुले, विठ्ठल रामजी शिंदे प्रभृती ब्राह्मणेतर नेत्यांच्या निष्ठांचेही ग्रहण त्यांनी केलेले दिसते.

सामाजिक आणि वैयक्तिक अन्यायाबाबत चीड असणे हे उदारमतवादाचे एक मुख्य लक्षण मानता येईल. पारतंत्र्याबद्दल संताप असणे हे अन्यायाबद्दल चीड असण्याच्या व्यापक भूमिकेचे एक विशिष्ट अंग मानता येईल. भारतीय प्रबोधनाच्या व राष्ट्रवादाच्या संदर्भात 'मवाळ' व 'जहाल' यांच्यातील मतभेदांचे स्वरूप या दृष्टीने आज पुन्हा तपासणे जरूर आहे. नानासाहेबांची भूमिका लोकमान्यांचे शिष्यत्व पत्करूनदेखील उदारमतवादी आणि व्यापक स्वरूपाची होती. डॉ. आंबेडकर व कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कामाचे महत्त्व म्हणूनच त्यांना पटू शकले. व्यक्तीच्याबाबत अन्याय झालेलाही त्यांना सहन होत नसे. थोडे व्यक्तिगत असले तरी, आणि कृतज्ञ भावनेनेही, याचे एक उदाहरण मी देऊ इच्छितो. विश्वकोश-कार्यात मी नानासाहेबांच्या संस्थेतून गेलो पण मला कोर्टात जावे लागले, तेव्हा पुण्याहून सातारला जाऊन कोर्टात त्यांनी माझ्यासाठी साक्ष दिली.

आपल्या अर्थशास्त्रीय विचारपद्धतीत त्यांनी रानडे यांची पद्धती अवलंबिली असे ढोबळ मानाने म्हणता येईल. बहुजनसमाजाच्या हिताकडे लक्ष देणे, आणि उद्धारकर्त्याची भूमिका न घेता बहुजनसमाजातूनच नेतृत्व उदयास येण्यासाठी प्रयत्न करणे, ही भूमिका त्यांनी फुले यांच्या प्रभावामुळे घेतली. नेमस्त किंवा उदारमतवादी नेत्यांच्या शिकवणीत पारंपरिक रूढ संस्थांचा, चालीरीतींचा व श्रद्धांचा अधिक्षेप नव्हता, पण त्या संस्थांच्या व श्रद्धांच्या जागी आधुनिक समाजधारणेची व लोकशाहीची तत्त्वे हळूहळू रुजली पाहिजेत असा आग्रह मात्र होता. गाडगीळांना हे क्रमशील आधुनिकीकरण मान्य होते. यामुळेच, पारंपरिकतेला ते उगाच दुखवीत नसत, पण धर्मश्रद्धेचा भाबडा प्रपंच नेत्यांनी करावा हे त्यांना रुचत नसे. गांधीजींच्याबाबत त्यांची भूमिका टीकाकाराची होती, ती यामुळे की आधुनिकीकरणाला विरोधी अशी भूमिका गांधीजी घेत. निदान गांधीजींच्या विचारातील एवढ्या एका भागावर गाडगीळांचा राग होता असे म्हणता येईल. गांधीजींचे सहकारी विनोबा जेव्हा भूदानाचे आंदोलन करू लागले व सर्वोदयी मार्गाने लोकांमधील कर्तृत्वशक्तीला आवाहन देऊ लागले, तेव्हा गाडगीळांना या आंदोलनाचे आकर्षण वाटले व त्याला त्यांनी सक्रीय पाठिंबा दिला.

लोकमान्यांच्या शिकवणीतून त्यांनी जे घेतले ते म्हणजे निर्भय त्यागवृत्तीने, भावनावश न होता सतत कार्यमग्न राहण्याचे तत्त्व. ब्रिटिश सत्ताधाऱ्यांशी सामना देताना लोकमान्यांनी जी धैर्याची वृत्ती ठेवली त्यामुळे त्यांना लोकमान्यता मिळाली व सामर्थ्य मिळाले. अशा निस्पृहतेने व धैर्याने कार्य करीत राहिल्यास आज ना

उद्या योग्य ते सामाजिक, आर्थिक व राजकीय परिवर्तन घडून येईल, ही धारणा लोकमान्यांच्यामुळे गाडगीळांच्या मनात तरुणपणीच ठसली होती.

सामाजिक परिवर्तनाच्या बाबतीत गाडगीळांची भूमिका दृढ व आशावादी होती, पण रूढ अर्थाने ते क्रांतिवादी नव्हते. १९२० च्या पूर्वीचे नेमस्त व जहाल असे सर्वच नेते समाजक्रांतीला अनुकूल नव्हते. सशस्त्र मार्गावर श्रद्धा ठेवणारेदेखील फक्त ब्रिटिशांच्या विरुद्ध सशस्त्र लढा द्यावा असे मानीत. गाडगीळांनीदेखील समाजपरिवर्तनाची आवश्यकता मानली व निकडही मानली, पण 'समाजक्रांती'चे तत्त्व मानले नाही. या अर्थाने, त्यांनी समाजवाद किंवा मार्क्सवाद कधी पुरस्कारला नाही. समाजवादाची घोषणा देणारे अनेक समकालीन नेते काहीतरी मनोराज्ये रचीत आहेत, किंवा लोकांना फसव्या आशा लावीत आहेत, असे त्यांना वाटत होते. राजकारणी लोकांबद्दल अनादराने बोलण्याचे ते टाळीत आणि साक्षेपी वृत्तीने योग्य वाटेल तेव्हा सहकार्यही देत.

आपल्या जीवनाची मर्यादा आखून घेऊन, जुन्या संस्कारांना पचवून, नव्या प्राप्त परिस्थितीच्या निरीक्षणात आणि नव्या घडणीच्या कार्यात स्वतःला गुंतवून घेऊन वयाची चाळीस वर्षे गाडगीळांनी सतत परिश्रम केले. नियोजन-मंडळाचे उपाध्यक्ष-पद त्यांनी स्वीकारले यात त्यांच्या निष्ठांशी त्यांनी प्रतारणा केली असे मला वाटत नाही. बागेदारपणा म्हणजे सतत टीकाकाराची भूमिका घेणे नव्हे, जबाबदारीचे आग्रहनही टीकाकाराला पत्करावे लागते. या जबाबदारीच्या दृष्टीने चौथ्या पंच-वार्षिक योजनेबाबत त्यांनी शेवटी जी भूमिका घेतली ती त्यांच्या पूर्वीच्या टीका-काराच्या भूमिकेशी सुसंगत नव्हती असे म्हणावे लागते. परंतु यातही त्यांनी आपल्या प्राणभूत जीवनपद्धतीशी किंवा मूळ निष्ठेशी प्रतारणा केली असे म्हणता येणार नाही. राजकीय व सामाजिक अडसरांमुळे आर्थिक नियोजनाबाबत काय मर्यादा पडतात याचे प्रत्यक्ष अवलोकन केल्यामुळे जुनी भूमिका त्यांनी कायम ठेवली नाही. याबद्दल टीका करतानाही त्यांच्या निष्ठेबद्दल निःशंक राहिले पाहिजे.

सार्थ जीवनाचे व्रत स्वतःच्या आयुष्यात निष्ठेने पार पाडीत असताना व्यक्तीला यशापयशाचे, मानाचे व अवहेलनेचे, तसेच माणसा-माणसांतील संबंधांच्या थारे-पालटाचे अनुभव येतात. मित्र शत्रू होतात, शत्रू मित्र बनतात. तसेच आजचे यश उद्याचे अपयश म्हणून भेडसावते, आणि आजचे अपयश उद्याच्या यशाची आशा दाखवते. जीवनाला सामोरे जाऊन जीवनात स्वतःला गुंतवून घेऊन प्राप्त स्थिति-तून पलीकडे जाण्याचा ध्यास हीच निष्ठा मोलाची आहे, हा जीवनपद्धती सार्थ जीवनाची रीत आहे. या रीतीत माणसाला दक्ष व कार्यरत राहावे लागते, आणि यातून स्वतःला आणि इतरांना आपण नवे रूप देत आहोत, नवे शिकत आहोत व निर्मित आहोत अशी ईर्षा मनात वागावी लागते.

प्रा. नानासाहेब गाडगीळ यांच्यामध्ये हीच दुर्दम्य ईर्षा होती, त्यामुळे त्यांच्या

सान्निध आलेल्या व्यक्तींना नेहमी एक कार्यप्रेरणा मिळे. १९३९ मध्ये थोडा काळ मी त्यांच्या मार्गदर्शनाखाली काम केले पण ते मला अटक होऊन खंडित झाले. नंतर १९५८ पासून त्यांच्या संस्थेत मी 'अर्थविज्ञाना'च्या संपादनाचे काम केले व त्या वेळी अनेक प्रश्नांवर त्यांच्या विचारांचे दर्शन मला घडले. नवबौद्धांच्या संबंधी एक परिसंवाद आयोजित करण्याच्या कार्यात त्यांच्या सामाजिक मतांविषयी मला जास्त कल्पना आली. या सव अनुभवांमुळे मला त्यांच्या मतांपेक्षा त्यांच्या एकंदर जीवनपद्धतीविषयी जास्त कुतूहल वाटत गेले आणि असे वाटले की ही एक अवघड जीवनसाधना आहे. अशी लहानथोर माणसे एखाद्या समाजाचे, कधी त्यातील एखाद्या लहानशा विभागाचे नेतृत्व करतात. त्या समाजाला आणि विभागाला या नेतृत्वामुळे वळण लागते व यातूनच व्यापक समाजपरिवर्तनाचे कार्य घडत जाते. कारण परिवर्तनाचे कार्य थोरांनी व सामान्यांनी मिळूनच घडवावयाचे असते.

गेल्या अर्धशतकातील एका मोठ्या अर्थशास्त्रज्ञाला व विचारवंत नेतृत्व देणाऱ्या थोर व्यक्तीला आज आपण मुकलो आहोत. अस्ताव्यस्त, दिशाहीन व पोकळ जीवनाला शरण जाणारी माणसे सर्व पदांवर सर्व क्षेत्रांत आज भेटत आहेत. या जीवनाविरुद्ध संताप व्यक्त करणारे तरुण भेटत आहेत. अशा वेळी एका सार्थ जीवनाचा आदर्श आपल्यापुढे ठेवणारे प्रा. गाडगीळ आपल्यामध्ये काही वर्षे तरी हवे होते. कोणत्याही प्रणालीने, ध्येयवादाने किंवा संघटनेने माणसांच्या चारित्र्यात खोल पालट होत नाही. चारित्र्याची घडण व तिच्यातले परिवर्तन सार्थ जीवन-पद्धतीचे प्रत्यक्ष आचरण करणाऱ्यांच्या संपर्काने घडतात. अशी माणसेच इतरांच्या निष्ठा घडवितात व मग आंदोलने व परिवर्तने सार्थपणे यशस्वी होतात. हे सारे मनात येऊन प्रा. गाडगीळांचे देहावसान म्हणजे मराठी समाजाची केवढी मोठी हानी आहे, त्याचे परिमाण लक्षात येऊन मन कष्टी होते.

व्यक्तिशः माझे मन एका विलक्षण योगायोगाने बधीर होते. १४ एप्रिलला मला आशीर्वाद देण्यासाठी ते समारंभाचे अध्यक्ष म्हणून आले व त्यांचे त्या वेळचे भाषण हेच पुण्यातील त्यांचे अखेरचे भाषण ठरले. पुण्यास ते येतील व त्यांचा सल्ला आप-ल्याला घेता येईल अशी अपेक्षा होती, पण अवघ्या पंचवीस दिवसांत त्यांना श्रद्धां-जली वाहण्यासाठी हे शब्द लिहावे लागत आहेत. अशा वेळी अनेक आठवणी मनात येतात आणि मन उदास होते. अशी जीवननिष्ठा, कर्तव्यनिष्ठा आणि व्रतनिष्ठा कोठे पुन्हा आढळेल ? असा प्रश्न मन विचारू लागते आणि नानासाहेबांच्या स्मृती-मुळे मन नम्रतेने व श्रद्धेने व्याकुळ होते.

□ □ □

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS (Weekly) : 50 Paise : Regd. No. M-H 64

# अग्निपुत्र

हिंदुस्थान सोशॅलिस्ट
रिपब्लिकन आर्मीचे
धुरंधर सेनापती
आणि सैनिक
यांच्या
हौतात्म्याची
वीरगाथा

वसंत पोतदार

मूल्य चौदा रुपये
राजहंस प्रकाशन